
वर्षारंभ अंक, पण विशेषांक नाही !

५ जून १९७६ किंमत एक रुपया




तमसो मा ज्योतिर्गमय

# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक पहिला

५ जून १९७६

मूल्य : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९

□


?

## आमच्यापुढील प्रश्न

मती कुंठित करून टाकील असा आमचा हा वर्तमानकाल आहे. भविष्याकडे आमची दृष्टी लागली आहे. आणि भूतकालालाही आम्ही विसरू शकत नाही. भूतभविष्याच्या रस्सीखेचीत आम्ही सापडलो आहोत. हा संघर्ष कसा सोडवायचा आणि आमच्या आधिभौतिक गरजा भागवणारा परंतु त्याजबरोबर आमची आध्यात्मिक धारणा कायम राखणारा जीवनमार्ग कसा शोधून काढायचा हाच आमच्यापुढे प्रश्न आहे. कोणती नवी ध्येये किंवा नव्या जगाला अनुरूप होतील अशा रीतीने फेरबदल करून कोणती जुनी ध्येये आम्हाला जनतेपुढे ठेवता येतील आणि जनतेला कशा रीतीने जागृत आणि कार्यप्रवृत्त करणे आम्हाला शक्य होईल, हा प्रश्न आमच्यापुढे आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू
'भारत : आज आणि उद्या'
मौलाना आझाद स्मारक व्याख्यानमाला

[ पंधरा वर्षांपूर्वी ' माणूस ' प्रथमांकाच्या मुखपृष्ठावर दिलेली विचारशलाका. ]

# सप्रेम नमस्कार

¤ आतापर्यंत 'माणूस' चे २२ मे पर्यंतचे अंक मला वक्तशीर मिळाले आहेत. माझ्या मुलीला तसेच माझे ज्योतिषी मित्र रा. खोत ग्वाल्हेर यांनाही ते वक्तशीर मिळत असल्याचे मला कळले आहे. त्याबद्दल धन्यवाद. सगळेजण पुढल्या अंकाची प्रतीक्षा उत्सुकतेने करीत असतात असे मला कितीतरी वाचकांकडून लेखी व तोंडीही कळत आहे. अंकाच्या खपाच्या दृष्टीने आपणास ते किती प्रमाणात आतापर्यंत दिमू शकले आहे याची मला काही कल्पना नाही.

एका अतिश्रेष्ठ अधिकाऱ्याकडून मला पत्राने जे नुकतेच लिहून आले त्यांतली संदर्भित वाक्ये येथे आपणाला लिहून पाठविण्याचा मोह मला आवरत नाही.

'This must be a rare book by lawyer about the case in which he was personally involved... Your Marathi serials are coming out really very well. I have bought each issue published so far.

तसेच मला अहमदनगरहून श्री. ग. वि. केतकर यांचे पत्र आले आहे. त्यांना, ते पुण्यास आले असता 'माणूस' चा ८ मेचा अंक वाचावयास मिळाला. त्यांना सुरवातीपासूनचे या कहाणीचे अंक वाचायला हवे आहेत. पण त्यांच्या लिहिण्याप्रमाणे अहमदनगर येथे 'माणूस' चे अंक बाजारात मिळत नाहीत. त्यांना ते अंक उपलब्ध करून द्यावयास मजजवळ राखीव प्रती नाहीत. रा. केतकरांसारख्या ज्येष्ठ व्यक्तीने माझी लेखमाला आरंभापासून वाचावी अशी माझी उत्कट इच्छा आहे. आपणाकडे अशा प्रती उपलब्ध होऊ शकतील का याची मला कल्पना नाही. तीन एप्रिलच्या अंकापासूनच्या प्रती उपलब्ध होऊ शकल्यास आपण त्यांना अहमदनगर येथे त्यांच्या पत्त्यावर पाठवू शकलात तर मी आपला फार आभारी होईन.

उज्जैनला राहणाऱ्या, एक पीएच. डी. विदुषी कोल्हापूरला गेल्या असता त्यांनी 'माणूस' चा दि. १५ मे चा अंक पाहिला. उज्जैनला परत जाताना त्या व त्यांचे पती दोघे मला येऊन भेटले. दोघांनाही लेखमालेची ओढ आहे. त्यांना मी आपणांशी पत्रव्यवहार करण्यास सांगितले आहे. नागपूर, अकोला, अमरावतीसारख्या ठिकाणांहूनही मला पत्रे आली आहेत.

२६ मे १९७६ पु. ल. इनामदार
मुंबई

---

## पॅपिलॉन पुस्तक योजना
## खुलासा

पुण्यांहून निघणाऱ्या 'सोबत' साप्ताहिकाच्या दि. ३० मे १९७६ अंकात, 'तुमची मते आमची उत्तरे' या सदरात आंजर्ले (रत्नागिरी) येथील डॉ. व्यंकटेश लिगदे यांचे 'माणूसकडून दिशाभूल' या मथळ्याचे एक पत्र प्रसिद्ध झाले आहे. पत्रात लिहिले आहे :

'माणूसने सप्टेंबर ७५ मध्ये पॅपिलॉन पुस्तक योजना जाहीर करून रसिक वाचकांची दिशाभूल केली आहे. १० रु. नोंदणीशुल्क भरून दरमहा एकप्रमाणे २५ रु. चे एक पुस्तक केवळ ५ रुपयात घ्या. ह्या योजनेखाली १२५ रु. ची पुस्तके केवळ ३५ रुपयात (२५+१०) मिळतील असे निवेदन माणूस व अन्य नियतकालिकांत प्रसिद्ध झाले होते. त्याप्रमाणे सप्टेंबर ७५ मध्ये मी दहा रुपये भरले. पहिले पॅपिलॉन पुस्तक ५ रु. त मिळाले खरे. परंतु पुढील पुस्तकाबाबत 'माणूस' कारांचे पितळ उघडे पडले ते असे : दरमहा एक ही पोकळ 'आरोळी' ठरली. कारण आज सात महिने झाले तरी मला तीनच पुस्तके मिळाली. त्यांतील पॅपिलॉन सोडून अन्य दोन पुस्तकांचे दर्शनी मूल्य केवळ दहा व बारा रुपये आहे. असे असताना २५ रु. चे पुस्तक ५ रु. त घ्या ही वाचकांची दिशाभूल नाही का ?'

या प्रकरणी ! दिशाभूल वास्तविक डॉक्टर लिगदे यांच्याकडूनच होत आहे. पॅपिलॉन पुस्तक योजनेची माणूसमधील व अन्य ठिकाणची कुठलीही जाहिरात काढून पहा. त्यात कुठेही 'पंचवीस रुपयांचे एक पुस्तक पाच रुपयांत घ्या' असे जाहीर करण्यात आलेले नाही. '**सुमारे ७५ ते १०० रुपयांची ५ पुस्तके फक्त ३५ रुपयात**' अशी पॅपिलॉन योजनेची जाहिरात आहे. याचा अर्थ प्रत्येक पुस्तक पंचवीस रुपयांचे असेल व ते पाच रुपयांत मिळेल असा होत नाही. एकूण ५ पुस्तके प्रसिद्ध होतील. त्यांचे सर्वांचे मिळून दर्शनी मूल्य अंदाजे ७५ ते १०० असेल. परंतु योजनेतील ग्राहकांना ही पाचही पुस्तकें १०+२५ (३५) रुपयांत मिळू शकतील असा जाहिरातीचा स्पष्ट अर्थ असताना, भलताच अर्थ काढून 'माणूस' ने दिशाभूल केली' अशी दुसऱ्याच वृत्तपत्रात विनाकारण हाकाटी करण्यात काय अर्थ आहे? वाचकांची, ग्राहकांची व काही प्रमाणात संपादकांचीही अशा अर्धवट माहितीवर आधारलेल्या पत्रामुळे दिशाभूल कशी केली जाते, याचे हे एक उदाहरणच आहे.

दरमहा एक पुस्तक ही घोषणाही 'आरोळी' ठरलेली नाही. इथेही डॉक्टरांची माहिती अर्धवट आहे. पाचपैकी चार पुस्तके प्रसिद्ध आलेली आहेत. डॉक्टरांनी म्हटल्याप्रमाणे तीन नाहीत. पाचांपैकी चार पुस्तके वेळेवर निघतात तरी, डॉक्टरांसारखे सुशिक्षित वाचक याला 'आरोळी' म्हणतात. ही एक दिशाभूलच की नाही ? चारांपैकी तीन पुस्तके तर सर्व ग्राहकांना मिळाली. सध्या चौथे पुस्तक प्रसिद्ध झाले आणि पोस्टाचे दर एकदम वाढले. म्हणून चवथे व पांचवे पुस्तक एकत्र पाठवून वाचकांच्या पोस्टखर्चात बचत करण्याचे ठरले. तरी सुद्धा ज्या वाचकांना चवथे पुस्तक जादा पोस्टखर्च करून लगेच हवे होते त्यांना पाठवूनही दिले गेले आहे. डॉक्टरांनी यासंबंधीचे खुलासे माणूसमधून-सारखे प्रसिद्ध होत होते, ते वाचले नव्हते असे दिसते.

तरी सध्या सात महिन्यात पाच पुस्तकांऐवजी चार देणे याचा अर्थ योजनेची अंमलबजावणी शंभर टक्के यशस्वी न होता साठ / सत्तर टक्के झाली असे डॉक्टरांसारखे ग्राहक म्हणू शकतील. दिरंगाईचा दोष माणूस–राजहंस प्रकाशनाने केव्हाही नाकारलेला नाही. त्याबद्दल खेदही प्रकट केला आहे. पण दिरंगाई वेगळी आणि दिशाभूल वेगळी.

दिरंगाई झाली तरी माणूस–राजहंसने आजवर जाहीर केलेल्या सर्व योजनेतील सर्व पुस्तके, त्या त्या योजनेत जाहीर केलेल्या सवलतीतच ग्राहकांना दिलेली आहेत. डॉक्टर लिगदे यांनी याबद्दल माणूस–राजहंस कचेरीत समक्ष येऊन खात्री करून घ्यावी. अशी त्यांना विनंती आहे.

—व्यवस्थापक
राजहंस–प्रकाशन
माणूस साप्ताहिक

# मॉस्कोजवळच्या मॅव्हरिनो प्रयोगशाळेचा अबाकुमोव्ह हा प्रमुख होता. त्याची मुलाखत आटोपल्यावर....



अलेक्झांडर सोल्झेनित्सिनलिखित 'फर्स्ट सर्कल' या कादंबरीतील काही भाग (५)

'अजरामर' स्टॅलिन आपल्याच खोलीत येरझारा घालत होता. त्याची पावलं दमदारपणे पडत होती. शिवाय त्याची कल्पना-शक्तीही जागृत झाली होती. एक प्रचंड वाद्यवृंदच जणू उंच स्वरात त्याच्या अंतःकरणात गर्जत होता, किंवा एखादा प्रचंड ब्रास बँड त्याच्यासाठी संचलनगीत वाजवत होता.

असंतुष्ट लोकच ना? असले म्हणून काय झालं? ते आजवर होतेच आणि यापुढेही असणारच आहेत. स्टॅलिननं मनातल्या मनात जागतिक इतिहासाचा एक धावता आढावा घेऊन टाकला. त्यावरनं त्याला एवढंच कळून चुकलं की, लोक वाईट गोष्टी अखेर विसरून जातात आणि मग त्या माफ़ही करून टाकतात. इतकंच काय, लोक त्या काळातल्या चांगल्या आठवणी जपत राहतात. लोक शेक्स-पिअरच्या 'रिचर्ड थ्री'मधल्या क्वीन अॅनासारखे असतात.

त्यांचा राग टिकत नाही.

त्यांच्या इच्छा स्थिर नसतात.

त्यांची स्मृती क्षीण असते.

आणि ते नेहमीच प्रस्थापित नेतृत्वाला खुशीने शरण जातात.

स्टॅलिनला तर अजून खूप काही करायचं होतं. त्याची लढाई अद्याप थांबली नव्हती.

त्याचं राष्ट्रउभारणीचं काम अपूर्ण होतं.

काळ अनिश्चिततेचा होता.

आणि त्याची जागा घ्यायला दुसरं तर कोणीच नव्हतं. म्हणूनच त्याला नव्वद वर्षांपर्यंत जगणं भाग होतं!

आणखी एक जागतिक युद्ध त्याला लढायचं होतं आणि जिंकायचंही होतं.

पाश्चिमात्यांतल्या लोकशाहीवादी समाजवाद्यांची पाळंमुळं त्याला अद्याप खणून काढायची होती. (खरं तर जगातल्या एकूण एक नीच किड्यांचा त्याला नायनाट करायचा होता!)

शिवाय इतर आर्थिक समस्या तर होत्याच. कामगारांची उत्पादन-शक्ती वाढवायची होती. सुखाचा मार्ग माहीत होता तो फक्त त्यालाच. त्याला लोकांना त्या मार्गाकडे न्यावं लागत होतं आणि ते सुखही त्यांच्या गळी उतरवावं लागत होतं!

पण पुढे काय?

नेपोलिअन! त्याच्या कल्पना अगदी अचूक ठरल्या! त्यानं कोणाच्याच विरोधाला जुमानलं नाही, आणि स्वतःला सम्राट म्हणून घोषित केलं. 'सम्राट' ह्या विशेषणात असं वाईट काय आहे? सम्राट म्हणजेच सेनापती किंवा प्रमुख! 'विश्वाचा सम्राट', 'पृथ्वीचा सम्राट' असले शब्दप्रयोग तर, स्टॅलिनला भयंकर आवडायचे. एक अज्ञात बँड त्याच्या मनात वाजत होता आणि त्याच्या तालावरच स्टॅलिनची पावलं पडत होती. त्याची शतपावली अद्याप चालूच होती!

त्याची जागा घेणारी कुणीच योग्य व्यक्ती भेटली नाही तर? तर कदाचित ते त्यातून काहीतरी मार्ग काढतील. त्यालाच अमर करणारं एखादं औषध शोधून काढतील. पण–पण कदाचित तसा शोधायलाही त्यांना कदाचित उशीर होईल. तोवर वेळही निघून

गेली असेल ! मग अशा वेळी साऱ्या मानवी विश्वाला वाऱ्यावर सोडून तो कसा जाऊ शकेल ?

आणि ज्यांवर तो जबाबदारी टाकून जाईल ते तरी काय लायकीचे लोक आहेत ? ते सगळ्याच गोष्टींचा बट्ट्याबोळ करून टाकतील.

ठीक आहे. अजून एक मार्ग आहे. लौकरच इंजिनिअरिंगच्या तंत्रात एवढी प्रचंड प्रगती होईल की, मग त्याला भव्य आणि सुंदर स्मारकं उभारून घेता येतील. अर्थात त्याची स्वतःचीच. ह्याला 'स्मारकांचा प्रचार' असंही म्हणता येईल. त्याला, एक माउंट कझबेकवर आणि दुसरा एलब्रुझ पर्वताच्या सर्वोच्च शिखरावर असे दोन पुतळे उभारता येतील की, मग मात्र त्याचं मस्तक नेहमी ढगांहूनही उंच असेल. मग मात्र स्टॅलिनला इतिहासातील अजोड किंवा थोरांहून थोर माणूस म्हणून मृत्यूला सामोरं जाता येईल !

तो क्षणभर थांबला.

तशी शक्यता नाहीच म्हणा. पण समजा, त्या ढगांहून अधिक उंच असा कुणी असला तर मग ?

त्याच्या पावलांचा वेग आता मंदावला. खरं तर असली शंका येण्याचं तसं काही कारणच नाही ! तरी त्या शंकेची पाल त्याच्या मनात वरचेवर चुकचुकतेच ! त्याला ह्या जगात तोड नाही हे कधीच सिद्ध झालंय ! ते सगळे प्रवाद कधीच निकालात निघालेयत. आता हेही सिद्ध झालंय की, वस्तुमानाची जशी निर्मिती करता येत नाही, तसंच ते नाहीसंही करता येत नाही. पहिल्या जीवाची निर्मिती समुद्राच्या उष्ण पाण्यात झाली हेही सिद्ध झालंय. शिवाय ख्रिस्ताच्या अस्तित्वाला पुरावे नाहीत हेही सिद्ध होऊन बसलंय.

साक्षात्कार, भविष्य, टेलिपथी, या सगळ्या भाकडकथा ठरल्या आहेत. माणसाच्या मनाची घडणही बालवयातच होत असते. तशाच त्याच्या सवयी, आवडीनिवडीही तेव्हाच निश्चित होत असतात. बालपणातल्या स्मृती माणसाला विसरता येत नाहीत. आणि आता स्टॅलिनच्या मनात त्याच स्मृतींनी पिंगा घातला होता. अगदी नऊ वर्षांचा होईपर्यंत तो 'न्यू–ओल्ड टेस्टामेंटस्' 'संतांची चरित्रे' आणि 'चर्चचा इतिहास' असल्या धार्मिक वातावरणात वाढला. त्यानं चर्चमध्ये सेवा केली. कॉयरमध्ये राहून धर्मगीतं म्हटली. चर्चमधल्या पवित्र प्रतिमांची त्यानं, चर्चच्या शाळेत असताना, कितीकवेळा चुंबनं घेतली आणि संतांच्या गूढ नजरांचा त्यानं असंख्य वेळा वेध घेतला !

आणि म्हणूनच आता त्याच्या सत्तराव्या वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध झालेल्या चरित्रात त्याचं, स्वतःचं चर्चची शाळा सोडत्यावेळचं (तिथल्या पोशाखातलं) छायाचित्र त्यानं समाविष्ट करायला लावलं. त्या फोटोत त्यानं चर्चमधल्या गायकांचा कोट परिधान केला होता. कोटाची कॉलर गळ्याभोवती घट्ट आवळून बसवली होती. लांबट बालीश चेहरा अगदी निस्तेज दिसत होता. जणू काही चर्चमध्ये गाऊन गाऊन तो थकला-भागला होता ! केस लांब वाढले होते. जणू धर्मगुरू होणंच त्याच्या नशिबी लिहिलं होतं !

अबाकादेझ धार्मिक शाळांचा इन्स्पेक्टर होता. त्यानंच लहानपणी स्टॅलिनला शाळेतून काढून टाकलं होतं ! आता स्टॅलिनच्या हुकूमावरूनच त्याचा आवाज बंद करण्यात आला.

तीन जुलै १९४१. स्टॅलिन राष्ट्राला उद्देशून भाषण देण्यासाठी मायक्रोफोनपाशी आला, तेव्हा त्याचा घसा कोरडा पडला होता. भीती आणि स्वतःबद्दलची कीव त्याच्या अंतःकरणात दाटून आली होती. (प्रत्येकाच्या अंतःकरणात थोडी तरी दयाबुद्धी किंवा कीव असतेच की !) लोकांना उद्देशून सुरवातीलाच तो म्हणाला, 'बंधु आणि भगिनींनो,' असले शब्द उच्चारण्याची चूक लेनिननं तर कधीच केली नसती ! पण शालेय दिवसांतली अपरिपक्व भाषा स्टॅलिन कधीच विसरला होता ! पुढे बाँबची बरसात सुरू झाली. युद्ध दाराशी येऊन ठेपलं, तेव्हा त्याच जुलै महिन्यात स्टॅलिननं मनोमन परमेश्वराची करुणादेखील भाकली. मूकपणे प्रार्थना केली. हे एखाद्या नास्तिकानं देवाला नमस्कार करण्यासारखं होतं ! अगदी अलीकडे चर्चमध्ये म्हटल्या जाणाऱ्या प्रार्थनांतूनसुद्धा 'परमेश्वरानं नेमलेला नेता' अशा शब्दांत स्टॅलिनचं वर्णन करण्यात येऊ लागलं. स्टॅलिन त्यामुळे अत्यंत सुखावला आणि त्या खुशीतच त्यानं झागोर्स्कच्या चर्चची आणि मठाची व्यवस्था क्रेमलिनच्या फंडामधून करायला सुरवात केली. आपल्या अत्यंत आवडत्या वयोवृद्ध धर्मगुरू (Patriarch) चं स्वागत तो ज्या प्रकारे करत असे तसा सन्मान परराष्ट्राच्या एखाद्या पंतप्रधानाच्या वाट्यालासुद्धा येत नसे.

स्टॅलिनं स्वतः जातीनं बाहेरच्या दरवाजाजवळ त्या धर्मगुरूंचं स्वागत करीत असे आणि मग त्यांचे हात धरून त्यांना सन्मानानं आत आणत असे. स्टॅलिनच्या मनात एक अंधुकशी कल्पनाही तरळत होती. ग्रामीण भागातली एखादी लहानशी इस्टेट शोधून काढून ती त्याला त्या आवडत्या धर्मगुरूला नजर करायची होती. जसं मेल्यावर आपल्याला शांती मिळावी म्हणून लोक जमिनीचं दान करतात तसल्याच प्रकारची स्टॅलिनचीही इच्छा होती !

स्टॅलिनला आता जाणवू लागलं होतं की, ऑर्थोडॉक्स चर्च आणि इतर जुन्या पद्धती आणि परंपरा ह्याचं त्याला मनोमन आकर्षण वाटतं. खरं तर या परंपरांच्या चक्राला झुगारूनच तो बाहेर पडला आणि त्या परंपरा गाडून टाकण्यासाठीच गेली चाळीस वर्षं तो झगडला. तीस सालातच त्यानं (राजकारणाचा एक भाग म्हणूनच) गेली पंधरा वर्षं डावलण्यात आलेला 'मातृभूमी' हा शब्द प्रचारात आणला. तोवर तो शब्द उच्चारणंदेखील लज्जास्पद होतं ! पण जसा आणखी काळ मागे पडला तसं 'रशिया' आणि 'मातृभूमी' ह्या शब्दांबद्दल त्याला अधिकच जिव्हाळा वाटू लागला. रशिअन लोकांबद्दलही त्याला फार प्रेम वाटू लागलं. कारण ह्याच लोकांनी त्याचा कधीच विश्वासघात केला नाही. ह्याच लोकांनी त्याच्यासाठी अर्धपोटी गुजराण केली.

युद्ध असो, दुष्काळ असो, मजुरांच्या छावण्यासुद्धा असोत. अडचणी कोणत्याही असोत, ह्याच लोकांनी त्या निमूटपणे सहन केल्या. आणि म्हणून, म्हणूनच जर्मनीवर विजय मिळवताच स्टॅलिननं रशिअन लोकांची, त्यांच्या सहनशीलतेची, अनन्य संकटातदेखील त्यांनी दाखवलेल्या निर्धाराची प्रशंसा केली !

एक 'रशियन' म्हणून लोकांनी आता आपला स्वीकार करावा ह्याच एका इच्छेनं स्टॅलिनच्या मनात घर केलं. जुन्या काळाची सूचक अशी विशेषणं त्याला अधिकाधिक आवडू लागली. आणि म्हणूनच अधिकाऱ्यांची जुनीच नावं त्यानं पुन्हा एकदा प्रचारात आणली. संघप्रदेशाच्या मध्यवर्ती कार्यकारी समितीला त्यानं 'सुप्रीम सोव्हिएट'

पृष्ठ ३२ वर

# लोकशाही

## दोन घडामोडींचे परिणाम

वा. दा. रानडे

संघटना काँग्रेस, जनसंघ, भारतीय लोकदल आणि समाजवादी पक्ष यांना एकत्र आणून नव्या विरोधी पक्षाच्या स्थापनेची जयप्रकाशजींची घोषणा आणि ६४ कायदे कोर्टाच्या कक्षेतून काढून घेणारी चाळिसावी घटना दुरुस्ती या भारतीय राजकारणातील अलीकडच्या दोन महत्त्वाच्या घटना.आपल्या लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टिकोनातून या दोन्ही घटनांचा विचार केला पाहिजे.

संसदीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी दोन तुल्यबळ पक्षांची आवश्यकता असते. भारतात काँग्रेसला तुल्यबळ विरोधी पक्ष स्वातंत्र्याच्या २९ वर्षांत स्थापन होऊ शकला नाही. नव्या पक्षाच्या स्थापनेतून प्रभावी विरोधी पक्ष उभा राहवा अशी कल्पना आहे, पण या नव्या पक्षाबद्दल खोट्या आशा न बाळगता वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून आणि आत्मपरीक्षणाच्या भूमिकेतून त्याचे वास्तविक बळ अजमावले पाहिजे. अगतिक परिस्थितीतून हा निर्णय घेतला गेला आहे का, याचाही विचार करायला हवा. जे चार पक्ष एकत्र येत आहेत, त्यांच्यात काँग्रेसविरोधाशिवाय समान सूत्र कोणते आहे ? जवळजवळ वर्षापूर्वी गुजरातेत झालेल्या निवडणुकांच्या वेळी या पक्षांनी 'जनता मोर्चा' या नावाने संयुक्त आघाडी स्थापली. या आघाडीस निर्णायक बहुमत मिळू शकले नाही, पण किमलोपच्या पाठिंब्याने तिने काही काळ सत्ता उपभोगली, पण अखेर काँग्रेसचा फोडाफोडीचा डाव यशस्वी होऊन आघाडीचे सरकार कोलमडले गेले. काही महिने हे चार पक्ष पार्लमेंटमध्ये संयुक्त मोर्चा म्हणून काम करीत होते. लोकसभेत त्यांचे ५० व राज्यसभेत ३० सभासद होते. संख्येच्या दृष्टीने प्रमुख विरोधी पक्षाचे स्थान या पक्षाला मिळाले हे खरे, पण त्यातून प्रभावी विरोधी पक्ष उभा राहिला का ? हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. देशात प्रभावी विरोधी पक्ष निर्माण व्हावा असे कोणत्या लोकशाहीवाद्यास वाटणार नाही ? पण सध्या त्यासाठी चाललेले प्रयत्न योग्य दिशेने आहेत का ? 'नवा पक्ष पूर्वीच्याच धोरणांनी चालणार का काही नवी दिशा घेणार ?' असा प्रश्न या पक्षाच्या स्थापनेबाबत आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना पंतप्रधान श्रीमती गांधींनी केला. त्या अर्थाने मी हा प्रश्न उपस्थित करीत नाही, पण आतापर्यंतचे प्रयत्न फसले तशी या नव्या पक्षाची गत होऊ नये या प्रामाणिक सदिच्छेतून या प्रश्नाचे उत्तर आपण शोधले पाहिजे.


पहिली गोष्ट केवळ काँग्रेसविरोधाच्या अकरुणात्मक भूमिकेवर उभारलेला पक्ष टिकत नाही, यशस्वी होत नाही, असा आतापर्यंतचा अनुभव आहे. काँग्रेसपेक्षा अधिक पुरोगामी व जनहिताचा कार्यक्रम या पक्षाने जनतेपुढे ठेवला पाहिजे. पण नव्या पक्षातील घटकांची घडण लक्षात घेता, तशी शक्यता फार थोडी दिसते. एकत्र येणाऱ्या चार पक्षांपैकी संघटना काँग्रेस, जनसंघ व भारतीय लोकदल हे पक्ष उजव्या गटाचे आणि फक्त समाजवादी पक्ष डाव्या गटाचा आहे. म्हणजे या नव्या पक्षावर उजव्या गटांचाच प्रभाव राहणार आहे. उजवे–डावे ही परिभाषा आता सोडून दिली पाहिजे असे म्हटले जाते, पण केवळ ही परिभाषा सोडल्याने वस्तुस्थिती थोडीच बदलते ? नवा पक्ष केवळ निवडणुकीच्या व सत्तेच्या राजकारणावर भर देणार आहे का ? काँग्रेस सत्तारूढ असल्याने तिला मिळणारा फायदा व तिच्याजवळची प्रचंड साधनसामग्री लक्षात घेता, हा पक्ष काँग्रेसशी स्पर्धा करू शकणार नाही हे उघड आहे. 'माणूस'मधील दहा एप्रिलच्या लेखात मी म्हटल्याप्रमाणे प्रभावी विरोधी पक्षाच्या उभारणीसाठी विधिमंडळातील कार्याबरोबरच विधायक कार्य आणि अन्यायाविरुद्ध शांततापूर्ण संघर्ष हे मार्गही अवलंबिले पाहिजेत. विधिमंडळातील कार्याइतकाच या दोन्ही कार्यांवर भर दिला, तर केवळ सत्तेच्या राजकारणात गुरफटल्याने निर्माण होणाऱ्या विकृती टळून निकोप शिस्तबद्ध पक्षाची निर्मिती होईल. नव्या पक्षाचे धोरण व कार्यक्रम जाहीर झाल्यावर त्यासंबंधी अधिक लिहिता येईल.

आपल्या लोकशाहीच्या भवितव्याशी निगडित अशी दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे पार्लमेंटमध्ये नुकतेच पास झालेले व राष्ट्रपतींनी लागलीच मान्यता दिलेले चाळीसावे घटना दुरुस्ती बिल. केंद्र व राज्य सरकारांनी केलेले ६४ कायदे या बिलाने कोर्टाच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले. यापूर्वी अशा रीतीने कोर्टाच्या कक्षेबाहेर ठेवलेले कायदे जमेस धरता, आता एकूण १६८ कायदे कोर्टाच्या अधिकारक्षेत्रातून काढून घेण्यात आले आहेत. त्यासंबंधात कोर्टात केलेले अर्ज आता निकालात निघतील. या कायद्यांच्या कायदेशीरपणाबद्दल शंका असेल तर, त्याबाबत कोर्टात जाता येणार नाही. कोर्टाच्या कक्षेतून काढलेले बहुतेक कायदे जमीन सुधारणा व आर्थिक गुन्ह्यांसंबंधी आहेत. या कायद्यांच्या कायदेशीरपणाबाबत कोर्टात हरकती घेतल्या जातात, कायद्यांची अंमलबजावणी लांबते, भूमिहीनांना त्यापासून मिळावयाचा फायदा लौकर मिळत नाही, असा अनुभव आल्याने सामाजिक न्यायाची उद्दिष्टे साधण्यासाठी कोर्टाच्या कक्षेतून हे कायदे काढून घेण्याचा निर्णय सरकारने घेतला असे सरकारचे समर्थन आहे. सरकारच्या या म्हणण्यात तथ्य आहे, पण या प्रश्नाचा आणखी वेगळ्या दृष्टिकोनातून विचार करायला हवा. एक प्रश्न म्हणजे कायद्यांचा कायदेशीरपणा व सनदशीरपणा कसा पारखून पहावयाचा ? घटनेच्या उद्दिष्टांशी आणि तरतुदींशी विसंगत असे कायदे केले गेले तर, त्यांना आळा कसा घालावयाचा ? त्याविरुद्ध उपाय काय ? कायदे सनदशीर आहेत की नाही, हे ठरविण्याचा अधिकार घटनेने न्यायालयांना दिला आहे, पण काही कायद्यांच्या बाबतीत

पृष्ठ २१ वर

चिं. त्र्यं. खानोलकर स्मृतिनिमित्त

युरोपमधील गेल्या काही दशकातील
प्रमुख न-नाटककारांचा परिचय करून देणारी
एक विशेष लेखमाला....



# प्रायोगिक रंगभूमीवरचा ज्वालामुखी इटालिअन नाटककार

# लुइजी पिरँदेलो

## प्रा. शांताराम शिंदे

जुन्या रंगभूमीवरचे सगळे संकेत त्याच्या नाटकांनी पार धुऊन टाकले.

ज्वालामुखीतून लाव्हा बाहेर पडतो, तशी त्याच्या लेखणीतून नाटकं बाहेर पडली. लाव्हा (Lava) हा सुद्धा इटालियन भाषेतलाच शब्द. त्याचा अर्थ-धुऊन टाकणे.

'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे' हे त्याचे गाजलेले नाटक.

पण त्याचा पहिला प्रयोग इटलीत झाला तेव्हा 'मॅडहाऊस' 'मॅडहाऊस' म्हणून प्रेक्षकांनी दंगल माजवून सोडली. थिएटरमध्ये पिरँदेलो हजर होता. त्याला जीव वाचवण्यासाठी मागील दरवाज्यानं पळून जावं लागलं...

...इंग्लंडमध्ये तर या नाटकाला बंदीच घालण्यात आली. इंग्लंडचा प्रख्यात नाटककार शॉ मध्ये पडला आणि लंडनमध्ये नव्हे, तर एका आडगावी त्या नाटकाचा प्रयोग झाला.

परंतु याच नाटकानं त्याला जगप्रसिद्ध करून सोडलं.

आणि

१९३४ सालचं साहित्याचं नोबेल पारितोषिक पिरँदेलोला मिळालं.

'मॅडहाऊस'च्या आरोळीपासून नोबेल पारितोषिकापर्यंतचा हा प्रवास विलक्षणच म्हटला पाहिजे.

ही दोन्ही माणसं एकच होती का ?

'मॅडहाऊस'नं बदनाम पावलेला आणि नोबेल पारितोषिकाचा सन्मान पावलेला, ही दोन माणसं होती की एकच ?

एका माणसांत किती माणसं असतात ? असू शकतात ? हा प्रश्न पिरँदेलोला आयुष्यभर छळत होता. नोबेल पारितोषिक मिळालं त्याच्या आदल्याच वर्षी त्यानं आपल्या डायरीत लिहून ठेवलंय–

'कुणीतरी एकजण माझं आयुष्य जगतो आहे. आणि तो कोण आहे, काय आहे याची मला काडीइतकीही माहिती नाही.'

आणि त्याच्या 'तुम्ही म्हणता ते बरोबर आहे' (Right you are) या नाटकातलं एक पात्र म्हणतं– 'मी जो आणि जसा आहे असं तुम्हाला वाटतं, तो आणि तसाच मी आहे...'

लुइजी पिरँदेलोचा जन्म २८ जून १८६७ मध्ये झाला. इटलीच्या दक्षिणेला सिसिली बेट आहे. त्या बेटाच्या दक्षिण किनाऱ्याजवळ अॅग्रिजेन्टो म्हणून एक प्राचीन आणि धनाढ्य शहर आहे. त्या शहरांत त्याचा जन्म झाला. एका ग्रीक भावकवीनं या शहराचं वर्णन– 'मर्त्य मानवानं वसवलेलं एक अत्यंत देखणं शहर' असं केलेलं आहे. दोन नद्यांच्या संगमावर, उथळ **थाळीसारख्या बखळीत**, सुंदर. पण नेहमीपेक्षा थोडं वेगळं, तिन्ही बाजूंनी डोंगरांचे तुटके कडे, असं हे अनोखं शहर आहे. शहरात जिकडं बघावं तिकडं प्राचीन स्मारकांचे अवशेष, अक्षरशः स्मारकांचं शहर म्हणावे इतके विपुल.

अशी प्राचीन स्मारकं सबंध सिसिलीभर विखुरलेली आहेत. **सिसिलीचं आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे तिथला एट्ना पर्वत** (Mount Etna). **हा जिवंत ज्वालामुखी आहे.** दर सहा–सात वर्षांनी नेमानं त्याचा स्फोट होतो. खुद्द इटलीमध्येसुद्धा आणखी एक ज्वालामुखी आहे–व्हेसूव्हिअस.

एट्ना पर्वत तर पिरँदेलोच्या जन्मगावापासून अगदी जवळ आहे. सहा–सात वर्षांनी त्याच्यातून लाव्हारसाचे चकाकते–पेटते लोटच्या लोट बाहेर येतात. स्फोटानंतर लाव्हा थंड होतो आणि पर्वताच्या अंगाखांद्यावर त्याचे वेडेवाकडे थर बसतात. आधीचा पर्वत तो हाच असं सांगूनसुद्धा पटणार नाही. त्या पर्वताचं व्यक्तिमत्त्वच पार बदलून जातं. त्याच्यावर एक नवाच मुखवटा चढतो. पुन्हा सात वर्षांनी आणखी एक नवा मुखवटा. असे सारखे मुखवटे बदलत जातात. डोंगर तोच असून तोच नसतो. यातला खरा कोणता तेच कळत नाही. शेवटी दोन्ही खरे असावेत किंवा दोन्ही भास असावेत आणि खरा अजून आत असावा. अजून एका स्फोटाची वाट पाहत. पिरँदेलोच्या नाटकांची प्रकृती अशीच आहे. सत्य कोणतं आणि भास कोणता काहीच कळत नाही. आणि या सगळ्या उलथापालथीच्या बुडाशी असतं एक निर्दय, पेटतं, दुःखमय, छलमय, रहस्य !

सिसिलीचं आणखी एक वैशिष्ट्य आहे ते तिच्या इतिहासात. भारताप्रमाणेच तिचाही इतिहास परकीयांच्या आक्रमणांनी गजबजलेला आहे आणि भारताप्रमाणेच सिसिलीसुद्धा सौंदर्याचा आणि दुःख-क्लेशाचा देश आहे. परकीयांनी केलेला छळ आणि कंबर मोडून टाकणारं दारिद्र्य यांची कहाणीच या देशांचा इतिहास झालेली आहे. रक्ताची तहान लागलेले विकार, हिंसा, सूड आणि उदासीनता यांचा शाप सिसिलीलाही आहे...आफ्रिकेच्या उत्तर टोकाशी अक्षांश साधणारं हे बेट त्या कृष्ण खंडाच्या–dark continent च्या पोटा-तलं प्राचीन रहस्य आपल्याही पोटात साठवून बसलंय की काय, कुणास ठाऊक.

पिरँदेलोच्या जन्मगावाच्या उत्तरेला डोंगरात गंधकाच्या खाणी आहेत. पिरँदेलोचा बाप स्टीफानो त्यातल्याच एका खाणीचा मालक होता. या स्टीफानोला एकूण तेवीस भावंडं होती आणि या चोविसां-तला तो शेवटचा. शेंडेफळ. अंगानं उभा-आडवा. प्रचंड. धिप्पाड. बापासारखाच बेटाही झाला–शरीरानं उंच. बळकट. पण स्वभाव मात्र बापासारखा नव्हता. बाप तापट, रागीट, भयंकर हिंस्र. बाप स्फोट होत असतानाचा ज्वालामुखी, तर बेटा स्फोटानंतरचा थंड ज्वालामुखी. ज्या काही ज्वाला असतील त्या आत, खोल अंतरंगात.

हा स्वभाव कदाचित आईवर गेला असावा. कारण भीमकाय बापानं लग्न केलं ते मात्र एका नाजुक, सुंदर, शेलाटचा स्त्रीशी. या कोमलांगीनं त्या भीमकाय पुरुषाशी कसा काय संसार केला असेल ते तिचं तिलाच ठाऊक. बरं, तो नुसताच शरीरानं धिप्पाड होता एवढंच नाही, तर स्वभावानंही पित्तप्रकृतीचा होता–तापट, तिखट, तुरट. अनेक द्वंद्वं खेळला आणि एकदा तर पठ्ठ्यानं कमालच केली. दुपारची वामकुक्षी करीत होता आणि तिकडं अचानक चर्चची घंटा घणाणू लागली. पठ्ठ्यानं बंदूक उचलली आणि खिडकीतून नेम धरून आपली झोपमोड केल्याबद्दल त्या घंटेवरच गोळी झाडली. पुजारी बिचारा सज्जन होता. त्यानं कशीबशी ही केस हशप् करून टाकली.

भावी नाटककार लुइजी पिरँदेलो तेरा वर्षांचा कोवळा पोर होता तेव्हाचा एक प्रसंग सांगतात. बाप स्टीफानो एका मुलीवर चोरून प्रेम करीत होता. स्टीफानोची मावशी एका कॉन्व्हेंटची प्रमुख होती. त्या कॉन्व्हेंटमध्ये दोघे भेटत. प्रणय करीत. या गोष्टीचा आपल्या आईला किती त्रास होतो हे त्या पोरीला एकदा सांगावं आणि तिला चांगलं बजावावं असं तेरा वर्षांच्या लुइजीला वाटलं. तो कॉन्व्हेंट-मध्ये गेला आणि त्या पोरीला शांत पण कठोर शब्दांत खूप बोलला. परत निघताना त्या खोलीतल्या पडद्याकडं त्याचं लक्ष गेलं. पडद्याच्या खाली बापाचे बूट त्याला दिसले. म्हणजे बाप पडद्यामागे लपून बसला होता आणि शांतपणानं सगळं ऐकत होता.

हा सांगोवांगीचा प्रसंग खरा असेल–(आणि तो खरा असावा !) –तर पिरँदेलोच्या नाट्यकृतींवर बराच प्रकाश पडतो. 'रूल्स ऑफ द गेम', 'चौथा हेन्री' इत्यादी त्याच्या नाटकांतून वरचेवर येणारे मत्सराचे आणि प्रतारणेचे विषय पोरवयातच पिरँदेलोनं पाहिले. तेही स्वतःच्या घरी. किशोरवयात खोलवर मनीमानसी रुजलेला हा विषय त्यांच्या नाट्यकृतीतून पुन्हा पुन्हा आला नसता तरच आश्चर्य ! आणि 'चौथा हेन्री' या नाटकात तर तो विषय केवढा शोकभीषण झालाय ! शेक्सपीअरचं 'ऑथेल्लो' सुद्धा या रुद्रभीषण शोकनाटचा-पुढं फिकं पडेल... पडद्यामागं लपलेला आपला बाप त्यानं पाहिला, आणि असले पडदे फाडण्याचं काम त्याच्या लेखणीनं आयुष्यभर केलं...

किशोरवयातल्या उदात्त ध्येयवादाला भेदूनछेदून टाकणारं कठोर वास्तव या कहाणीत दिसतं. अशा आणखीही काही प्रसंग–कहाण्या त्याच्या चरित्रात आहेत. एका रविवारी ऐटबाज नाविकाचा पोशाख घालून लुइजी रस्त्यानं चालला होता. तर त्याला एक, केवळ चिंध्याच अंगावर घातलेला त्याच्याच वयाचा एक पोर दिसला. खऱ्या धार्मिक बुद्धीनं लुइजीनं तात्काळ अंगावरचा ऐटबाज पोशाख उतरवला आणि त्या गरीब पोराला देऊन टाकला. पण तो सुखासमाधानानं घरी पोचतो न पोचतो तोच, त्या गरीब पोराची आई धावतपळत आली आणि तिने तो पोशाख त्याला परत करून टाकला. गरिबावर दया केल्याचं साधं समाधानदेखील छोट्या लुईजीला उपभोगता आलं

नाही. मग हे आयुष्य आपल्याला कसलं सुख देणार आहे? लुईजीच्या भरल्या डोळ्यांपुढं हा एकच प्रश्न वरचेवर येत राहिला.

आणखी एकदा असाच प्रसंग घडून आला. चर्चमध्ये कुमारी मेरीच्या मेणाच्या मूर्तीची विक्री झाली. या मूर्तींबरोबर प्रत्येक मुलाला लॉटरीचं एक तिकीट देण्यात आलं. लुइजीचा एक दोस्त आजारी होता. त्यामुळं तो या लॉटरीत भाग घेऊ शकला नाही. लुइजीनं आपलं तिकीट त्या दुःखी दोस्ताला देऊन टाकलं. तिकीट देताना तिकिटाच्या मागं लिहिलेलं आपलं नाव नीट खोडून, त्या दोस्ताचं नाव त्याच्यावर लिहूनच दिलं. त्या तिकिटाला बक्षीस मिळालं. परंतु बक्षीस देणाऱ्या समितीनं ते बक्षीस त्या दोस्ताला द्यायचं नाकारलं आणि लुइजीलाच ते देऊ केलं. त्या दिवसापासून लुइजीनं चर्चमध्ये जायचंच सोडून दिलं. काय करायची असली मंदिरं, जिथं दयेलाच सुळी दिलं जातं...

लुइजी कुमारवयातून प्रौढत्वाकडे–adulthood कडं सरकत होता आणि त्याच्या स्वप्नविश्वातल्या श्रद्धांना एकामागोमाग एक तडे जात होते. भ्रमनिरास हीच काय ती प्रौढ जीवनाची एकमेव क्रूर देणगी आहे, हे कठोर सत्य त्याच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा गाभा होऊन बसलं. 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे' वगैरे फालतू रोमँटिक कल्पना भस्मसात करणारे हे ज्वालामुखीचे स्फोट होते. त्याच्या कथा–कादंबऱ्यांतून आणि नाटयकृतींतून उफाळणारं ज्वालाग्राही वास्तव त्याच्या या अनुभवात आदिम रूपात आपल्याला सापडतं.

कठोर वास्तव त्याच्या पाचवीलाच पुजलं होतं असं वाटावं. इतके कठोर दाहक अनुभव आमरण त्याला भोगावे लागले. त्याच्या भावजीवनाच्या दरेक वळणावर स्वप्नांच्या राखेचा एक ढीग आहे.

साहित्याच्या क्षेत्रात त्यानं मिळवलेलं देदीप्यमान यश, या ज्वालेच्या लेखणीनं लिहूनच त्यानं मिळवलं. नोबेल पारितोषिकाचा स्वीकार करताना केलेल्या भाषणात तो म्हणतो– 'साहित्यात यश मिळवण्यासाठी मला जीवनाच्या शाळेत शिकावं लागलं... कडूझार भ्रमनिरास, वेदना, भयानक जखमा आणि बालपणीच्या निर्व्याज चुका पचवण्यासाठी या शाळेतले धडे मला उपयोगी पडले. त्यांनी माझ्या अनुभवांना खोली आणि मूल्य आलं. हे मनाचं शिक्षण मी फार मोठी किंमत देऊन मिळवलेलं आहे; या शिक्षणानंच मला पोसवलं आहे आणि स्वतःशी प्रामाणिक राहायला, माझं मीपण अभंग ठेवायला मदत केली आहे... '

पिरँदेलोचं प्रेमजीवन वयाच्या सोळा-सतराव्या वर्षीच सुरू झालेलं दिसतं. आपली चुलत बहीण लीना हिच्याशी या कोवळ्या वयातच त्याची एंगेजमेंट झाली, परंतु दुःखी, वेदनामय वास्तवाची कवचकुंडलं घालून अग्निनारायणाची पूजा मांडणाराला प्रेम आणि एंगेजमेंट या फालतू रोमँटिक कल्पनांची काय दिक्कत वाटणार! एकोणीस वर्षे वयाच्या लुइजीनी लीनाला लिहिलेलं हे प्रेमपत्र पहा–

'चिंतन म्हणजे कृष्णपिशाच्चांनी भरलेला काळा डोह. त्याच्यावर वैताग-निराशेचा पहारा...आपण म्हणजे बिचाऱ्या कोळ्यांच्यासारखे आहोत–( किंवा गोगलगायीसारखे, किंवा शंखकिड्यासारखे... ), पण आपल्याला जाळ्याची किंवा पाठीवरच्या कवचघराची किंवा शंखाची गरजच नाही. आपल्याला पाहिजे फक्त एक लहानसं छोटंसं जग, ज्याच्यात राहता येईल आणि ज्याच्यासाठी राहता येईल असं एक चिमुकलं जग. एखादं ध्येय, एखादी भावना, एखादा छंद, एखादा व्यवसाय...असं एक छोटंसं जग–तेच माणसाचं, या अजस्र गोगलगायीचं जग...मी लिहितो आणि अभ्यास करतो ते फक्त स्वतःला विसरण्यासाठी–स्वतःला निराशेपासून दूर ठेवण्यासाठी...' ( ऑक्टोबर ३१, १८८६ )

––अशी पत्रं लिहिणाराच्या एंगेजमेंटचं दुसरं काय होणार ? मोडली एंगेजमेंट. फक्त अडीचतीन वर्षांत.

या वेळी पिरँदेलो सिसिलीतल्या पालेर्मो विद्यापीठात शिकत होता. पुढच्याच वर्षी तिथून तो रोम विद्यापीठात शिकायला गेला. तिथं दोन वर्षं राहिला आणि एका प्राध्यापकाशी भांडला. दुसऱ्या एका प्राध्यापकाच्या सल्ल्यानं तिथून जर्मनीत गेला–बॉन विद्यापीठात. तिथं दोन वर्षं राहिला. ॲग्रिजेन्टो या जन्मगावच्या बोलीभाषेवर तिथं त्यानं संशोधनपर एक प्रबंध लिहिला आणि पीएच. डी पदवी मिळवली.

बॉनमधल्या वास्तव्यात पिरँदेलोचं दुसरं प्रकरण सुरू झालं. तेही त्या दोन वर्षांपुरतंच टिकलं. जेनी शुल्झ-लँडर या जर्मन मुलीच्या प्रेमात तो पडला आणि कविता लिहायला लागला. या प्रेमाचे पडसाद या कवितांपुरतेच मर्यादित आहेत.

बॉनहून परत आल्यानंतर आपल्या वडिलांच्या गंधकाच्या खाणीच्या उद्योगात त्याने लक्ष घालायला सुरुवात केली. " द आउटकास्ट " ही कादंबरीही त्यानं लिहून पुरी केलेली दिसते. ती प्रकाशित झालीच नाही.

तीन वर्षांनी त्याचं लग्न झालं. या तीन वर्षांच्या काळात लीनाशी त्याचे कसलेही संबंध राहिले नव्हते. तिच्याशी झालेली एंगेजमेंट मोडून गेली होती. आणि वडिलांनी ठरवलेल्या मुलीशी त्याचं लग्न झालं ( १८९४ ). या मुलीचा बाप पोर्तुलानो हा पिरँदेलोच्या बापाचा खाणउद्योगातला सहकारी होता. हा पोर्तुलानो अत्यंत मत्सरी होता. मत्सराचा शाप हे त्यावेळच्या सिसिलीच्या समाजाचं सांस्कृतिक वैशिष्टय होतं. पोर्तुलानोच्या बाबतीत तर या वैशिष्टयाचा कडेलोटच झाला होता. या मत्सराच्या पोटीच बायको प्रसूतिवेदनांनी मरायला टेकली असताना देखील त्यानं कुणाही डॉक्टराचं साहाय्य घेण्याचं नाकारलं. परिणामी बायको बाळंतपणात दगावली. अशा बापाची मुलगी मारिया अँतोनिएता पोर्तुलानो हिच्याशी लुइजी पिरँदेलोनं डोळे झाकून लग्न केलं. आईवडिलांनी ठरवलं म्हणून.

पिरँदेलोचं कौटुंबिक जीवन हे तर एक भीषण स्वप्ननाटयच आहे. पहिली पाच वर्षंच काय ती थोडी शांततेची गेली असं म्हणावं लागेल. या पाच वर्षांत तीन अपत्यांचा जन्म झाला. पहिला मुलगा स्टीफानो (१८९५), दुसरी मुलगी लिएत्ता (१८९७), आणि तिसरा मुलगा फाऊस्तो (१८९९). (या फाऊस्तोनं पुढे जागतिक कीर्तीचा चित्रकार म्हणून नाव मिळवलं.) या तिसऱ्या मुलाच्या जन्माच्या वेळी अँतोनिएताला बराच त्रास झाला आणि परिणामी तिला वेडसरपणाचे सौम्य झटके येऊ लागले. यावेळी पिरँदेलो रोममधल्या मुलींच्या विद्यालयात अध्यापकाची नोकरी करीत होता. पुढे

पत्नीसाठी त्यानं नोकरी सोडून द्यायचं ठरवलं होतं. परंतु १९०३ मध्ये पिरँदेलोच्या मालकाच्या गंधकाच्या खाणीत अचानक पाणी शिरलं आणि सगळ्या खाणी पाण्यानं भरून गेल्या. पिरँदेलो आणि सहकारी खाणमालक यांचं दिवाळं वाजलं. हे आर्थिक संकट इतकं प्रचंड होतं की, एकेकाळची धनवंत पिरँदेलो आणि पोर्तुलानो कुटुंबं एकदम दारिद्र्याच्या खाईत लोटली गेली. या संकटाच्या माऱ्याबरोबर नाटककार पिरँदेलोवर आणखी एक कौटुंबिक संकट कोसळलं. तिसऱ्या बाळंतपणात तोळामासा प्रकृती झालेली अँतोनिएता खाणींच्या अपघाताच्या वार्तेनं एकदम हबकली. तिला पक्षाघाताचा – पॅरॅलिसिसचा – झटका आला. तिचे दोन्ही पाय अधू झाले. पुढे ती बरी झाली आणि हिंडूफिरू लागली. तरी सुद्धा तिच्या मनावर झालेल्या आघातातून ती पुढे कधीच सावरली नाही. तिसऱ्या मुलाच्या जन्मानंतर तिला वेडसरपणाचे झटके येत होते त्यांचं एक विदारक वैशिष्ट्य होतं. या वेडाच्या झटक्यात तिचा आनुवंशिक मत्सर जागृत होई आणि ती पिरँदेलोबद्दल नाना प्रकारचे संशय घेत बसे. आता ते झटके जास्त तीव्र झाले आणि तिचा संशय आणि मत्सरसुद्धा तितकेच तीव्र झाले. पिरँदेलो रोमला मुलींच्या शाळेत नोकरी करतो म्हणून तिच्या मनात रोममधल्या हालचालींविषयी संशयाचं थैमान सुरू होत असे. या वेडाच्या लहरी इतक्या वादळी असत की, अनेकदा ती सुरी घेऊन मुलांच्यासुद्धा अंगावर धावून जाई.

पिरँदेलोनं ही कौटुंबिक वाताहात उघड्या डोळ्यांनी आणि शांत मनानं सोसली. बायकोच्या संशयाचं निराकरण करण्यासाठी त्यानं कुठेही घराबाहेर जाणं बंद केलं. सगळी पगाराची रक्कम बायकोच्या हातात दिली. फक्त नोकरीवर जाऊन येण्यासाठी जेवढी प्रवासखर्चाची रक्कम लागेल तेवढीच तो आपल्याजवळ ठेवी. याच काळात त्याच्या नाटकाचे प्रयोगसुद्धा सुरू झाले होते. परंतु बायकोसाठी तो स्वतःच्या नाटकांच्या प्रयोगांनासुद्धा जात नसे. आर्थिक परिस्थिती ढासळली नसती तर, त्यानं नोकरीसुद्धा केव्हाच सोडून दिली असती.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यानं बायकोला तावडतोब इस्पितळात पाठवली नाही. १९०३ पासून १९१९ पर्यंत तब्बल सोळा वर्षं त्यानं बायकोवर घरीच उपचार केले आणि तिला सांभाळली. बापाला आईच्या वेडाचा फार त्रास होतो म्हणून मुलं त्यांच्याविषयी सहानुभूतीनं वागायची तर याचांसुद्धा अँतोनिएताला राग येई. एकदा तर जेवायला वाढलं असताना अँतोनिएता आपल्या मुलीच्या – लिएताच्या – अंगावर चवताळून धावून गेली. म्हणाली– 'तुम्ही मला विष घालाल. तुम्ही मला विष घालणारच आहात. हे अन्न कुणी शिजवलं? तू. तूच ना? तर तू खा. तू माझ्या आधी हे खा. मगच मी जेवीन. रोज माझ्यासमोर माझ्या आधी जेवायचं. मगच मी जेवीन–समजलं? समजलं?...' इत्यादी. लिएता शेवटी कंटाळली आणि आईला – अँतोनिएताला – इस्पितळात कायमचं पोचवल्यानंतरच परत आली. अँतोनिएता १९१९ मध्ये इस्पितळात गेली ती शेवटपर्यंत तिथेच राहिली. त्या इस्पितळातच तिचा १९५९ साली मृत्यू झाला.

सोळा वर्षांच्या या छळपूर्ण काळात वेदनांचे आणखीही काही डंख पिरँदेलोला सोसावे लागले. १९१५ मध्ये पिरँदेलोची आई वारली. म्हणजे मुलगी–लिएता– घर सोडून गेली आणि आई वारली. भयाण एकान्तात सोबत फक्त वेड्या पत्नीची. याशिवाय थोरला मुलगा स्टीफानो १९१४–१९१८ च्या युद्धात युद्धकैदी म्हणून पकडला गेला तो युद्ध संपेपर्यंत कैदेतच होता. याच घटनेमुळं अँतोनिएताचं वेडसुद्धा हाताबाहेर गेलं.

तो स्वतः चारित्र्यवान होता आणि त्याच्या बायकोच्या दृष्टीनं तो चारित्र्यहीन होता. कौटुंबिक जीवनाच्या मर्यादित वर्तुळातच त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे हे दोन पदर दोन मुखवट्यासारखे झाले होते. ह्या व्यक्तित्वभंगाचं दारुण दुःख त्यानं बारा महिने चोवीस तास असं तब्बल सोळा वर्षं भोगलं. दुसरा कुणीही त्याच्या जागी असता, तर कधीच मोडून फुटून गेला असता. पण पिरँदेलोचं व्यक्तिमत्त्व पाणी पाजलेल्या पक्क्या धातूचं बनवलेलं होतं, म्हणूनच टिकलं. अभंग राहिलं. या कौटुंबिक रूपभंगाच्या पलीकडं जाऊन जगानं आणखीही काही रूपांचे आरोप पिरँदेलोवर केले. शोभायंत्रातल्याप्रमाणं त्याची अनेक रूपं लोकांना दिसली. पिरँदेलो म्हणतो, 'प्रत्येकाची अशी रूपं जगात तयार होतात. यांना तो 'नागवे मुखवटे' म्हणतो. या मुखवट्यांच्या जगात तग धरून राहायचं असेल, तर आपण स्वतःसुद्धा आपल्याबद्दलचं एक अयोनिसंभव रूप कल्पून ठेवायला लागतं आणि या रूपाशी प्रामाणिक राहून जीवन क्रमावं लागतं,' असं तो सुचवतो.

१९१९ मध्ये पिरँदेलोनं अँतोनिएताला वेड्यांच्या इस्पितळात पाठविल्यानंतर त्याची मुलगी लिएत्ता परत घरी राहायला आली. आता पिरँदेलोला थोडा निवांतपणा मिळाला आणि १९२१ साली 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे' हे त्याचं नाटक रंगभूमीवर आलं. १९२४ पर्यंत त्या नाटकाची जवळ जवळ सर्व भाषांत भाषांतरं झाली आणि अमेरिकेपासून जपानपर्यंत जगभर प्रयोग झाले.

'एन्रिको क्वार्टो' (चौथा हेन्री) ही त्याची सर्वश्रेष्ठ नाट्यकृती. 'सहा पात्रे' च्या पाठोपाठ, पुढल्याच वर्षी (१९२२) हे


पॅपिलॉन
पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

नाटच रंगभूमीवर आलं आणि त्याचेही साऱ्या युरोपात प्रयोग झाले. पुढे अमेरिकेत आणि साऱ्या जगात या दोन्ही नाटकांनी धमाल उडवून दिली. नाटचलेखनातून होणाऱ्या प्राप्तीमुळं नावडता शिक्षकी-पेशा शेवटी एकदाचा त्याला सोडून देता आला. शिक्षकी सोडून द्यावी आणि अॅग्रिजेंटोला येऊन आपल्या घरी, निसर्गसान्निध्यात राहून लेखन करावं हे त्याचं कित्येक वर्षांचं स्वप्न होतं. आता अॅग्रिजेंटोला नाही, तरी रोममध्ये आपल्या राहत्या घरी, आपल्या कुटुंबियांसमवेत शांतपणानं लेखन करीत राहणं त्याला शक्य झालं.

१९२१ ते १९२५ हा पिरँदेलोचा नाटचलेखनाचा उत्कर्षकाल. या काळात त्यानं अक्षरशः झपाटल्यासारखी नाटकं लिहिली. ' सहा पात्रे ' आणि ' चौथा हेन्री ' ही विख्यात नाटकं तर त्यानं लागोपाठ पाच आठवडचांत लिहून पूर्ण केली असं म्हणतात—' सहा पात्रे ' तीन आठवडचांत आणि पुढच्याच दोन आठवडचांत ' चौथा हेन्री ' एका वर्षात नऊ नाटकं त्यानं लिहिल्याची नोंद आहे. एक नाटक तर सहा दिवसांत आणि ' विचार करा ज्याकोमिनो ' हे नाटक तर तीनच दिवसांत पूर्ण केल्याचं सांगतात. हा लेखनाचा झपाटा विलक्षणच म्हटला पाहिजे.

१९२५ नंतरसुद्धा पिरँदेलोनं अनेक नाटकं लिहिली. परंतु त्यांना म्हणावं तितकं यश मिळालं नाही. नाही म्हणायला त्याच्या १९३० मध्ये लिहिलेल्या ' As You Desire Me ' या नाटकावर आधारित एक चित्रपट हॉलिवुडनं प्रकाशित केला. या चित्रपटात ग्रेटा गार्बो या लावण्यवती अभिनेत्रीची प्रमुख भूमिका होती.

१९२० नंतरच्या काळात दोनच नाटककारांची नावं जगभर गाजत राहिली. एक बर्नार्ड शॉ आणि दुसरा पिरँदेलो. १९३४ साली पिरँदेलोला नोबेल पारितोषिक मिळालं तेव्हा जगभरच्या नाटचप्रेमी रसिकांना स्वतःचाच गौरव झाल्याइतका आनंद झाला. रेडिओचा संशोधक मार्कोनी या इटालिअन शास्त्रज्ञानं पिरँदेलोचं नाव नोबेल पारितोषिकासाठी सुचवलं, आणि ज्या वर्षी नाव सुचवलं त्याच वर्षी ते मंजूर झालं. असा योग विरळा असतो असं पारितोषिक कमिटीनं अभिमानानं म्हटलं आहे.

नाटचप्रयोगांनी खूप यश आणि पैसा मिळाला तेव्हा १९२५ मध्ये पिरँदेलोनं रोममध्ये स्वतःची नाटक कंपनी स्थापन केली. याच वर्षी रोममधल्या तिएत्रो द आर्तमध्ये कलादिग्दर्शक म्हणूनही काम करू लागला. आपली स्वतःची कंपनी घेऊन स्वतःचीच नाटकं करीत तो युरोपभर फिरला. या उपक्रमात त्याला प्रचंड यश आणि लोकप्रियता मिळाली, परंतु भलतीच आर्थिक तूट आली.

आयुष्याच्या शेवटी शेवटी त्याच्या आयुष्यात आणखी दोन महत्त्वाच्या व्यक्तींनी आपला प्रभाव पाडला, आणि त्याला आपलंसं करून घेतलं—एक इटलीचा हुकूमशहा मुसोलिनी आणि दुसरी मार्ता आबा. आयुष्याच्या शेवटची बाराएक वर्षं पिरँदेलो मुसोलिनीच्या फॅसिस्ट पक्षाचा सभासद होता. दोघांच्या अनेक वेळा भेटी झाल्या आणि दोघांनी एकमेकांची बेफाट स्तुतीही केली. पिरँदेलोनं स्वतःची नाटक कंपनी स्थापन केली तेव्हा मुसोलिनीनं (नेहमीप्रमाणं) शब्द-सुमनांचा त्याच्यावर वर्षाव केला, पण (हेही नेहमीप्रमाणंच !) त्याला कंपनीच्या यशासाठी पैशाची मदत मात्र केली नाही. मात्र पिरँदेलोच्या जागतिक कीर्तीचा मुसोलिनीनं स्वतःच्या फॅसिस्ट तत्त्वज्ञानाच्या प्रचारासाठी उपयोग करून घेतला. दुसरं जागतिक युद्ध सुरू झाल्यानंतर पिरँदेलोनं जाहीर भाषण करून मुसोलिनीला आपला पाठिंबा दिला. यानंतर एकदाच पिरँदेलो मुसोलिनीशी भांडला. पण हे भांडण इतक्या लवकर आणि इतक्या सहज मिटलं की, त्याला प्रेमकलहाचंच स्वरूप आलं. बारा वर्षांत दोघात झालेलं हे एकमेव भांडण. या फॅसिस्टधार्जिणेपणामुळं युरोपमधल्या देशांतून पिरँदेलोवरच्या प्रेमाला ओहोटी लागली, आणि मुसोलिनीनं अॅबिसिनीयावर आक्रमण केलं तेव्हा तर, पिरँदेलोनं त्याला नोबेल पारितोषिकाबरोबर मिळालेलं सोन्याचं पदकसुद्धा विकून टाकलं. या त्याच्या कृत्यामुळं तर त्याच्या-बद्दल युरोपात संतापाची लाटच उसळली. असला ' अधर्म ' आजवर कुणी केला नव्हता. म्हणूनच पिरँदेलोच्या बहुतेक चरित्रांतून या फॅसिझम-प्रकरणावर एकही शब्द लिहिलेला आढळत नाही. सर्वच चरित्रकारांनी एकजात मौन पाळलेलं दिसतं. १९६३ साली गास्पेर ज्यूदीस या लेखकानं पिरँदेलोचं चरित्र लिहून प्रसिद्ध केलं. त्यात या प्रकरणाचं (आणि मार्ता आबाच्या प्रकरणाचंही) तपशीलवार वर्णन आलेलं आहे. म्हणजे पिरँदेलोच्या मृत्यूनंतर तब्बल सत्तावीस वर्षांनी!

पिरँदेलोच्या बायकोनं त्याच्यावर ' चरित्रहीन ' म्हणून अनेकवेळा आरोप केले (तो मुलींच्या शाळेत शिकवत होता हेसुद्धा एक कारण होतंच !) तरीसुद्धा त्याचं खासगी जीवन अगदी एकलकोंडं होतं. जिच्याशी कोवळ्या वयात एंगेजमेंट झाली होती ती लीना आणि बॉनमधली जर्मन युवती जेनी शुल्झलँडर, या दोघी त्याच्या विवाह-पूर्व आयुष्यातल्या स्त्रिया. वैवाहिक जीवनातल्या काळात, बायकोला वेडचांच्या इस्पितळात पोहोचवीपर्यंत एकही स्त्री नाही आणि त्यानंतर फक्त एकच—मार्ता आबा. १९२५ मध्ये मिलानमधल्या एका नाटचगृहात पिरँदेलोनं प्रथम तिला पाहिली. त्यावेळी ती फारशी प्रसिद्धी न मिळालेली एक तरुण अभिनेत्री होती. पिरँदेलोनं तिला मिलानहून रोमला आणली—आपल्या स्वतःच्या कंपनीत काम करण्या-साठी—तिला त्यानं आपल्या नाटकांतून मुख्य भूमिका दिल्या. आपल्या नव्या नाटकातल्या प्रमुख स्त्रीभूमिकांच्या व्यक्तिरेखा घडवताना मार्ता आबाच्या व्यक्तिमत्त्वाशी मिळत्याजुळत्या अशा त्या घडवल्या आणि आपल्या मृत्युपत्रात आपल्या नऊ नाटकांचे हक्क तिला देऊन टाकले. (त्याच्या एकूण नाटकांची संख्या जवळपास चाळीस आहे.)

मात्र एवढं झालं तरी, पिरँदेलोचे तिच्याशी असलेले संबंध अगदी शुद्ध, पवित्र असेच होते. त्याची तिच्यावरची प्रीती केवळ अशरीरिणी होती. दोघांच्या या लोकविलक्षण पवित्र संबंधांबद्दलच्या हकीकती मुसोलिनीच्या कानांवर गेल्या तेव्हा तो चावटपणानं म्हणाला – ' हा झोपत का नाही तिच्याबरोबर !' हे पिरँदेलोला समजलं तेव्हा त्याला राहवलं नाही. तो एकदम बोलून गेला– ' मुसोलिनी हलकट आहे... ' मुसोलिनीबद्दल काढलेला हा एकमेव अनुदार उद्गार !

तेराव्या शतकात होऊन गेला इटलीचा एक महाकवी—डाँटे. या डाँटेची होती एक रहस्यमय अनोखी प्रेयसी—बिएत्रीस. पिरँदेलो हा अर्वाचीन इटलीचा डाँटे होता आणि मार्ता आबा ही त्याची अर्वाचीन बिएत्रीस होती. फरक एवढाच की, बिएत्रीस ही कदाचित खरोखरीची स्त्री नसून डाँटेला पडलेलं ते एक आदर्शवादी स्वप्न होतं, तर मार्ता आबा ही अभिनयगुणसंपन्न अशी खरोखरीची सुंदर स्त्री होती. सुंदर स्वप्नावर करावं तसं प्रेम डाँटेनं केलं, तर कन्येवर

करावं तसं प्रेम (कदाचित) पिरँदेलोनं केलं.

वरवर पाहता पिरँदेलोचं जीवन शांत, सरळ, राजनिष्ठेनं भरलेलं असं दिसतं. आयुष्याची शेवटची वर्षं तो पश्चिम युरोपमधल्या हॉटेलांतूनच बराच राहिला. लेखन आणि प्रवास या दोनच गोष्टी त्यानं केल्या. नाटकांनासुद्धा तो क्वचितच जात असे. कारण त्यावेळी तो बहुधा आपल्या खोलीत शांत झोपलेला असे. सकाळी लवकर उठून दुपारी बारापर्यंत लिहीत बसावं, जेवावं, संध्याकाळी साडेपाच-पर्यंत वाचन, अध्ययन करावं, नंतर पायी थोडा फेरफटका मारून यावं, सायंकाळचं जेवण कुटुंबियांबरोबर गप्पा मारीत मारीत उरकावं आणि मग झोपी जावं, असा त्याचा साधा, संयत दिनक्रम होता. तो आपल्या आयुष्याबद्दल बोलताना म्हणतो– 'पाहिलंत ? खास करून काही सांगावं असं माझ्या आयुष्यात काही नाहीच; जे काही आहे ते सगळं आत आहे, आत ! माझ्या लेखनात ! आणि माझ्या विचारात ! आणि माझं लेखन काय किंवा विचार काय, त्यात आनंददायक असं काहीच नाही... '

रोममधल्या आपल्या राहत्या घरी, दोनएक दिवस किरकोळ आजाराचं निमित्त होऊन, तो अचानक पण शांतपणानं निधन पावला. (१० डिसेंबर १९३६). आयुष्यभर अत्यंत साधेपणानं, जवळजवळ संन्यस्त वृत्तीनंच, तो जगला. हाच साधेपणा मरतेसमयी त्यानं व्यक्त केलेल्या त्याच्या शेवटच्या इच्छेतही दिसतो. 'माझी मृत्युयात्रा अगदी साधी असू द्या. कुठलाही, कसलाही डामडौल नको. एक शवपेटी, एक घोडा आणि एक गाडीवान– बस्स !'

तो पुष्कळदा गमतीनं म्हणायचा– 'माणूस एक लिहितो तरी किंवा जगतो तरी !' त्याच्या नशिबात नुसतं लिहिणंच होतं. जगण्या-तली मस्त मजा त्याला कधी उपभोगताच आली नाही. बायकोच्या लोकविलक्षण मानसिक स्थितीमुळं ऐन उमेदीचं त्याचं सगळं जगणंच जखडबंद करून टाकलं होतं. मुक्त असून बंदिवानाच्या यातना त्याला भोगाव्या लागल्या. या बंदिवासातून लेखनानंच त्याला मुक्ती दिली. म्हणूनच उकळणाऱ्या यातनांचे कढचे कढ त्याच्या लेखनातून बाहेर पडले. त्याची शोकात्म नाटकें भयंकर भीषण वाटतात आणि त्याची गमतीदार प्रसंगांनी भरपूर असलेली नाटकंसुद्धा जहाल आणि तिखट वाटतात ती त्यामुळंच. 'तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. (तुम्हाला तसं वाटत असेल तर)' या त्याच्या नाटकात कुटाळ चौकशी करून गावगप्पा मारण्यात आणि निंदानालस्ती करण्यात धन्यता मानणाऱ्या गावमावश्यांची टर उडवलेली आहे. तरीसुद्धा ज्यांची निंदा त्या करीत राहतात त्यांच्या विलक्षण दुःखाचे कढ नाटकात उफाळत राहतात. एकेकाचं आयुष्य किती विचित्र प्रकारच्या दुःखांनी भरलेलं असू शकतं याचं विदारक चित्र आपल्यापुढं उभं करून नाटककार आप-ल्याला हसवता हसवता चकित–भयभीत करून सोडतो. 'चौथा हेन्री' (एन्रिको क्वार्तो) मधला नवरा चौथ्या हेन्रीचा मुखवटा चढवतो आणि वेडाचा झटका येऊन आपण खरोखरीच चौथा हेन्री आहोत असं त्याला वाटू लागतं. वेडाचा झटका ओसरल्यावरदेखील आपल्याला फसवणाऱ्या आपल्या प्रेयसीकडं जाण्याऐवजी त्या वेडातच स्वतःला कोंडून घेणं चांगलं, असं त्याला वाटतं आणि तो आणखी आठ वर्षं (पहिली बारा आणि ही आठ अशी एकंदर वीस वर्षं !!) वेड्याचं– चौथ्या हेन्रीचं सोंग चालू ठेवतो. वीस वर्षांनी त्याची प्रेयसी, तिचा प्रियकर आणि त्यांची मुलगी त्याला भेटायला येतात. इथे सुरू होणारे नाटक गमतीदार प्रसंगांची वळणं घेत पुढं जाऊ लागतं तसतसं-नायकाचं दुःख गडद होऊन उकळू लागतं. इतकं भय-भीत करून सोडणारं, दुःखाकुल करून सोडणारं दुसरं नाटक कुणीही लिहिलं नसेल. म्हणूनच 'सहा पात्रे 'पेक्षाही हे नाटक नाटयकृती म्हणून श्रेष्ठ आहे, असं मला वाटतं.


अशा सगळ्या त्याच्या नाटकातून मत्सर, संशय, प्रतारणा हे विषय तर आहेतच, शिवाय माणूस खरोखरी कसा असतो ? तुम्हाला वाटतं तसा असतो, की त्याला स्वतःला वाटतो तसा असतो, की लोकांना वाटतं तसा असतो ? असे प्रश्न तो नाटकानाटकांतून उभे करतो आणि त्याची उत्तरं देण्याचं टाळतो. अनुत्तरित राहणारे हे प्रश्न आपल्याला अस्वस्थ करतात, अक्षरशः पिसाळून टाकतात. शेवटी खरं काय ? सत्य कोणतं ? कसं असतं ? आयुष्याला काही अर्थ आहे काय ? की सगळं निरर्थकच आहे ? मग आपल्याला अधूनमधून काही अर्थ जाणवत राहतात त्यांचं या रहस्यशोधाच्या ज्ञानप्रवासात नेमकं स्थान कोणतं ? की ते केवळ स्वप्नवत्, फक्त भासच असतात ?

एक लेखकानं पिरँदेलोची तुलना टी. एस. ईलियट या कवीशी केली आहे. ईलियटच्या 'वेस्ट लँड' आणि इतर कवितांनी जुन्या कवितेचा साचाढाचा पार मोडूनच टाकला. आणि त्यानंतर पन्नास-पंचावन्न वर्षं होऊन गेली, तब्बल अर्धशतक उलटून गेलं, तरी कवितालेखनाचा, काव्यरूपाचा नवा ढाचा अजून कुणालाही सापड-लेला नाही. ईलियटनं काव्यक्षेत्रात जे केलं, पिकासोनं चित्रकलेच्या क्षेत्रात जे केलं, तेच पिरँदेलोनं नाटयक्षेत्रात केलं. ईलियटसारख्या समदर्शी, समभावी कलावंतानं पिरँदेलोविषयी जे म्हटलं आहे ते म्हणूनच अत्यंत औचित्यपूर्ण, सत्यदर्शी आणि नेमकं असं आहे. ईलियट म्हणतो–

'पिरँदेलो हा असा एक नाटककार आहे की, माझ्या पिढीनं आणि पुढच्या पिढ्यांनीही त्याचं ऋण कृतज्ञतापूर्वक मान्य केलं पाहिजे. आपल्या समस्या काय आहेत हे त्यानं आपल्याला शिकवलं आहे आणि या समस्यांची उत्तरं आपण कुठं शोधली पाहिजेत हेही त्यानं सुचवून ठेवलं आहे. आपल्या उदाहरणानं त्यानं दाखवून दिलं आहे की, निरीक्षणवादी वास्तववादाच्या पोलादी पकडीतून रंग-भूमीला वाचवायचं असेल तर, कृतकवृत्तिक 'काव्यमय' नाटयप्रयोग करून चालणार नाही किंवा फिक्कट रक्तहीन कल्पनांवर आधार-लेली आभासनाटयंही करून चालणार नाही... वास्तववादाला भेदून अस्सल वास्तवाला कसं सामोरं जावं हे त्यानं धैर्यानं आणि कल्पक-तेनं दाखवून दिलेलं आहे... '

म्हणूनच आधुनिक प्रायोगिक रंगभूमीचा जनक म्हणून आज पिरँदेलोचा गौरवनिर्देश केला जातो. न–नाटयाला (Absurd Drama ला) जगभरच्या रंगभूमीवर जो आज बहर आलेला दिसतो आहे त्याचं आद्यबीज त्याच्या नाटयकृतीतून आहे. परंतु केवळ अग्रक्रमानंच त्याची नाटकं श्रेष्ठ ठरतात असं नव्हे, तर कलात्मक मूल्यांच्या कसोटीवरसुद्धा त्याची नाटकं कसदार आणि श्रेष्ठ दर्जाची ठरतात, हे विसरून चालणार नाही.

[ क्रमशः ]



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

## पु. ल. इनामदार

### प्रकरण दहा : तर्कनिवेदने ( चालू )

तीस डिसेंबर १९४८ ला, गुरुवारी सकाळी लालकिल्ल्यात जाताना आम्ही दर्यागंजच्या रस्त्यानेच गेलो व जामा मशिदीच्या समोरून जाताना, मला नकळतच, मी मशिदीकडे बघून पुन्हा मान लववली होती ! मी कोर्टात पोचताच, काहींनी मला पुन्हा तोच प्रश्न विचारला होता की, 'काय, मी आज ही केस संपविणार की नाही ?' पण मी चिडलेल्या मनःस्थितीत नव्हतो. मी शांतपणे उत्तर दिले, 'कसे काय जमते ते पाहतो, प्रयत्न करीन.' जास्त काही न बोलता मी माझे कागद काढून माझ्या तर्कनिवेदनाचे सूत्र कोठून व कसे सुरू करायचे याची जुळवाजुळव करायला लागलो. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे कोर्ट येऊन, कोर्टाचे कामकाज चालू होताच, मी उभा राहिलो नि अभियोग साक्षीदार क्रमांक ४३ गरीबा टांगेवाला व क्रमांक ४४ जुम्मनखान यांच्या साक्षीबद्दल बोलायला लागलो. कालच्या भाषणातले मुद्दे पुन्हा उजळायाचे म्हणून सांगायला सुरुवात केली. गरीबा टांगेवाल्याचे खरोखरीचे पाहुणे–पुण्यामुंबईचे पाहुणे–मुंबईकडून आलेले होते. मध्यरात्री ग्वाल्हेरला आलेले होते. त्यांपैकी एकजण ग्वाल्हेरला डॉ. परचुऱ्यांकडे जाणारे होते. दुसरे आपटेसारखे दिसणारे होते. हे पाहुणे महात्मा गांधींच्या हत्येच्या दोन–तीन दिवसांपूर्वी आले होते. ही सगळी वस्तुस्थिती ते पाहुणे नथूराम व आपटे होते असे गरीबा किंवा जुम्मनखानाने सांगावे, याला कारण माझ्या दृष्टीने मुंबई–वरळी केंद्राची हवा खायला मिळालेल्या त्या गुप्त विभागाची जादूगिरी आहे. एरवी साक्षीदार गरीबाची साक्ष कशी अभियोगपक्षाच्या कहाणीच्या विरुद्ध, म्हणजे नथूराम व आपटे दिल्लीहून ग्वाल्हेरला आले या घटनेशी विसंगत आहे याचे स्मरण दिले. त्या हिवाळ्याच्या दिवसांत दिल्लीहून ग्वाल्हेरला यायला सोयीची गाडी म्हणजे अमृतसर–मुंबई एक्स्प्रसने दिल्लीहून रात्री दहाच्या सुमारास निघायचे नि रात्रभर गाडीत झोप काढून पहाटेच्या वेळी ग्वाल्हेरला उतरायचे. माझ्याजवळ रेल्वेची समयसारिणी होतीच. तीमधून दिल्ली–ग्वाल्हेरच्या रात्रीच्या गाड्यांच्या वेळा जज्जमहोदयांनी पाहाव्या म्हणून ते पुस्तक मी जज्जमहोदयांच्या हातात दिले. ती समयसारिणी एप्रिल १९४८ च्या अगोदरच्या महिन्यातली होती. जज्जमहोदयांनी ती घेऊन दोन्हीकडची दिल्ली–भोपाळ व भोपाळ–दिल्ली अशी पाने उघडून पाहिली ह्याकडे माझे लक्ष होतेच, पण माझे बोलणे चालूच होते. मी म्हणत होतो की, 'दिल्लीहून निघून ग्वाल्हेरला यायला अमृतसर–मुंबई एक्सप्रेस 'अप' गाडीच सोयीची आहे. पोलिस-इन्स्पेक्टर मंडलीकदेखील याच गाडीने ग्वाल्हेरला आल्याचे गरीबा साक्षीदार सांगत आहे. या गाडीला गरीबा 'बम्बई एक्सप्रेस' असे म्हणतो. ग्वाल्हेरला सगळे टांगेवाले, हमाल याच नावाने गाड्या ओळखतात. ग्रॅण्ड ट्रंक एक्सप्रेसला मद्रास एक्सप्रेस म्हणतात. ही नावे आपल्याला (जज्जमहोदयांना) समयसारिणीत मिळणार नाहीत, पण मी ही मनची कहाणी नाही सांगत. अभियोगपक्षाचा साक्षीदार क्रमांक ८० गोळवलकरच सांगत आहे आपल्याला असे म्हणून मी साक्षीदार गोळवलकराच्या साक्षीचे पान उघडले व त्याच्या साक्षीतल्या कूटपरीक्षणाचा भाग जज्जमहोदयांना बघायला विनंती केली. मी म्हणत होतो की, गोळवलकरच सांगत आहे की, ग्वाल्हेरचे टांगेवाले मुंबई–अमृतसर एक्सप्रेसला बम्बई एक्सप्रेस म्हणतात, ग्रॅंड ट्रंक एक्सप्रेसला मद्रास एक्सप्रेस म्हणतात. ग्वाल्हेरला एकच प्लॅटफॉर्म–उतारा आहे. सगळ्या अप व डाऊन गाड्या याच उताऱ्यावर थांबतात. टांगेवाले प्रथम व द्वितीय श्रेणीच्या मोठ्या

फाटकाजवळ सवारी मिळवायला गर्दी करतात. तेथे त्यांना गाडी कुणीकडून आली, झांशीकडून की आम्याकडून हे दिसते. 'पण हे गोळवलकर माझी–मला हवी असलेली साक्ष द्यायला नव्हते आले, ते आले होते पोलिसचे साक्षीदार म्हणून. पण मग यांना साक्षीदार क्रमांक ४३ व ४४ च्या अनुक्रमात कोर्टापुढे उभे न करता तब्बल ३५ साक्षीदार आणखी होऊन गेल्यानंतर म्हणजे दीड महिन्यानंतर दि. ३०–८–४८ ला का आणले? त्याची कथा मी आपणाला सांगतो!' असे म्हणून गोळवलकर साक्षीदार हा प्रथम-द्वितीय श्रेणीची तिकिटे विकणारा. त्या जानेवारी १९४८ महिन्यातला बुकिंग-क्लार्क म्हणून साक्षीला यायचा होता व पोलिसांच्या अपेक्षे-प्रमाणे तो सांगणार होता की, 'दिनांक २८ जानेवारीला मी ग्वाल्हेरहून दिल्लीची द्वितीय श्रेणीची सात तिकिटे विकली व त्यांपैकी दोन एकाच प्रवाशाला विकली व तो प्रवासी म्हणजे आपटे'– पोलिसांचे साक्षीदार म्हणून आलेले रेल्वेचे सगळेच कर्मचारी एकदाच ओझरते पाहिलेल्या प्रवाशांना पटापट ओळखत होते. पण एकीकडे तीस तारखेनंतर नथूरामच्या बिछान्यामध्ये अभियोग प्रदर्श क्र. ६१ प्रमाणे एकच द्वितीय श्रेणी वर्गाचे तिकीट मिळाले होते व 'तिकिटे विकत घेणाऱ्या प्रवाशांचे चेहरे न्याहाळायचे काम मी करीत नाही. मला वेळच नसतो,' असे म्हणून गोळवलकरमहाशयांनी ओळख-परेडची कवाईत करायला शिकण्याचे नाकारले होते, हे खरे कारण या गोळवलकरांच्या गरीबाच्या पाठोपाठ साक्षीला न येण्याचे. पण गोळवलकर त्यानंतर दीड महिन्याने दि. ३०–८–४८ ला साक्षीला आले ते भलतीच गोष्ट–त्यांच्या कामाशी संबंध नसलेली गोष्ट–सिद्ध करायला. या साक्षीदाराला अभियोगपक्षाने आणले, कारण त्याचे नाव साक्षीदारांच्या नामसूचीमध्ये होतेच. पण या तिकिटविक्रीच्या साक्षीदाराने तिकिटविक्रीसंबंधाने एकही शब्द न बोलता तो घेऊन आला, ग्वाल्हेरच्या असिस्टंट स्टेशनमास्तरचे लिहायचे 'स्टेशनवर गाड्यांच्या आल्या-गेल्या वेळाचे नोंदणी-बुक' व त्याकडे बघून त्याने सांगितले की, 'दिनांक २७–२८ जानेवारी रात्री ग्वाल्हेर स्टेशनवर डाऊन मुंबई–अमृतसर एक्सप्रेस व अप दिल्ली–मद्रास ग्रॅण्ड ट्रंक एक्सप्रेस दोन्ही थोड्या थोड्या उशीराने आल्या व रात्री बाराच्या सुमारास आल्या. या साक्षीदाराद्वारा अभियोगपक्षाचा उद्देश गरीबाने पाहुण्यांची गाडी ओळखण्यात चूक केली, असे ध्वनित करण्याचा होता, पण मी कूटपरीक्षणामधून हे दाखविले की, ज्या नोंदवहीवरून साक्षीदार सांगत होता ती वही त्याची लिहिलेली नाही. ती नोंदवही लिहिणारे असिस्टंट स्टेशनमास्तर दुबे ग्वाल्हेर स्टेशनवर काम करीत होते आणि त्यांचे ऑफिस गोळवल-कराच्या बुकिंग ऑफिसपासून तीस यार्ड अंतरावर दुसऱ्या इमारतीत आहे. म्हणजे गोळवलकर हा दुसऱ्याने लिहिलेले लिखाण वाचणारा साक्षीदार आहे, प्रत्यक्ष साक्षीदार नाही. याची साक्ष अभियोगपक्षाला उपयोगी नाही. पण गोळवलकराने सांगितले होते की, ग्वाल्हेर-स्टेशनवर प्रथम श्रेणी प्रवासी फाटकाशेजारी सवारी मिळवायला गर्दी करतात की नाही, हे त्याला माहीत नाही, पण त्या दिवसांत ग्वाल्हेरला एकच प्लॅटफार्म होता. तेव्हा गरीबा म्हणत होता की, त्याची सवारी मुंबईकडून येणाऱ्या गाडीने आली हे खोटे नाही. त्याची सवारी कोण होती याविषयी वाद आहे. या ठिकाणी गरीबा साक्षीदाराच्या चुकीची दुरुस्ती गोळवलकराच्या बेकायदेशीर साक्षीने दुरुस्त करण्याचा प्रयत्न अभियोगपक्षाने केला आहे, हे कोर्टाला स्पष्टपणे सांगितले व या विषयावरचे माझे भाषण आवरते घेतले. मी घड्याळाकडे बघितले, तर मला घाई करायला हवी असे लक्षात आले. म्हणून मी ग्वाल्हेरचे मॅजिस्ट्रेट श्री. राजबहादुर अटल अभियोग साक्षीदार क्रमांक ५६ यांच्या साक्षीकडे देवाचे नाव घेत वळलो.

याविषयी माझी तयारी सगळी लिहिलेली होती, तोच क्रम घेऊन साक्षीदार श्री. अटल यांनी कोर्टासमोर आणलेला डॉ. परचुऱ्यांचा कथित कबुलीजबाब प्रदर्श क्र. ८६ कसा बेकायदेशीर आहे, साक्षी-मध्ये घ्यायला कसा अग्राह्य आहे, कसा भरवसा ठेवण्यालायक नाही हे दाखवायला लागलो. महात्मा गांधी खून खटल्यामध्ये पोलिसांच्या चौकशी-अधिकाऱ्यांनी मिळविलेला व न्यायालयीन दंडाधिकाऱ्याने मॅजिस्ट्रेट हस्ताक्षरित केलेला हा कबुलीजबाबाचा दस्तावेज–लेख–मी लालकिल्ल्यातील खास न्यायालयापुढे 'बेकायदेशीर, अग्राह्य, अविश्वसनीय, खोटा व दमदाटी करून घेतलेला आहे' असे म्हणत होतो याची मला पूर्ण जाणीव व जबाबदारी कळत होती व म्हणूनच देवाची करुणा भाकून व त्याच्या निष्पक्ष न्यायावर विश्वास ठेवून ही जबाबदारी उचलण्याचे धैर्य मी करीत होतो. माझ्या वाचकांच्या सोयीसाठी त्या दिवशी म्हणजे ३० डिसेंबर १९४८ ला जज्ज आत्म-चरणजींसमोर जे मुद्दे मांडले त्यांपैकी काही महत्त्वाच्या मुद्यांचा क्रमवार खुलासा मी येथे देतो.

१ : श्री. अटल महोदय यांना सिंधियाज आर्टिकल्स ऑफ वॉर या कायद्याने शासित, सैनिकी अधिकारी मेजर छत्रे यांच्या अधिकारा-खाली असलेल्या ग्वाल्हेरच्या किल्ल्यासंबंधी, दिवाणी व्यवहाराचे किंवा अपराधसंबंधी दंडाधिकाऱ्याचे न्यायिक अधिकार काही नव्हते. ग्वाल्हेरचा किल्ला हा कसबा ग्वाल्हेर कोर्टाच्या अधिकार क्षेत्रामध्येही नव्हता असे ग्वाल्हेर शासन राजपत्र दि. २९-१२-१९१७ सांगत होते. श्री. अटलमहोदयांना मॅजिस्ट्रेटचे जे अधिकार होते ते जातीय दंग्यासंबंधी अपराधापुरते व जातीय दंगाग्रस्त क्षेत्रापुरते मर्यादित होते. हा खून खटला जातीय दंग्याचा नव्हता किंवा ग्वाल्हेरचा किल्ला हे जातीय दंगाग्रस्त घोषित क्षेत्र नव्हते. अटलांचे ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर जाणे म्हणजे आपल्या अधिकारक्षेत्राची लक्ष्मणरेषा ओलांडून बाहेर जाण्यासारखे होते व अशा ठिकाणी ते आपले मॅजि-स्ट्रेटचे अधिकारयुक्त अधिकारी म्हणून काही कार्य करू शकत नव्हते. कबुलीजबाब प्रदर्श क्र. ८६ हा मॅजिस्ट्रेटचे अधिकार नसलेल्या व आपल्या अधिकारक्षेत्राबाहेर असलेल्या ठिकाणी एका सामान्य व्यक्तीने हस्ताक्षरित केलेला लेख आहे असे म्हटले पाहिजे.

२ : अटलमहोदयांचे म्हणणे की, 'डॉक्टर परचुऱ्यांना लष्करमध्ये माझ्या कोर्टात आणणे शक्य नव्हते कारण पोलिसांना भीती वाटत होती की, डॉ. परचुऱ्यांना बघून निदर्शने होतील.' हे कारणही बरोबर नव्हते. अटलांचे कोर्ट हे, भिंतीचे आवार असलेल्या, पोलिस बंदोबस्त करता येण्याजोग्या हायकोर्टच्या इमारतीत होते. याशिवाय पोलिसांनी डॉ. परचुऱ्यांना दि. १७-२-४८ रोजी मुरारच्या कोर्टात नेले होतेच आणि दि. २०-२-४८ ला हायकोर्टमधल्या कसबा ग्वाल्हेर कोर्टातही आणले होते. मग कबुलीजबाबाच्या दिनांक १८-२-४८

लाच निदर्शने होतील ही भीती मुळीच योग्य व खरी नव्हती. शिवाय निदर्शने करणारे हिंदुसभाई तर, सगळे आधीच म्हणजे २-२-४८ पासूनच पकडले गेले होते, मग निदर्शने कोण करणार होते?

३ : डॉ. परचुरे हे २-२-४८ पासून १८-२-४८ पर्यंत ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर सैनिक अधिकारी मेजर छत्रे यांच्या ताब्यात होते असे म्हटले जाते, मग या मेजर छत्रे यांना डॉ. परचुऱ्यांची कैद ही कायदेशीर हुकूमाने होती हे दाखवायला ते कबुजबाब स्वेच्छेने व भीती किंवा दबाव किंवा प्रलोभनामुळे देत नव्हते हे सिद्ध करायला साक्षीत का नाही आणले? पोलिस ऑफिसरांनी दि. १६-२-४८ ला डॉ. परचुऱ्यांचे प्रश्नपरीक्षण किल्ल्यावरच्या औषध वितरण कक्षेमध्ये डिस्पेन्सरी रूममध्ये केले होते, मग दि. १८-२-४८ ला डॉक्टरांची प्रकृती ठीक होती हे सिद्ध करायला किल्ल्यावरचे डॉक्टर किंवा औषध रजिस्टर साक्षीत का नाही आणले? कबुलीजबाब राजीखुशीने, अक्कलहुशारीने व दबाव प्रलोभनाशिवाय दिला आहे याचा पुरावा दिला नाही. असा पुरावा येता, तर त्याचे सत्यान्वेषण करण्याची माझी तयारी होती. कारण डॉक्टरांना दिलेल्या औषध प्रिस्क्रिपशनचा नंबर, तारीख मजजवळ लिहिलेली होती.

४ : ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर असलेल्या ऐतिहासिक राजवाड्यामध्ये तीनशे वर्षांपूर्वी मोगल सम्राट औरंगजेबाने आपल्या धाकट्या भावाला—मुरादला—तळघरात छळ करून ठार मारले होते. त्या वाड्याशेजारीच डॉक्टरांना १५ दिवसांपेक्षा जास्त विजनवासाची—एकान्तवासाची—कैद भोगविण्यात येत होती हे या प्रकरणात स्पष्ट झाले आहे. औरंगजेबाने मुरादचा छळ करून खून केला तो मुरादने गादीवर हक्क सांगू नये म्हणून. पण या खटल्यामध्ये डॉक्टरांचा छळ कशासाठी? छळ करणारा औरंगजेब कोण? नि छळ होणारा मुराद कोण? हे न्यायालयाने ठरवावे. मेजर छत्रे साक्षीत येते तर, ते काही प्रकाश या गोष्टींवर टाकते. पण अभियोगपक्षाने त्यांना साक्षीत आणले नाही. कोणी पोलिस ऑफिसर डॉक्टरांच्या एकान्तवासाच्या कैदेविषयी सांगायला आले नाहीत. पोलिस ऑफिसर खिजर मुहम्मद जे डॉक्टरांना रोज भेटत होते, ते सुद्धा साक्षीत आणले नाहीत, नामसूचीमध्ये नाव असूनदेखील त्यांची साक्ष काढली नाही. पोलिस अधिकारी देऊळकरांना माहीत नव्हते की, परचुऱ्यांना कोणच्या कोठडीत कसे ठेविले आहे.

५ : डॉ. परचुऱ्यांच्या सगळ्या कुटुंबियांना पोलिसांनी त्रास द्यायला सुरुवात केली होती. पोलिसांनी डॉक्टरांचे वडीलभाऊ श्री. कृष्णराव परचुरे यांना, ग्वाल्हेर संस्थानचे ते बँकिंग तसेच इन्व्हेस्टमेन्ट सेक्रेटरी होते तरी, खुनाचा आरोप ठेवून दि. १५-२-४८ ला पकडले. डॉ. परचुऱ्यांच्या मुलाला नीलकंठला ७ फेब्रुवारीला पकडले. डॉ. परचुऱ्यांचे अनुमत (लायसेन्सड) पिस्तुल राजसात्–जप्त केले. दोन्ही भावांच्या बायकांचे प्रश्नपरीक्षण केले. हे सगळे मुंबईचे पोलिस अधिकारी ग्वाल्हेरला येताच सुरू झाले. याचा डॉक्टरांच्याविरुद्ध कसा उपयोग करायचा किंवा आपोआप होईल हे न कळण्याइतके मूर्ख मुंबईचे पोलिस अधिकारी खासच नाहीत. सगळ्यांत वरकडी म्हणजे डॉक्टरांचे पिस्तुल व नथूरामचे पिस्तुल एकसारखे, एकाच विदेशी कंपनीचे, एकाच बनावटीसारखे दिसणारे आहे. केवळ नंबराचा फरक. तेव्हा एका बोटावरची थुंकी दुसऱ्या बोटावर गेलेली दाखवायला पोलिसांना किती उशीर लागणार व किती श्रम पडणार! डॉक्टर परचुऱ्यांना अशी सूचक कल्पना देताच त्यांचे विजनवासातले—एकान्तवासातले—धैर्य किती वेळ टिकाव धरणार? १ ६-
परचुऱ्यांना महात्मा गांधी खून खटल्यातील अभियुक्त म्हणून बंदी केल्याचे दाखवावे अशी आज्ञा मुंबईचे पोलिस कमिशनर जे. डी. नगरवालांनी दिली असे पोलिस साक्षीदार श्री. देऊळकरच सांगत आहेत.

६ : दिनांक २-२-४८ ला डॉक्टर परचुऱ्यांना पोलिसांनी पकडल्यापासून १८-२-४८ पर्यंत त्यांना कैदेत ठेवण्याबद्दल कोणाही पोलिसांनी कुणाही मॅजिस्ट्रेटकडून आज्ञा—रिमाण्ड—घेतली नव्हती. २-२-४८ पासून १६-२-४८ पर्यंत तर डॉक्टरांना विशेषाज्ञेखाली (ऑर्डिनन्स) निरोधामध्ये ठेविले असे सांगण्यात आले. पण दि. १६-२-४८ नंतरही चोवीस तासांत त्यांना मॅजिस्ट्रेट पुढे उभे करण्याचा कायदा पोलिसांनी पाळला नाही. मॅजिस्ट्रेट अटल यांनी कबुलीजबाब घेण्यापूर्वी डॉक्टरांना न्यायिक बंदीगृहामध्ये—ज्युडिशिअल कस्टडीमध्ये—काही काळ ठेवून त्यांच्यावरची पोलिसांची भीती नाहीशी केली नाही. दि. १८-२-४८ ला कबुलीजबाबावर डॉक्टरांच्या सह्या घेतल्यावरही त्यांना न्यायिक बंदीगृहामध्ये पाठविण्याची दक्षता घेतली नाही. मॅजिस्ट्रेट अटल यांना तसे करताच येत नव्हते. किल्ल्यावर ते अधिकारहीन व्यक्ती होते!

७ : अटल यांनी कबुलीजबाबाचे कागद दिनांक १८–२–४८ नंतर स्वतःजवळ ठेवले व काही दिवसांनंतर ते कागद त्यांनी बँकेमध्ये स्वतःच्या नावावर ठेवले. परंतु त्या कागदावर स्वतःच्या कोर्टाची मुद्रासुद्धा लावली नाही. कबुलीजबाबाचे कागद नियमाप्रमाणे अधिकारक्षम मॅजिस्ट्रेटकडे पाठविण्याची काळजी घेतली नाही किंवा कागद आपल्याजवळ आहेत याची सूचना कुणाही वरिष्ठ अधिकाऱ्याला दिली नाही. एवढेच नाही तर, दिल्ली सरकारकडे अभियुक्तांची देवाणघेवाण करणाऱ्या विभागाच्या अधिकाऱ्याकडे पाठवले नाहीत. कबुलीजबाबावर कोर्टाच्या मुद्रा अटलांनी एप्रिल १९४८ च्या तिसऱ्या–चौथ्या आठवड्यात लावल्या असे खुद्द अटल स्वतःच सांगतात.

हे मुद्दे मी कोर्टाला—जज्ज आत्मचरणजींना—थोडक्यात सांगत होतो. त्या संबंधाने ते मला बारीकसारीक प्रश्न विचारत होते व मी त्यांची समाधानकारक उत्तरे, संदर्भही देत होतो. ते लिहून घेत होते. त्यांचे प्रश्न संपताच मी दुसऱ्या मुद्यांबाबत बोलत होतो.

८ : अभियोग प्रदर्श क्रमांक ८६ कबुलीजबाबाचा पहिला कागद हा पिवळसर बदामी रंगाचा, त्यावर कोर्टाचे नाव, साक्षीदार—वक्त्याचे नाव वगैरे लिहिण्याच्या ओळी छापलेल्या असतात तसा सरकारी कागद होता आणि त्यावर अटलांनी धारा १६४ क्रि. प्रो. कोड अन्वये लिहावयाची प्रश्नोत्तरे लिहिली होती. बाकीचे सहा

**पण या खटल्यामध्ये डॉक्टरांचा छळ कशासाठी ?**

कागद साधे, पांढरे, कोरे बाजारात कुठेही मिळतात तसे कागद होते. त्यावर मॅजिस्ट्रेटनी प्रत्येक पानावर आपले हस्ताक्षर केले होते. असे सहसा मॅजिस्ट्रेट किंवा जज्ज करीत नाहीत. ते फक्त शेवटच्या पानावर हस्ताक्षर करतात व मुद्रा लावतात. सात सह्या करून कबुलीजबाबाला सातपटीची विश्वसनीयता दिली असे म्हणण्याचा उद्देश असावा. ग्वाल्हेरच्या मॅजिस्ट्रेटने ग्वाल्हेर येथे ग्वाल्हेरच्या अभियुक्ताचा जबाब ग्वाल्हेरच्या राजभाषेमध्ये, न्यायालयांच्या भाषेमध्ये घेतला नव्हता. मॅजिस्ट्रेट अटल किंवा अभियुक्त डॉ. परचुरे दोघेही ग्वाल्हेरची राजभाषा हिंदी बोलू शकत होते, लिहूवाचू-समजू शकत होते. तरी पण अटलांनी कबुलीजबाब इंग्रजी भाषेमध्ये लिहिला होता.

९ : पुढला मुद्दा सांगताना मी वेळ बघितली व उशीर झाला नाही हे बघून, जज्जमहोदयांना मुद्दा सांगायला सुरुवात काहीशी अघळपघळ अशा रीतीने केली : श्रीमानजी ! मी आपणाला नम्रतेने विनवणी करणार आहे. मला काही संख्या मांडून त्याची बेरीज करायची आहे. ती करण्यात आपण मला साथ द्यावी, व मी बेरजा करण्यात चुकत तर नाहीना हे बघावे. मला माहीत आहे की, आपण स्वतः एका इंग्लिश विश्वविद्यालयाचे नेत्रदीपक यश मिळविलेले पदवीधर, गणीत विषयातले पदवीधर आहात. मी स्वतः गणितात भारी कच्चा आहे लहानपणापासून. तरी आपण राग मानू नये व मला मदत करावी. मला आपल्या मदतीने साक्षीदार अटल मॅजिस्ट्रेट महोदय यांनी दि. १८-२-४८ ला ते ग्वाल्हेर किल्ल्यावर गेले असताना व कबुलीजबाब लिहून घेताना किती व कसा वेळ घालवला हे दाखवावयाचे आहे. असे म्हणून साक्षीदार अटल मॅजिस्ट्रेट यांच्या परीक्षणामधला संदर्भित भाग हातात घेतला व जज्जमहोदयांचे लक्ष माझ्या कूटपरीक्षणातल्या एका भागाकडे वेधले. संदर्भ (छापील पुस्तके पुस्तक पहिले पान ७९ ओळी क्र. ११ व १२.) येथे माझ्या प्रश्नाला उत्तर देताना साक्षीदाराने 'मी किल्ल्यावर त्या दिवशी जवळ जवळ तीन तास होतो' असे सांगितले होते. याचे समर्थन म्हणून मी साक्षीदार देऊळकरांच्या परीक्षणातला भागही वाचून दाखवला. तेथे त्यांनी जवळ जवळ अडीच तास ते पावणेतीन तास असा वेळ सांगितला होता. तसेच साक्षीदार पाटील, थोरात यांच्या परीक्षणातला संदर्भ घेऊन दाखवले की, ते सांगतात की, मॅजिस्ट्रेटनी अभियुक्ताला आपल्याजवळ बोलावले तेव्हापासून पुन्हा मेजर छत्रे येईतो जवळ जवळ अडीच तास वेळ गेला, हे दाखवून मी जज्ज महोदयांना म्हटले की, 'आपण जास्तीत जास्तचाच तीन तास वेळ धरू या. आणि हे तीन तास कागदावर जमेच्या बाजूला लिहून यामधून साक्षीदार अटल मॅजिस्ट्रेटनी हा वेळ कसा खर्च केला याचा हिशोब अटल जसा सांगतात त्याप्रमाणेच लावू या. असे म्हणून मी अटल मॅजिस्ट्रेट यांच्या मुख्य परिक्षणामधला संदर्भित भाग वाचून दाखवायला सुरुवात केली. मी गंभीर चेहऱ्याने एक एक वाक्य वाचीत होतो आणि त्या कामाला लागणाऱ्या वेळाचा आकडा कागदावर डाव्या खर्चाच्या बाजूला साक्षीदाराने सांगितलेला किंवा किमान अंदाजाने लिहायला जज्जमहोदयांना विनवीत होतो. (संदर्भ छापील पुस्तक क्रमांक १, पान क्र. ७७, ओळी क्र. २० पासून ५६ पर्यंत.) आम्ही कागदावर मांडलेला जमाखर्चाचा ताळेबंद असा निघाला.

| जमेचा वेळ | खर्च केलेला वेळ | अंदाजे मिनिटे |
|---|---|---|
| तीन तास | १. टेबल व खुर्च्या मागवणे व पहारेकऱ्याला बोलावून दाराशी उभे करणे. ओळ २० | ५ |
| | २. अभियुक्ताला धारा १६४ क्रि. प्रो. कोडान्वये द्यावयाच्या कबुलीजबाबाचे महत्त्व, परिणाम समजावून सांगणे. ओळी २७ ते ३०. हा वेळ अटलजींनी स्वतःच सांगितलेला होता त्याप्रमाणे | ६० |
| | ३. अभियुक्ताने कबुलीजबाबाची रूपरेषा अटलांना तोंडी सगळी सांगितली; ओळी ३६-३७. हा वेळ अटलांनी स्वतःच सांगितला होता त्याप्रमाणे | ४५ |
| | ४. अटलांनी अभियुक्ताला आणखी नीट विचार करा आणि मग ठरवा काय करता ते असे म्हणून 'अर्धा तास' विचार करायला वेळ दिला त्याप्रमाणे ओळ ४०. | ३० |
| | ५. पहिल्या कागदावरची लिहिलेली प्रश्नोत्तरे दीड पानात लिहायला लागणारा वेळ. ओळी ४१-४२ | २० |
| | ६. अभियुक्ताने कबुलीजबाब तोंडी सांगितला व मॅजिस्ट्रेट साक्षीदाराने तो सहा कागदांवर इंग्रजीमध्ये सुवाच्च अक्षरांत लिहिला ओळी ४४ ते ५१. (अंदाज राखून ठेवला) | ? |
| | ७ कबुलीजबाबाची सात पाने अभियुक्ताला शब्दशः वाचून दाखविली. ओळ ५२ | १० |
| | ८. अभियुक्ताने कबुलीजबाबाची सात पाने स्वतः वाचून पाहिली. ओळ ५४ | १० |
| | ९. अभियुक्ताने सातही पानांवर सह्या केल्या. | ५ |
| | १०. मॅजिस्ट्रेटमहोदयांनी शेवटच्या पानावर धारा १६४ क्रि.प्रो.कोडप्रमाणे सर्टिफिकेट लिहिले व स्वतः सात पानावर सह्या केल्या | १० |
| | ११. मेजर छत्रे यांना बोलावले व अभियुक्ताला त्यांच्या संरक्षणांत दिले. | १० |
| | एकूण वेळ | २०५ |

**म्हणजे तीन तास पंचवीस मिनिटे.**

मी वर बघितले तेव्हा जज्ज महोदय पुन्हा पुन्हा बेरीज तपासून पाहत होते म्हणून थोडा वेळ थांबून मी बोलायला सुरुवात केली. 'श्रीमानजी, मॅजिस्ट्रेट अटलमहोदयांना अभियुक्ताने कबुलीजबाबाचा मजकूर तोंडी सांगितला व मॅजिस्ट्रेट महोदयांनी तो इंग्लिशमध्ये लिहून घेतला. अशी सहा पाने लिहून घ्यायला किती वेळ लागला याचा वेळ हिशोबात धरला नाही अजून, आणि क्षणभर थांबून म्हटले, 'श्रीमानजी ! मजवर विश्वास ठेवण्याची कृपा करा. मी काय सांगतो ते लक्ष देऊन ऐकून घ्या. या नुसत्या कबुलीजबाबाच्या

कथनाचे एक हजार चारशे शब्दांपेक्षा जास्त शब्द आहेत. अभियोग प्रदर्श ८६ च्या सहा पानांवर लिहिले आहेत ! असे म्हणून मी मजजवळ असलेली कबुलीजबाबाची प्रतिलिपी हातात घेतली व ती जज्ज महोदयांच्या हातात दिली व म्हटले, 'आपल्या कोर्टाच्या कार्यालयाने या प्रतिलिपीचे शुल्क दोन हजार शब्दांचा आकार लावून घेतले आहे. ठीकच आहे ते. कारण यामध्ये पहिल्या प्रश्नोत्तरांचेही सारे शब्द आहेत. इतरही कोर्टाच्या माहितीचे शब्द आहेत. तेव्हा एकंदर शब्दसंख्या दोन हजार शब्दांची होणे साहजिक आहे. माझ्याकडून या प्रतिलिपीबद्दल आपल्या कार्यालयाने जो आकार घेतला त्याबद्दल माझी मुळीच तक्रार नाही.' असे म्हणून मी कबुलीजबाबाच्या लेखातील लिहिलेले अक्षर कसे सुवाच्च, खाडाखोड, दुरुस्ती, चूक न करता, घोटीव अक्षरात लिहिले आहे तेव्हा ते काळजीपूर्वक सावकाशच लिहिले असणार, मी स्वतः हे सगळे सांगितले. पुढे म्हटले सहा पाने लिहून किती वेळ लिहायला लागतो ते बघितले. हे बघायला मला माझे सहयोगी श्री. डांगे यांनी मदत केली. एकदा त्यांनी सांगितले मी लिहिले. एकदा मी सांगितले त्यांनी लिहिले. दोन्ही वेळी आम्हाला दोन तासांपेक्षा जास्ती वेळ लागला होता ! माझे वाक्य संपायची डांगे वाटच बघत होते. वाक्य संपताच ते उभे राहिले नि म्हणाले, 'होय श्रीमानजी ! मी, इनामदार म्हणतात त्याप्रमाणे आम्ही, दोन वेळा करून पाहिले. दोन्ही वेळी दोन तासांपेक्षा जास्ती वेळ लागला !'

**या ठिकाणी मी डॉ. परचुऱ्यांनी आपल्या कोर्टामध्ये दिलेल्या लेखी जबाबातला तो भाग जज्ज आत्मचरणजींना वाचून दाखवला. जेथे डॉक्टरांनी म्हटले होते की, श्री. अटलांनी कबुलीजबाबाचे कागद घरून लिहून आणले होते. (संदर्भ छापील पुस्तक क्रमांक २ पान २१२ ओळी ११ ते १४).**

माझ्या या विधानांचा 'घणाघात' जज्ज आत्मचरणजींना व श्री. दफ्तरींना व अभियोगपक्षाच्या बाजूने बसलेल्या सगळ्या व्यक्तींना झेलायला वेळ दिला नि पुन्हा गंभीरपणे पण काकुळतीने म्हटले, 'श्रीमानजी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मला दाखवायचा आहे. तो कबुलीजबाब प्रदर्श क्र. ८६ मध्येच आहे.' असे म्हणून मी पोलिस साक्षीदार देऊळकर यांच्या कूटपरीक्षणातली पहिलीच वाक्ये जज्ज आत्मचरणजींना वाचून दाखविली व विशेषतः वाक्य 'ही पद्धती मी कायद्याप्रमाणे व माझ्या अनुभवाने तयार केली आहे.' हे त्यातील 'मी' या अक्षरावर जोर देऊन, वाचून दाखविले आणि 'कुणाच्याही प्रश्नपरीक्षणामध्ये वक्त्याच्या सगळ्या संबंधितांची नातेवाईकांची नावे लिहून घेण्याची ही पद्धती मुंबईच्या पोलिस अधिकाऱ्याने खास स्वतःची बनविली आहे. हे मुंबईच्या पोलिस प्रश्नपरीक्षणाचे वैशिष्टचच झालेले मला आढळले आहे. आमच्या ग्वाल्हेरचे काय, दिल्ली, पंजाब इतर कुठलेही पोलिस अधिकारी अशी नातेवाईकांची नावे लिहून घेत नाहीत. हा माझा शोध आहे. श्रीमानजी यावर विचार अवश्य करावा ! वगरे म्हणून मी कबुलीजबाबाचे पान नंबर दोन हातात घेऊन त्यामध्ये डॉ. परचुऱ्यांनी आपल्या सगळ्या सख्ख्या चुलत नातेवाईकांची नावे कशी पहिल्याच परिच्छेदात लिहवली आहेत ते कोर्टाच्या नजरेस आणले आणि क्षणभराने प्रश्नांची सरबत्तीच सुरू केली. 'ग्वाल्हेरचे अनुभवी प्रथमश्रेणी मॅजिस्ट्रेट अटल महोदय– यांना डॉक्टर परचुऱ्यांच्या अगदी चुलत घराण्याच्या नातेवाईकांची नावे लिहून घेण्याचे आत्मज्ञान कोठून मिळाले ? डॉक्टरांना तरी आपल्या घराण्याचा हा वंशविस्तार कबुलीजबाबामध्ये लिहिण्याची विद्या कोठून आठवली ? ग्वाल्हेरचे मॅजिस्ट्रेट व ग्वाल्हेरचे अभियुक्त या दोघांनाही कबुलीजबाबामध्ये मुंबईच्या पोलिस अधिकाऱ्याच्या खास पद्धतीने बनविलेल्या प्रश्न परीक्षणाचा मंत्र म्हणायचे कसे स्फुरले ? ज्या कबुलीजबाबाचे कागद लिहायला दोन तासांपेक्षा अधिक वेळ लागतो ते दोन तास मॅजिस्ट्रेट अटल यांना दिनांक १८–२–४८ ला सकाळी ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर केव्हा मिळाले ? ते स्वतःच नाही का सांगत की, त्यांच्याजवळ केवळ तीन तास होते नि तो वेळ त्यांनी इतर कायदेशीर कामात खर्च केला होता ! येथे मी डॉक्टर परचुऱ्यांचे लेखी निवेदनामधले ते विधान वाचून दाखवले की, मॅजिस्ट्रेट अटल यांनी कबुलीजबाब घरून, लिहून आणला होता. (संदर्भ पुस्तक क्र. २ पान २२० ओळी ३१ व ३२ तसेच पान २२ ओळी ३४ ते ४७) आणि माझ्या हातातले कबुलीजबाबाचे कागद माझ्याच टेबलावर फेकल्यासारखे टाकून दिले व म्हटले, हे अभियुक्त डॉक्टर परचुरे यांचे म्हणणे नुसते म्हणणेच नाही. ते सिद्ध झालेले, देवमुखाने उच्चारलेले निर्भेळ सत्य आहे ! कोणीही साक्षीदार शपथ घेतल्यावर मुख्य परीक्षणात खोटे बोलत आहे असे म्हणत नाहीत. त्याच्या विधानावर कूटपरीक्षण करून ते खोटे आहे हे दाखवायचे असते. एखाद्या मुख्य परीक्षणाच्या विधानावर कूटपरीक्षण केले नाही तर, कूटपरीक्षण न करणाऱ्यावर ते सत्य म्हणून बोकांडी बसते. मी वाचून दाखविलेला खर्च केलेल्या वेळाचा ताळेबंद मुख्य परीक्षणातलाच आहे. त्यावर मी कूटपरीक्षणाचा एक ब्रसुद्धा उच्चारला नाही. ग्वाल्हेरचे मान्यवर मॅजिस्ट्रेट अटल यांनी विद्वान ॲडव्होकेट जनरल यांच्या प्रश्नांना उत्तरे श्रीमानजी आपल्या समोर दिली आहेत. त्यावर मी कूटपरीक्षण केलेले नाही. तो हिशोब खोटा आहे असे म्हणायला माझ्या तोंडात जीभच नाही ! मी त्यावर काही आक्षेप घ्यायला लागलो तर मला कोणी घेऊ देणार नाही. मला ते सारे शिरोधार्य मानले पाहिजे. अटलमहोदय म्हणतात की, किल्ल्यावर हे केले, ते केले, ते जवळजवळ ९९ टक्के खरेच आहे. कारण कायद्याने ते करणे आवश्यकच होते. धारा १६५ क्रि. पो. कोड व सारे निर्णय दृष्टान्त सांगतात की, हे सारे करायलाच हवे. अटल महोदयांनी हे सारे किल्ल्यावर केले नाही, हा कबुलीजबाबच लिहिण्यातच किल्ल्यावर मिळालेले जवळ जवळ तीन तास खर्च केले, तर तेही अगदी बेकायदेशीर होईल. कायदा आणि निर्णय दृष्टान्त यांचे मुळीच पालन केले नाही असे होईल आणि ह्यामुळेसुद्धा हा कबुलीजबाब बेकायदा घेतला असे ठरवावे लागेल व तो पुराव्यामध्ये अग्राह्य होईल. या महात्मा गांधींच्या खुनाच्या आरोपावरून चाललेल्या अभियोगामध्ये देखील बेकायदा व अभियुक्ताविरुद्ध अग्राह्य होईल आणि श्रीमानजी ! विचार करा. आपण डॉक्टर

# अभियोगपक्षावर घणाघात !

परचुऱ्यांच्या भोवती किल्ल्यावर कसे छळणुकीचे, भीतीचे वातावरण उभे केले होते, आणि त्यांना दिलेला उपदेश एवढाच होता की; 'या जबाबावर सह्या करा!' किल्ल्यावरचे सैनिक अधिकारी मेजर छत्रे यांनी जो 'तुम्ही कोर्टामध्ये तो कबुलीजबाब नाकारू शकता' हा लाख मोलाचा मंत्र सांगितला त्यानेच डॉक्टरांना या 'मुंबईमा बनेलो माल' प्रदर्श वस्तु क्रमांक ८६ वर स्वाक्षऱ्या करण्याचे धैर्य झाले असावे! हे कागद म्हणजे कबुलीजबाब नाही. या कागदांना कुणीही न्यायाधीश चिमटयानेसुद्धा शिवणार – स्पर्श करणार नाही!'

पुढे काय बोलायचे ते बघायला मी थोडा वेळ खाली वाकलो नि पुन्हा वर बघितले तो जज्ज आत्मचरणजी अभियुक्तांच्या पिंजऱ्याकडे, डॉ. परचुऱ्यांकडेच डोळे मोठे करून व ओठ आवळून बघत आहेत असे मला दिसले. मी माझ्या आजूबाजूला बघितले नाही, पण अभियोगपक्षाच्या रांगांमधून कुजबुजल्याचा आवाज कानांवर येत होता. फरशीवर पाय घासल्याची खरखर ऐकू येत होती. मी स्वत: दम घेतल्यासारखे केले आणि माझ्या टाचणांवरून बाकीच्या किरकोळ मुद्यांविषयी ओळीने बोलायला सुरुवात केली. अभियोग प्रदर्श ८६ कबुलीजबाबावरचे आक्षेपच होते ते सर्व, जवळजवळ पंधरा–सोळा. कबुलीजबाब आणखी कसा संशयास्पद वाटतो, कबुलीजबाबात ज्या घटना वर्णिल्या आहेत त्यांपैकी कोणकोणत्या भागांचे पुष्टीकरण तोंडी पुराव्यात झाले नाही–काय काय गोष्टी अति विलक्षण आहेत–डॉक्टरांनी कसे पुन्हा पुन्हा 'मी माझी व माझ्या सहकारी मंडळींची बाजू स्पष्ट करून सांगणार आहे–सांगत आहे' असे म्हटले आहे व याचा अर्थ काय–पण एवढी काळजी घेऊनसुद्धा कबुलीजबाबात आपल्या वडीलभावाला व आपल्या मुलाला गोवण्याचे डॉक्टर चुकले नाहीत हे किती विलक्षण–वगैरे मुद्दे होते; अभियोगपक्षाने कोणकोणते महत्त्वाचे साक्षीदार कोर्टापुढे आणले नाहीत, जसे मेजर छत्रे, किल्ल्यावरचे डॉक्टर, पोलिस ऑफिसर खिजर मूहम्मद, ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर डॉक्टरांना कैदेत ठेवावे असा हुकूम देणारे अधिकारी, मुंबई–दिल्लीच्या चौकशीअधिकाऱ्यांना ग्वाल्हेरला चौकशी करू देण्यास अनुमती देणारे अधिकारी इत्यादी व याविषयीचे संदर्भही वाचून दाखवत होतो. शेवटी कोर्टासमोर निरनिराळी कबुलीजबाबाच्या स्वरूपाची पाच अभियुक्तांची निवेदने आली होती, त्यांकडे जज्ज आत्मचरणजींचे लक्ष वेधून 'या पाच जबाबांची आपण अभियोग प्रदर्श ८६ या कबुलीजबाबाबरोबर तुलना करा व पाहा, यांतले कोणते कोणते खरे आहेत असे वाटतात!' असे त्यांना म्हटले. 'विद्वान ॲडव्होकेट जनरल साक्षीदार कोर्टापुढे आणण्यात किती दक्षतेने व तत्परतेने वागत होते तरीसुद्धा, ज्यांच्यावर या अभियोगपक्षाच्या कहाणीचा, आरोप सिद्ध करण्याचा सगळा प्रमाणभार आहे, त्यांनी हे महत्त्वाचे साक्षीदार कोर्टापुढे आणू नयेत याचा अर्थ एकच होतो, तो म्हणजे साक्षीदार येते तर, ते अभियोगपक्षाच्या विरुद्ध गेले असते.' असे म्हणत असताना मी घड्याळाकडे नजर टाकली होती, तो एक वाजायला एखाददुसरा मिनिटच बाकी होते. पुढले मुद्दे बघायला टाचणाचे कागद चाळायला लागलो तोच एक वाजला नि कोर्ट मधल्या विश्रांतीकरता उठले!

श्री. डांगेही उठून माझ्या कानात सांगितल्यासारखे म्हणाले; 'फारच परिणामकारी! आगे बढो! हाणो, मारो!' आम्ही चहा प्यायला जाताना माझ्याशी कोणी बोलले नव्हते. मी माझी मुले आली का म्हणून बघितले, पण तीही आली नव्हती. चहा पीत असताना श्री. डांगे मला सांगत होते, 'सगळेजण बेचैन आहेत, सारखे एकमेकांशी कुजबुजत आहेत!' जज्ज आत्मचरणजी गंभीर दिसल्याचे–कुणावर तरी अगदी रागावलेच आहेत असे–श्री. डांग्यांनासुद्धा वाटले होते!

चहा घेऊन परत आलो. कोर्ट येऊन कामकाज सुरू झाले. मी जज्ज आत्मचरणजींकडे पाहत अभिवादन करीत उभा राहिलो. ते आता रागावलेले नव्हते. खुर्चीच्या पाठीला टेकून निर्विकार चेहऱ्याने सगळीकडे–माझ्याकडे–बघत होते. पुढल्या तर्कनिवेदनाची टाचणे करून घेण्याची त्यांची तयारी–इच्छा नव्हती असे मला वाटले. मीसुद्धा एकंदर खुनाच्या कटासंबंधी काही बोलून जज्ज आत्मचरणजींना ॲडव्होकेट जनरल महोदयांनी आपल्या प्रभावी भाषणात अभियुक्त बचावपक्षाला म्हणून एक खोचक प्रश्न विचारला होता त्याची आठवण दिली. प्रश्न होता– 'बचावपक्षाचे म्हणणे आहे की, दिनांक २८ जानेवारीला रात्री ग्वाल्हेर स्टेशनवर नथूराम व आपटे हे दोघे दोन दिशेला–नथूराम दिल्लीला व आपटे मुंबईला–असे गेले. आणि त्यानंतरच नथूरामने महात्मा गांधींना मारण्याचा निश्चय केला. त्या निश्चयाचा आपटेशी–कुणाशीच–काही संबंध नव्हता. तर मग मी त्यांना विचारतो की, २१ जानेवारी व ३० जानेवारी या दहा दिवसांत असे आणखी काय नवीन घडले होते की, ज्यामुळे नथूरामने शांततामय अहिंसक निदर्शने करण्याचा मार्ग सोडून एकाएकी एका जगद्वंद्य महात्म्याचा–क्षीणजर्जर गांधीजींचा–पिस्तुलाच्या गोळ्या झाडून खून करण्याचा निर्णय घ्यावा?' श्री. दप्तरींचा हा प्रश्न अगदी हेटाळणीच्या स्वरातच विचारला गेलेला होता. त्याच्या उत्तरासाठी मी कोर्टापुढे पुराव्यात आलेली काही विधानेच निवडून त्यांचे माझ्या भाषेत एक निवेदन तयार केले होते. माझ्या या निवेदनाचे सूत्र प्रथम तोंडी सांगितले, 'श्रीमान महोदय! या प्रश्नाचे उत्तर मी माझ्या अल्पबुद्धीने देण्याचा प्रयत्न करणार आहे. या अभियोगपर्वात आलेल्या सगळ्या पुराव्यांवरून आपणाला दिसते की, साधारणपणे नथूराम हा शांत, सहनशील, गंभीर पण निष्क्रिय अप्रवर्तक, तितिक्षु असा असलेला वाटतो. तो आपणहून काही बोलत नाही, काही करीत नाही, सारखा आपटेबरोबर असतो, आपटेच्या म्हणण्याप्रमाणे वागतो–आपटेच सगळे करतो. स्वत: आपटेचे व्यक्तित्व अगदी याच्या उलट...पण हे सर्व येथे कशाला बोलून दाखवू. याबद्दल मी एक निवेदन लिहून काढले आहे तेच मी वाचून दाखवतो,' असे म्हणून मी कोर्टामध्ये 'वीस जानेवारी अठ्ठेचाळीस व तीस जानेवारी अठ्ठेचाळीस या काळामधली परिवर्तनकारक घटना' या शीर्षकाचे निवेदन शब्दश: वाचून दाखविले. वाक्येच्या वाक्ये माझ्या स्मरणात होतीच. त्यामुळे मला भाषण दिल्यासारखेच वाचता आले! ते निवेदन मी शेवटी परिशिष्ट म्हणून देतो.

माझे वाचनभाषण संपविल्यावर मी घड्याळाकडे बघितले, तर दोन वाजून तीस मिनिटे झाली होती. मी फारच आरामात बोलत

आहे असे वाटून, मी लवकर आवरते घेण्याचे ठरवले व माझ्या कागदांमधून माझ्या भाषणाचे समारोपाचे कागद काढून हातात घेतले व जज्ज आत्मचरणजींना विनवणीच्या स्वरात म्हटले की, 'श्रीमानजी ! आपण गेल्या दोन डिसेंबरपासून रोज या महात्मा गांधी खूनखटल्यामधल्या पुराव्याबद्दलची दोन्ही पक्षांची तर्कनिवेदने ऐकत आहात. अख्खे आठ दिवस चाललेले अभियोगपक्षाचे महाअधिवक्ते यांचे प्रभावी तर्कनिवेदन आपण ऐकले आहेत. त्यानंतर चाललेली बचावपक्षाच्या एक-एक अभिवक्त्यांची तर्कनिवेदने आपण ऐकली. अभियुक्त क्रमांक एक नथूरामचे—आपल्या मातृभूमीच्या विभाजनाने अति दुःखी झालेल्या माणसाचे—तळमळीचे पण प्रामाणिक भाषणही आपण ऐकले. आता गेलें तीन—चार दिवस माझेही तर्कनिवेदन आपण ऐकत आहात, माझे हे समारोप करण्याचेच काम मला अखेरच्या नंबरावर भाषण करताना मिळाले आहे. एवढ्या प्रदीर्घ तर्कनिवेदनाचा समारोप मी माझ्या मुखजड भाषेत काय करणार ? मी माझे बचावपक्षाचे भाषण सगळे लिहून काढले आहे ते सगळे आपणासमोर वाचून दाखवावे, अशी माझी इच्छा आहे. आपण माझ्या या विनवणीला मान द्यावा.' असे म्हणून मी माझा लिहून काढलेला समारोप वाचून दाखवायला सुरुवात केली. तीस डिसेंबर १९४८ च्या तिसऱ्या प्रहरी लालकिल्ल्यातील कोर्टात शब्द नि शब्द वाचून दाखविलेले समारोपाचे माझे भाषण मी येथे थोडक्यात वाचकांसमोर ठेवतो :

## कटाच्या अपराधाचा प्रथम वृत्तान्त

अभियोगपक्षाचे साक्षीत्रय जगदीशचंद्र जैन, अंगदसिंग तसेच मोरारजी देसाई यांचे साक्ष—कथन वाचून मला असे म्हणावेच लागते की, 'राज्यशासनाच्या मोठ्या मोठ्या पदांवर बसलेल्या अधिकाऱ्यांना गांधीजींना मारण्याचा कट होत आहे अशी वार्ता कळली होती आणि राष्ट्रपित्याच्या जीविताचं रक्षण करण्यात त्यांच्या हातून दिरंगाई झाली !' ह्या कहाणीवर विश्वास करणे कठिण आहे. ह्या कहाणीची सत्यता पारखून पाहण्याची पहिली कसोटी विधिनियमानुसार आणि व्यवहार प्रक्रिया संग्रहात लिहिलेल्या नियमाप्रमाणे कटाच्या अपराधाचा प्रथम वृत्तान्त लिहिलेला बघून करता येते. परंतु या आदरणीय माणसांनी आपल्याला ही कसोटी मिळू दिली नाही. मुंबईसारख्या प्रांताच्या राजधानीच्या शहरातल्या पोलिसांच्या उपआयुक्तांनीसुद्धा ही चूक केली आहे. दुसरी कसोटी—पारख म्हणजे नि—वार्ता मिळाल्यानंतर ह्या सज्जनांची वागणूक कशी होती हे पाहणे. ही पारखसुद्धा आपण करू शकत नाही. कारण तीस जानेवारीच्या संध्याकाळी गांधीजींची हत्या झाल्याची सर्वांना स्तिमित करणारी वार्ता मिळेपर्यंत या सज्जनांनी किंवा राज्यशासनाच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी आपली करांगुलीसुद्धा हलविली नव्हती. त्यानंतरसुद्धा राज्यशासनाच्या अधिकाऱ्याने काही केले असेल तर, ते दिल्ली येथे गांधी हत्या झाल्याची वार्ता कळल्यामुळे नव्हते. गांधीजींच्या हत्येनंतर जे जाळपोळी-लुटीचे उग्र तांडव झाले होते ते बघून केले असावे.

काहीही पाऊल उचलण्यासाठी आळशी किंवा उदासीन राहणारे हे राज्यशासनाचे अधिकारी दिनांक २१ ला प्रथम वार्ता देणाऱ्या माणसाचे नावसुद्धा विसरून गेले असावेत. मग या प्रथम वार्ता देणाऱ्याचे नाव आठवण्यासाठी, त्याला हुडकून काढण्यासाठी या अधिकाऱ्यांची घाबरट धांवपळ सुरू झाली. शेवटी चार किंवा पांच फेब्रुवारीला त्याचे नावही कळले नि त्याला हुडकूनही काढले. परंतु ह्यापूर्वीच दिल्लीच्या पोलिस अधिकाऱ्यांना वीस जानेवारीच्या घटनेचा तीस जानेवारीच्या घटनेशी काही संबंध असावा याची पुसट शंका आली होती व त्यांनी हत्येचा कट असल्याचा प्रथम वृत्तान्त आपल्या दैनंदिनीमधे नोंदविला आणि त्याची सूचना मुंबईच्या पोलिस अधिकाऱ्यांना दिली. यामुळे त्यांनीही दोन फेब्रुवारीला तशी नोंद केली.

मुंबईचे पोलिस अधिकारी तेरा फेब्रुवारीपर्यंत कहाणीमधले रहस्य उलगडण्याची वाट पाहत होते. आपले पाय कुठे तरी जमिनीला लागत आहेत—आपल्या हाताशी काही तरी मिळते आहे असे वाटून शासकीय पक्षाशी विरोध करणाऱ्या साऱ्या पक्षांच्या नि संस्थांच्या संबंधित माणसांना जेव्हा त्यांनी पकडले तेव्हा मगच त्यांनी माहिती कथन लिहून घेतले. पण ते प्रथम वार्ता देणाऱ्याचे नव्हे, तर माननीय गृहमंत्र्याचे. त्यांनी हे शहाणपणाचे पाऊल बुद्ध्याच धोरण आंखून उचलले असावे. कारण त्यामुळे गृहमंत्र्यांच्या माहितीकथनाचा दंडुका दाखवून प्रथम वार्ता देणाऱ्या माणसाला कुठवर ताणता येईल याची त्यांनी खात्री आधी करून घेतली होती. पोलिस अधिकाऱ्यांना तोही माहितीकथन लिहवून देतो परंतु मजिस्ट्रेट समोर नेऊन त्याचे माहितीकथन लिहविताच त्यामध्ये तो पुष्कळच गोंधळतो आणि म्हणूनच अभियोगपक्षाने कर्णपरंपरा या श्रुती प्रमाणासंबंधीच्या सगळ्या नियमांना धाब्यावर ठेऊन अभियोगपक्षाच्या पुराव्याचे आडंबर उभे केले आहे, आणि त्याला आधार म्हणून माननीय गृहमंत्र्यांनाच साक्षीदाराच्या पिंजऱ्यात आणले आहे.

परंतु न्यायपीठ अशा कुणाच्या व्यक्तित्वामुळे प्रभावित होणार नाही. न्यायपीठ सामान्य, सावधान माणसाच्या वागणुकीची कसोटी लावूनच त्याची पारख करील. सर्वसाधारण बुद्धीच्या ग्रहणशक्तीवर आधारलेल्या व्यवहार प्रक्रियेच्या नियमाप्रमाणेच त्याची पारख करील. ह्या सज्जन चौकडीने सर्वसाधारण ग्रहणशक्तीच्या संबंधात काही विक्षिप्तपणा असल्याचे दाखविले नाही. जसा विक्षिप्तपणा मदनलालमध्ये दिसत असावा.

मी स्पष्ट शब्दांत म्हणतो की हे सज्जन खोटे बोलत नव्हते. माझ्या समजुतीप्रमाणे त्यांची जी चूक झाली आहे ती स्मरणशक्तीच्या गोंधळामुळे झाली आहे. गांधीजींच्या हत्येच्यावार्तेमुळे सुन्न होऊन मिळालेली माहिती आधी कोणती नि मग कोणती हे आठवण्यात त्यांची चूक झाली आहे. आपण जर या साक्षीदारांच्या साक्षीवर विश्वास ठेवू असे म्हटले तर, त्यांचा कथन समन्वय करताना आपण कोणत्या निष्कर्षाप्रत पोहोचू ?

माननीय महोदयांना माझी विनंति आहे की, आपण अशा समन्वयाने होणाऱ्या निष्कर्षाचा स्वीकार करणार आहात कां ? याचा आपण अवश्य विचार करावा.

# स्मरणशक्तीचा गोंधळ

## परिशिष्ट

## २० ते ३० जानेवारी १९४८ मधील परिवर्तक क्षण

विद्वान महाअधिवक्ता महोदयांनी आपल्या वकिली वक्तृत्वाने श्रीमानजी ! आपले लक्ष या अभियोगपर्वाच्या निरनिराळ्या मुद्द्यांवर केन्द्रित करवले आहे. त्या मुद्यांमधील एक मुद्दा म्हणून विद्वान महाअधिवक्त्यांनी विचारलेला प्रश्न होता तो अशा भावार्थाचा की, ' बचावपक्षाची कहाणी जर खरी असेल तर, २० जानेवारी आणि ३० जानेवारी १९४८ च्या मधल्या काळात असे काय घडलें होते की, त्यामुळे नथूराम गोडसेच्या मनात असा प्रमाथी पालट व्हावा आणि महात्मा गांधींच्यासमोर तथाकथित निरुपद्रवी निदर्शने करण्याचा विचार टाकून देऊन नथूरामने पिस्तुलाच्या तीन गोळ्या समोर उभे राहून जवळून डागण्यासाठी त्या कृशशरीर वृद्धासमोर उडी घ्यावयाची हत्यान्याची कृती केली ?'' ह्या प्रश्नाने हत्यारी माणसाच्या मनातल्या अपराधाच्या हेतूविषयक प्रश्नाकडे बोट दाखविले आहे; अपराध्याच्या अपराधाबद्दलच्या मानसिक भूमिकेकडेच बोट दाखवले आहे. त्यांनी प्रयत्नांची शर्थ करून श्रीमानजी ! आपला विश्वास या मताकडे वळविण्याचा प्रयत्न केला आहे की, २० जानेवारी ते ३० जानेवारीमधल्या काळात असे काहीही महत्त्वाचे घडले नव्हते की, ज्यामुळे ह्या माणसांच्या–अभियुक्त क्रमांक १ व २ यांच्या-मनात असा प्रमाथी पालट करण्याचा परिणाम व्हावा. आणि अशी कोणतीही महत्त्वाची घटना नसताना त्यांनी श्रीमानजी ! आपणांस अशा निर्णयाप्रत यावयास म्हटले आहे की, २० तारखेला निदर्शन करण्याचा हेतू होता ही बचावपक्षाची उपपत्ति खोटी आहे, तसेच अभियुक्त क्रमांक १ नथूरामच्या हातून ३० तारखेला घडलेले कृत्य त्याचे एकट्याचे होते असे नसून ते कटाच्या अनुसरणाचे होते.

मी नम्रपणे असे म्हणेन की, ह्या मुद्द्याबद्दल बोलताना विद्वान महाअधिवक्त्यांना एक महत्त्वाची घटना दिसली नव्हती.

हेतूप्रधान प्रश्नाबद्दल बोलताना प्रश्नाच्या मनोविश्लेषणात्मक भूमिकेबद्दल बोलावे लागणार आहे. त्याबद्दल श्रीमानजी ! आपण आणि दुसऱ्या बाजूच्या विद्वान बंधुवर्यांनीही मला कृपा करून क्षमा करावी.

हे दोघे अभियुक्त आपटे आणि नथूराम ही कशा व्यक्तित्वाची माणसे आहेत याचा आपण विचार करू या. गांधीहत्त्या अभियोगपर्वाच्या पत्रावलीमधून ह्यांची ओळख आपणाला कशा प्रकारची मिळते ?

आपटेची ओळख आपणास पुणे येथील हिंदुराष्ट्र प्रकाशन संस्था मर्यादित या संस्थेचा प्रबंधक म्हणून करून देण्यात आली आहे, आणि नथूरामची ओळख आपणास 'हिंदुराष्ट्र' या वर्तमानपत्राचा संपादक म्हणून करून देण्यात आली आहे. आपणाला आपटे दिसतो तो एक प्रबंधक म्हणून, वस्तुनिष्ठ व्यवहारी म्हणून, एक कुटुंबवत्सल मनुष्य म्हणून, काही दोष असलेला प्राणी म्हणून पण असा की, त्याला तुरुंगात जाण्याची वेळ कधी आली नसावी, आणि जो आपल्या युक्तिबाज वृत्तीने आपल्या जीवनात समोर येऊन ठाकणाऱ्या समस्यांना कसे हाताळायचे ते चांगले जाणतो असा म्हणून. उलटपक्षी नथूरामची ओळख आपणाला होते ती एक संपादक म्हणून. भावनाप्रवण प्राणी म्हणून, ब्रह्मचारी म्हणून, आपल्या कुटुंबातल्या माणसांपासून दूर राहणारा म्हणून, कोणतेही दूषण नसलेला–मला म्हणायचे ते कोणतेही व्यसन नसलेला, जो आपल्या ध्येयनिष्ठेपायी कैदेतसुद्धा गेला आहे, परंतु आपल्या स्वतःच्या गरजा कशा सांभाळावयाच्या तेसुद्धा कदाचितच समजत असलेला म्हणून. साधी, एका कॉफी कपाची क्षुल्लक गरज, खरी म्हणजे नथूरामची स्वतःचीच, पण त्यासाठी विमानातल्या प्रवासात हवाई सुंदरीचे डोके पिकवतो तो आपटे ! जोवर नथूराम आपटेच्या सहवासात आहे तोवर त्याला वास्तवतः सांभाळत असतो आपटे. नथूरामची ओळख आपल्याला होते ती, एक निष्क्रिय वृत्तीच्या व्यक्तित्वाची, पण अडिग निष्ठावंताची. आपटे निदर्शने करायची असे ठरवितो. नथूरामला त्यामध्ये मुळीच आस्था नसते, तरीपण तो आपल्या मित्राच्याजवळ उभा असतो, पण तो एक आकर्षक म्हणून.

२० जानेवारी १९४८ च्या घटनाप्रसंगात नथूरामचे वर्तन फारच अकर्मकाचे आहे इतके निष्क्रिय की, विद्वान महाअधिवक्त्यांची मजल असे सुचविण्यापर्यंत जावी की, नथूराम २० जानेवारीच्या प्रसंगात कायर माणसासारखा वागला, त्याने आपल्या सहकाऱ्यांना कळू न देता, आपल्या भावाला वाचविण्याचा स्वार्थलिप्सित विचार केला असावा. २० जानेवारीच्या आयोजनाचा बोजवारा उडतो. आपटे अनावश्यक अडचणीत न पडण्याचे, स्वतःला वाचविण्याचे ठरवून तात्काळ दिल्ली सोडतो आणि सोबत नथूरामला घेऊन ठिकठिकाणी फिरतो. ते दोघे कानपूरमार्गे मुंबईला जातात. आपटेला धीर येतो. तो पुन्हा निदर्शन करायला हवे म्हणून ठरवतो, पण त्याचेजवळ पुरेसे पैसे नसतात. प्रत्युत्पन्न युक्तिबाज आपटे, त्याला ग्वाल्हेरची आठवण होते. कारण त्याने तेवढ्यातच दैनिक वर्तमानपत्रात एखादी बातमी वाचली असावी. आपटेला, एका प्रबंधकाला सुचते की, ग्वाल्हेरचे स्वयंसेवक बरोबर घ्यावेत, पैसेही वाचवावेत. नथूरामला ही कल्पना आवडली नसावी बहुतेक. तरीपण आपटे नथूरामला सांभाळतो. प्रबंधकाचे नियंत्रण संपादकावर अजूनही असते.

ते दोघे ग्वाल्हेरला जातात. परंतु डॉक्टर परचुरे त्यांचे कसे स्वागत करतात ? विशेषतः नथूरामचे ? डॉक्टर महाशय, त्याने डॉक्टरांच्या दाराशी उभे राहावे याबद्दल आश्चर्य दाखवून त्याचा अपमान करतात. बहुतेक नथूराम काही विशेष बोलला नसावा. डॉक्टर महाशयांनी त्यांना काही साहाय्य देण्यास नकार दिला. डॉक्टरांनी, ' नथूराम नुसता संपादक आहे, काही रचनात्मक कार्य करीत नाही ' अशी निर्भर्त्सना करून त्याचा अपमान केला असावा. डॉक्टर महाशय स्वतःच्या रचनात्मक कामे करण्याच्या क्षमतेवरून, त्याबद्दल दरबारातून मिळालेल्या इनामाच्या दर्पामुळे फुगलेले असावेत. डॉक्टर महाशय नथूरामचा–एका संपादकाचा–अपमान करतात.

आपटे नि नथूराम वैफल्यांच्या विचारांनी हताश होऊन २८ जानेवारी १९४८ च्या रात्री ग्वाल्हेरच्या रेल्वे स्टेशनवर परत येतात. आपटेने नथूरामला ग्वाल्हेरला आणावे आणि तेथे वृथाभिमानी डॉक्टरांकडून त्याचा अपमान करवावा यावरून नथूराम आपटेवर चिडला असावा. आपटेपासून काहीवेळ तरी दूर राहावे, त्याचा सहवास सोडावा असे नथूरामला वाटते आणि म्हणून आपटेने मुंबईला जाण्याचे म्हणताच नथूराम दिल्लीला जाण्याचे म्हणतो. थोडा वेळ वादावादी होऊन ते दोघे एकमेकांची सोबत सोडतात. वैफ-

त्याच्या विचारांनी विकलधीर झालेला आपटे, अपमानाच्या गोफण मान्यांनी पेटलेला नथूराम. आपटे मुंबईला जातो. नथूराम दिल्लीला जातो. त्या २८ जानेवारीच्या रात्री दोघे मित्र प्रथमच एकमेकांची संगत सोडतात. परंतु श्रीमान महोदय ! ग्वाल्हेरच्या स्टेशनवर त्यावेळी नुसते मित्रच एकमेकांपासून दूर झाले असे नव्हते. दिनांक २८ च्या त्यावेळी प्रबंधकाचे संपादकावरचे नियंत्रण सुटले होते. वस्तुनिष्ठ युक्तिबाज तर्क विवेकाचे नियंत्रण पेटलेल्या भावनांवर राहिले नव्हते. निदर्शनांची आवड असलेल्या कुटुंबवत्सलाचे नियंत्रण निष्ठावंतापासून तुटले होते. त्या २८ जानेवारी १९४८ च्या रात्री आपटेने काय केले होते याची त्याला कधी कल्पनाही नव्हती. नथूरामला एकटा सोडण्याचे काय परिणाम होतील याचा त्याला अंदाजही नसावा. नथूरामबरोबरच्या सहजीवनात आपटेने शेवटी, पण एकदाच नथूरामला एकटा सोडण्याची चूक केली होती.

आणि नथूराम कुठे जात आहे ? दिल्लीला, जेथे शांति, समाधान हिरावून घेतलेले, पाकिस्तानातून हाकलून दिलेले निर्वासित किंचाळत होते. नथूरामने पाहिले की, भारतीय शासन कृती करायला असमर्थ होत आहे. गांधीजींमुळे शासनाचे हात बांधले जात आहेत. अपमानाने चिडलेल्या संपादकाची प्रतिक्रिया काय झाली ? त्याने एक पिस्तुल मिळवले नि भारतीय शासकांचे हात महात्म्याच्या त्या विलक्षण शृंखलेतून मोकळे करण्याचे कार्य करून टाकले ! नथूराम तरी त्याच्या शब्दात हेच केल्याचे सांगत आहे.

म्हणून मला वाटते ग्वाल्हेर स्टेशनवरच्या दिनांक २८ जानेवारी १९४८ च्या रात्रीची ती वेळच या अभियोगपर्वाच्या कथौघाला कलाटणी देणारी परिवर्तक वेळ झाली आहे. याच वेळी एका क्षीणजर्जर जगद्वंद्य मानवाचा, आपल्या राष्ट्रपित्याचा शेवटचा श्वास निश्चित केला गेला.

मी अतिनम्रतेने श्रीमानजी ! आपणास आग्रहपूर्वक विनवितो की, आपण या अभियोगाच्या या विचारदर्शनाचे मनन करावे. त्यामुळेच महात्मा गांधीहत्या अभियोगपर्वाचे अभियुक्त क्र. १ व २–विपर्यस्त ग्रहाने अतिलांछित झालेले नथूराम व आपटे यांना न्याय मिळू शकेल !

[ क्रमशः ]

---

## लोकशाही

पृष्ठ ६ वरून

न्यायालयांचा हा अधिकार काढून घेतला तर, एखाद्या कायद्याच्या कायदेशीरपणाबाबत शंका असल्यास ती दूर करून घेण्याचा मार्गच राहत नाही. कायदे करण्याचा अधिकार पार्लमेंटला आहे, घटनादुरुस्तीचाही अधिकार तिला आहे. पण हे अधिकार घटनेने मर्यादित केलेले आहेत. कायद्यांचा व घटनेचा अर्थ लावण्याचा, घटनेने न्यायालयांना दिलेला अधिकार, काढून घेण्याची प्रवृत्ती वाढणे धोक्याचे आहे. आतापर्यंत १६८ कायदे न्यायालयांच्या कक्षेबाहेर ठेवले गेले आहेत. ही संख्या काही लहान नाही. एवढ्यावरच न थांबता, पार्लमेंटने केलेल्या कोणत्याही कायद्याविरुद्ध,कोणत्याही कारणासाठी कोर्टात जाता येणार नाही अशी सूचना स्वर्णसिंग समितीने आपल्या अहवालात केली आहे. मंत्रिमंडळ, विधिमंडळ आणि न्यायालये यांच्या अधिकारक्षेत्रांचा योग्य तोल राखण्यावरच लोकशाहीचे यश अवलंबून असते, यांपैकी कोणत्याही एका घटकाच्या हाती सत्ता एकवटली, की हा तोल बिघडतो. पंतप्रधान किंवा अध्यक्षांच्या हाती सर्वसत्ता केंद्रित झाल्यास हुकूमशाही येण्याचा धोका असतो. जबरदस्त व्यक्तिमत्त्वाचा नेता, विधिमंडळातील बहुमत आपल्या बाजूस आपल्या प्रभावाने सहज वळवू शकतो. आपल्याला पाहिजेत ते कायदे पास करून घेऊ शकतो. घटनेने दिलेल्या अधिकारांचा गैरवापर केला जाण्याचाही यात धोका असतो. अशा परिस्थितीत बेसनदशीर कायदे रद्द करून घेण्याचा, सामान्य नागरिकास उपलब्ध असलेला मार्ग म्हणजे कोर्टात त्याविरुद्ध दाद मागणे. घटनेच्या रक्षणाने, नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या रक्षणाचे कार्य न्यायालये करीत असतात. घटना व कायद्यांच्या क्लिष्ट कलमांचा अर्थ यांत आपली लोकशाही अडकून पडू नये हे खरे. लोकशाहीचा प्राण किंवा आत्मा अधिक मोलाचा. त्याला जपले पाहिजे. त्यासाठीच मंत्रिमंडळ, विधिमंडळ आणि न्यायालये यांचा योग्य तोल राखला गेला पाहिजे. कायद्यात काही उणीवा राहतात, त्याविरुद्ध कोर्टात जायला मनाई असेल तर, या चुका दुरुस्त व्हायच्या कशा ? न्यायालयांचे अधिकार मर्यादित करताना पर्यायी यंत्रणेची काही सोय करायला हवी. कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत असता, दिसून आलेल्या चुका, उणीवा दुरुस्त करण्यासाठी पार्लमेंटच्या सर्वपक्षीय समित्या नेमण्यात याव्या. न्यायालयांचे अधिकार मर्यादित केल्याने झालेली चूक त्यामुळे काही प्रमाणात तरी दुरुस्त होऊ शकेल.

**मोफत ! मोफत ! मोफत !**

# पांढरे डाग

आमचे औषधाचा प्रभाव केवळ तीन दिवसातच पांढरे डागावर दिसू लागून त्याचा रंग बदलू लागतो. आमचे औषध अतिप्रभावी असून त्याचा एकवेळ अवश्य अनुभव घ्या. प्रचाराकरता, एक औषधाची कुपी ट्रायलकरता मोफत दिली जाते. रोगाचे सविस्तर वर्णनासहित संपर्क साधून त्वरित औषध मागवा.

**जवाहर चिकित्सा केन्द्र १०५**
पोष्ट : कतरीसराय ( गया )

# बालगंधर्व रंगमंदिर

## एक प्रतिक्रिया

स. न.

शनिवार दि. १५ मे १९७६ च्या 'माणूस'मधील 'काळोखात बुडालेले पुण्याचे बालगंधर्व रंगमंदिर' हा लेख वाचला. पान ६ वरील चौकटीत लिहिलेल्या मजकुराविषयी 'मीनाकुमारीच्या कथाकारां-पैकी एक' या नात्याने काही खुलासा करीत आहे.

१ एप्रिल ७६ पासून 'बालगंधर्व'मधील नाटकांचे प्रयोग रद्द करण्यात आले आणि हळूहळू त्याचा परिणाम तेथील रोजच्या वातावरणात होऊ लागला. रोज असणारी गर्दी नव्हती. नाट्यरसिकांशिवाय जे लोक फिरायला येत होते ते 'शोकेस' पाहायचे, कट्टयावर बसून गप्पा मारायचे. तेसुद्धा बंद झाले. मोगऱ्याचे गजरे विकणारी पोरं दिसत नव्हती. नेहमी दरवळत असणारा सुगंधच जणू संपला होता. काही कारणांमुळे रंग-मंदिर बंद आहे म्हणून लोकांनी, पुण्याच्या रसिकांनी, तिकडच्या बाजूला फिरकूसुद्धा नये याचं आम्हाला आश्चर्य वाटत होतं. आमच्यासारख्या नेहमी तिथं वावरणाऱ्या माणसाला हे सारं पाहवत नव्हतं. १ मेला आमचा कार्यक्रम होता. लोकांनी तर रंग-मंदिरावर बहिष्कार टाकला होता. अशा विचित्र परिस्थितीत आमच्या कार्यक्रमाला लोक येणं शक्य नव्हते. याची जाणीव आम्हाला सारखी होऊ लागली. पुण्याच्या लोकांना एखादा चांगला कार्यक्रम पाहायला ओढून आणावे लागते असा आमचा आज-वरचा अनुभव. नाहीतर 'अर्धे पान' जाहि-रात करण्याची गरजच काय? डोळ्यांना खुपेल अशी जाहिरात केली तरच लोक ती वाचतात आणि मग खिसा चाचपून २ रुपयांचं तिकीट, १ रुपायाला देणार का, असं विचारीत प्रयोग पाहायला येतात आणि जणू काय, आपण निर्मात्यावर उपकार करीत आहोत अशा थाटात वावरत असतात. ही नेहमीची परिस्थिती आणि आता तर संपूर्ण वातावरण गंभीर होते. आमच्या प्रयोगापूर्वी ४।५ प्रयोग झाले. सूरजहाँ, दरबार इ. त्यांची एकूण वाईट परिस्थिती पाहिली. निश्चितच आमच्यावरही हीच पाळी येणार होती. याचा विचार करीत असताना 'ह्या' जाहिरातीची कल्पना आमच्या डोक्यात आली आणि ठरवले बस्स. अशीच जाहिरात करायची! त्या जाहि-रातीचा परिणाम विलक्षण झाला आणि लोक पुन्हा रंगमंदिराकडे यायला लागले. थोडीफार जी गर्दी झाली ती केवळ याच जाहिरातीमुळं असं आम्ही ठामपणे सांगतो. गेल्या दीड महिन्यात आमचाच कार्यक्रम यशस्वी झाला. ही गोष्ट सोपी नव्हती. हा झाला आमचा उद्देश. आता तुमच्या मजकुरा-कडे वळतो.

नाट्यनिर्माता संघानं प्रयोग रद्द केले म्हणजे इतरांनी (संघात नसणाऱ्यांनी) प्रयोग करू नयेत, आपला धंदा बंद ठेवावा अशीच आपली अपेक्षा दिसते. ही तुमची इच्छा साफ चुकीची आहे. नाटकाकडे किंवा इतर कोणत्याही कार्यक्रमाकडे नुसता कला-त्मक दृष्टिकोन ठेवून चालत नाही. तेसुद्धा करून पाहिलं आहे. जे ह्याप्रमाणे वागतात त्यांची परिस्थिती काय होते हे आम्हाला चांगले ठाऊक आहे. तेव्हा आमचा धंदा म्हणून म्हणा किंवा काहीही म्हटले तरी, आम्हाला कार्यक्रम करणे जरूरीचे होते. आम्ही तो केला. समजा, 'नाट्यनिर्माता' संघाला पाठिंबा द्यायचा म्हणून आम्ही प्रयोग केले नसते तर, संघाने त्याची विशेष दखल घेतली असती काय? उत्तर नकारा-त्मक आहे. तशी जर तयारी त्यांनी दर्शवली असती तर. आम्ही विचार केला असता एवढेच! इतरांच्या बाबतीत हे घडले आहे. तुमच्या लेखातसुद्धा हे आहे. प्रयोग करू नये म्हणून दडपण आणणे, मुंबईत तारखा मिळवून देतो वगैरे बोलणे झाले असे आम्ही-सुद्धा ऐकतो. परंतु ही गोष्ट आम्हाला अजि-बात मान्य नव्हती. निर्माता संघाचा—आमचा काही संबंध नाही. तेव्हा त्यांना चिथावणी देऊन आम्हाला काय करायचे? तुम्हीच मात्र सारासार विचार न करता, 'चिथा-वणीखोर जाहिरात' केली, असा आमच्यावर आरोप केला. निर्मात्या संघाचा तुम्हाला एवढा पुळका यायचं कारण काय? स्वतःचं 'वजन' दाखवायचे होते काय? आमच्या जाहिरातीचा तुमच्या लेखाशी संदर्भ जोडण्याचे काही कारण नव्हते. केवळ आग-पाखड करायला ही नामी संधी होती एवढेच आणि ती तुम्ही साधली. आग लावणे आणि पाहत बसणे हा प्रकार आम्हाला माहीत नाही. हे धंदे तुमचेच. आमच्या जाहिराती-मुळं गंभीर वातावरण निवळण्यास मदत झाली हे निश्चित. ही वस्तुस्थिती सर्वजण मान्य करतात. कित्येक जणांनी त्याबद्दल आमचे कौतुक केले आहे. ही जाहिरात वाचल्यानंतर रंगमंदिराचे व्यवस्थापक तसेच इतर अनेक लोकांनी तुमच्या भाषेत रसिकांनी जाहिरात योग्य केली असल्याचा निर्वाळा दिला. जाहिरातीच्या प्रतिक्रिया अनुकूल होत्या, तुम्ही फक्त एक व्यक्ती त्याच्या विरुद्ध आहात आणि त्याची आम्हाला पर्वा नाही. तुमचाच विवेक ढळला आहे हे कोणीही सांगेल. कळावे.

—अनिल व्यं. कुलकर्णी

## खुलासा

श्री. अनिल कुलकर्णी यांनी 'मीनाकुमा-रीच्या कथाकारांपैकी एक' या नात्याने केलेला ज्वलज्जहाल खुलासा वाचला आणि गैरसमज करून घेण्याच्या व विपर्यास कर-ण्याच्या त्यांच्या क्षमतेबद्दल सादर कुतूहल वाटले. त्या आश्चर्यापोटीच त्यांना उत्तर देणे आवश्यक वाटले.

१. आपल्या पत्राच्या दुसऱ्याच परिच्छे-दात एक एप्रिलनंतरच्या 'बालगंधर्व'च्या स्थितीचे जे हृदयस्पर्शी वर्णन श्री. कुलकर्णी यांनी केले आहे, ते अगदी खरे आहे. तथापि त्या उदासीनतेचा जो संबंध ते आपल्या कार्यक्रमाच्या यशापयशाशी लावू पाहतात, तो बादरायणसंबंधाचा अश्लाघ्य प्रकार आहे.

पुण्याचे रसिक बालगंधर्वांवर भटकायला येत नाहीत याचा अर्थ, तिथल्या एखाद्या कार्यक्रमालाही येणार नाहीत, असा होत नाही. 'लोकांनी' रंगमंदिरावर बहिष्कार टाकला होता, हे श्री. कुलकर्णी यांचे विधान दिशाभूल करणारे व हास्यास्पद आहे. रंगमंदिरावर बहिष्कार टाकला, तो नाटयनिर्मात्यांनी. पुणेकरांची इच्छा नाटयगृह चालू राहावे अशीच होती व आहे. तेव्हा बालगंधर्वच्या सध्याच्या अंधारात पुणेकर तिथे फिरायला येत नव्हते याचा अर्थ, एखादा चांगला कार्यक्रम तिथे आयोजित केला तर त्यालाही ते येणार नाहीत, असा कसा करता येईल? मागील वाक्यातील 'चांगला' हा शब्द महत्त्वाचा आहे. 'अशा विचित्र परिस्थितीत आमच्या कार्यक्रमाला लोक येणं शक्य नव्हतं,' असं म्हणून परिस्थितीच्या माथी खापर फोडणारे कुलकर्णी या मुद्यावर आत्मपरीक्षण करतील काय?

२. पत्राच्या दुसऱ्या परिच्छेदातच पुणेकरांच्या सर्वमान्य रसिकतेवर व दर्जेदार अभिरुचीवर जे गलिच्छ शिंतोडे श्री. कुलकर्णी यांनी उडविले आहेत, ते वस्तुस्थिती निदर्शक नव्हेत. अर्धे पान जाहिरात, डोळयांना खुपण्यासाठी केलेले प्रयत्न आणि जाहिरातबाजी यातल्या सीमारेषा सूक्ष्म आहेत. जाहिरातीचे तंत्रमंत्र, त्यावर होणारी उधळपट्टी आणि त्यातली निरर्थकता हा स्वतंत्र वादविषय होऊ शकेल, तथापि एक नक्की की वाईट नाटक किंवा खराब कार्यक्रम यांची जाहिरात, अर्धे पानच नाही तर वृत्तपत्राची संपूर्ण पुरवणी काढून जरी केली, तरी प्रतिसादात वाढ होणार नाही. दोन रुपयाचं तिकीट एका रुपयास मागणे वगैरे उपकारी थाट हा कुलकर्णी यांच्या कल्पकतेचा हीन आविष्कार. एखाद्या अडाणी खेडुताची घासाघीस पाहून संपूर्ण पुणेकर प्रेक्षकांची जी बदनामी ते करतात, ती त्यांच्याच हलक्या मनोवृत्तीची द्योतक आहे. बालगंधर्व आणि फुलेमंडई यांच्या व्यवहारातील फरकही, सगळयाच पुणेकरांना कळत नाही, असं श्री. कुलकर्णींना म्हणायचं आहे का? 'ही नेहमीची परिस्थिती' म्हणून श्री. कुलकर्णी जे काही नमूद करतात, ती त्यांच्याच कार्यक्रमांची दुःस्थिती आहे असं दिसतं.

३. एका महत्त्वाच्या मुद्याकडे कुलकर्णींच्या पत्रात सोयिस्करपणे डोळेझाक करण्यात आलेली आहे. चांगला कार्यक्रम पहायला पुणेकरांना ओढून आणावं लागत नाही. ते आपण होऊनच तिकडे ओढले जातात. एरवी यापूर्वी बालगंधर्व व भरत नाटयमंदिरात एकाचवेळी वेगवेगळे कार्यक्रम, नाटके इ. 'हाऊसफुल' गर्दीत गेल्याची जी उदाहरणं आहेत, ती घडली नसती. तेव्हा कुलकर्णी यांनी कार्यक्रमांच्या 'चांगले'पणाची आपली व्याख्या तपासून पाहावी. स्वतःचे सर्वच कार्यक्रम तेवढे 'चांगले' असा त्यांचा गैरसमज झाला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. चोखंदळ अभिरुचीसाठी नावाजलेल्या पुण्यात, प्रत्येक कार्यक्रमाला त्याच्या – individual merit – वैयक्तिक गुणावगुणांवर आधारूनच रसिकांची दाद मिळते. 'ती फुलराणी' सारखे एखादे नाटक साडेसात रु. दराच्या पंधरा रांगा ठेवल्या तरी overful गर्दीत चालते; मग ते बालगंधर्वला आहे, की भरतमध्ये हा मुद्दा गौण ठरतो. तेव्हा सूरजहाँ, दरबार वगैरेंच्या अपयशाची जी उदाहरणं कुलकर्णी देतात ती संपूर्णपणे गैरलागू आहेत. हे कार्यक्रम अयशस्वी ठरले असतील तर, त्याचा संबंध त्यांच्या quality शी आहे, त्यांच्या appeal शी आहे. बालगंधर्ववर पसरलेल्या अवकळेशी त्यांचा काडीमात्र संबंध जोडता येणार नाही. प्रेक्षक घराबाहेर पडतो, तो त्या त्या कार्यक्रमाच्या दर्जाचा विचार करून. 'बालगंधर्वला गंभीर वातावरण आहे' किंवा 'तिथल्या कट्टयांवर फिरस्त्यांची गर्दी नसते' अशा फालतू कारणासाठी पुणेकर तिथला कार्यक्रमच चुकवतोल असा पोरकट जावईशोध लावल्याबद्दल कुलकर्णी यांची कीव करावीशी वाटते. रंगमंदिराकडे लोक पुन्हा यायला लागले याचं श्रेय आपल्या जाहिरातीकडे खेचण्याचा त्यांचा प्रयत्न केविलवाणा आणि साफ फसलेल्यात जमा आहे. लोक आले ते काय तुमच्या जाहिरातीतल्या साहित्यगुणांवर लुब्ध होऊन?' 'थोडीफार गर्दी झाली ती या जाहिरातीमुळेच,' असं श्री. कुलकर्णी ठामपणे सांगतात तेव्हा त्यांच्या ठामपणाचं कौतुक करावंसं वाटलं तरी त्यांच्या argument मध्ये तेवढा एकमेवच गुण असल्याची गोष्ट लपत नाही. 'जाहिरातीमळे' गर्दी झाली असं ते सांगतात, तेव्हा आपल्या कार्यक्रमाचा दर्जा आणि appeal संबंधी त्यांना किती आत्मविश्वास आहे, हे स्पष्टच होतं! कुलकर्णींच्या ठाम निर्णयातली चूक एवढीच की त्यांना प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळाला असेलच तर तो 'त्या' जाहिरातीमुळे नसून, कार्यक्रम दर्जेदार असेल अशी प्रेक्षकांची समजूत झाल्यामुळे! (स्व. मीनाकुमारीच्या स्मृती आणि जनमानसातला तिच्याविषयीचा आदर–भक्ती यांचाही वाटा त्यात खूप मोठा आहे. तुमच्या जाहिरातीमुळे तिच्या आठवणींनासुद्धा काळिमा लागलाय् यात शंका नाही, पण ही आणि इतर काही कडवट सत्य, तपशीलवजा असल्याने स्थलमर्यादेमुळे व विषयमर्यादेमुळे मी ती कुलकर्णींच्या गळी उतरवू इच्छित नाही.) 'पुणेकरांना चांगल्या कार्यक्रमांना ओढून आणावं लागतं' हा कुलकर्णींना आजवर आलेला अनुभव, हे चांगल्या कार्यक्रमाची व्याख्या त्यांना न समजल्याचंच लक्षण आहे. तुमचा कार्यक्रम तुम्हाला चांगला वाटेल हे एक वेळ ठीक, पण प्रेक्षकांनाही तसंच नेहमीच वाटावं हा जुलूम काय म्हणून? तुमचे कार्यक्रम–तथाकथित चांगले कार्यक्रम–यशस्वी होत नसतील, तर प्रेक्षकांना ते पसंत पडत नाहीत, पुरेसे दर्जेदार आणि appealing नाहीत, असं समजा. तुमच्या चुकीचं खापर आमच्या रसिकतेच्या माथी फोडाल तर ते का सहन करावं? जाता जाता एक सांगतो, खिसा चाचपीत रुपया दोन रुपयासाठी घासाघीस करणारे आणि निर्मात्यावर उपकार केल्याच्या थाटात वावरणारे दुर्मिळ जातीचे प्रेक्षणीय अडाणी प्रेक्षक रंगमंदिरासारख्या कला–वास्तूत श्री. कुलकर्णींना भेटले असतील तर ती, त्यांच्या कार्यक्रमांच्या दर्ज्यावरची एक विदारक 'कॉमेंट' आहे. अशा प्रेक्षकांनासुद्धा तुमचे कार्यक्रम दोन रुपडयांच्याही लायकीचे वाटत नसावेत, दुसरे काय?

४. श्री. कुलकर्णींच्या पत्रातला तिसरा व शेवटचा परिच्छेद माझ्यावर वैयक्तिक टीका करणारा असून बऱ्यापैकी मनोरंजक व हास्यस्फोटक आहे. 'निर्मातासंघाने प्रयोग रद्द केल्यानंतर इतरांनीही धंदा बंद ठेवावा' ही अपेक्षा साफ चुकीची आहेच. फक्त ही अपेक्षा माझी नव्हती–नाही, एवढेच. माझ्या संपूर्ण लेखात मी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणेही असं कुठंच सुचवलेलं नाही. श्री. कुणकर्णी यांनी

जरूर प्रयोग करावेत, अगदी खुशाल धंदा म्हणून उघडपणे व निर्धास्तपणे करावेत, निर्माता संघाशी संबंध न ठेवता करावेत, याला कुणाचीच हरकत असणार नाही. इतरांनी प्रयोग करण्यास मी माझ्या १५ मे ७६ च्या लेखात बिलकूल आक्षेप घेतलेला नाही. श्री. कुलकर्णी यांना असा काही तपास लागला असेल, तर तो बहुधा त्यांचा दृष्टि-दोष असावा. त्यांनी संबंधित लेखांश उद्धृत केला असता, निदान उल्लेखिला असता, तर बरे झाले असते. माझी अपेक्षा एवढीच की, प्रयोग करताना, त्या प्रयोगाला ' बालगंधर्वात प्रयोग करणारे -(havs) व न करणारे (have-nots) यांच्यातील गळेकापू झुंजीचे ' स्वरूप येऊ नये. हे पथ्य कुलकर्णींच्या जाहिरातीमुळे पाळले गेले नाही, आणि म्हणूनच ती जाहिरात चिथावणीखोर असल्याचा आरोप मी केला, अजूनही करीन. बहिष्कार घालणारे व न घालणारे या दोन पक्षांत वितुष्ट यावे, परस्परसंशय व शत्रुत्व निर्माण व्हावे असे काहीसे विचित्र स्वरूप त्या जाहिरातीचे, त्यातील आवाहनाचे आहे. ते आवाहन म्हणजे बहिष्कार घालणाऱ्यांना आव्हान देण्याचा पवित्रा वाटतो. बालगंधर्व मिळू शकत नसल्याने अगोदरच नाट्य व्यवसायाची कोंडी झालेली, अशा परिस्थितीत दुसऱ्या बाजूस चिडविणारी, त्यांना डिवचणारी अशी ही जाहिरात होती, हे निश्चित. ' निर्मातासंघाचा मला पुळका आला होता ' ही कुलकर्णींची आणखी एक कविकल्पना. ही सुद्धा त्यांनी अवतरणासहित सिद्ध केली असती तर, विचार करण्यालायक होती. हा लेख मी लिहिला तो प्रश्नाच्या सर्व बाजू निःपक्षपातीपणाने वाचकांसमोर मांडण्यासाठी. कुणा एका पक्षाची वकिली करण्यासाठी ' माणूस ' सारखे व्यासपीठ न वापरावं हे मला कळतं आणि ते वापरू देऊ नये हे संपादकांनाही कळतं. कळलेलं नाही कुलकर्णींनाच. अर्थात प्रत्येकाची ग्रहणशक्ती वेगळी, तेव्हा दोष त्यांना कसा द्यावा? निर्माता संघ किंवा महापालिका यातल्या कोणत्याच गोटात माझं ' वजन ' नाही, असल्या ठिकाणी ठेवण्याइतकं माझं वजन वाया चाललेलंही नाही. मला ' वजन दाखवायचं ' किंवा वापरायचंच असतं, तर मी ते तडजोडीसाठी निश्चित वापरलं असतं.

५. कुलकर्णी यांचं यापुढचं पत्र म्हणजे आकस्ताळी अकांडतांडवाचा उत्तम नमुना आहे. अर्थातच ते विशेषसं दखलपात्र नाही. एक मुद्दा मात्र वेगळा आहे. कुलकर्णींच्या जाहिरातीचा संबंध माझ्या लेखाशी आहे की नाही, हे ठरवण्याचा अधिकार लेखक व संपादक या नात्याने मी व श्री. माजगावकर यांचा आहे. ही जाहिरात म्हणजे काही कुलकर्णींच्या घरचा खाजगी दस्तऐवज पळवून आणलेला नव्हे. त्यांनी ती जाहीररीत्या प्रसिद्ध केली आणि आम्हाला ती एका महत्त्वपूर्ण व गंभीर अशा सार्वजनिक समस्येशी संबंधित वाटली. तेव्हा याबद्दल न्यायासनावर बसून निकाल करण्याचा हक्क कुलकर्णींना कसा पोचतो? ' आगपाखड, आग लावून मजा पाहत बसणे ' वगैरे त्यांचे ज्वलंत, जळजळीत आरोप मी हसून सोडून दिले आहेत. त्यांनी माझ्या या आगलाव्या कारवायांची तक्रार पोलिसात किंवा फायर-ब्रिगेडला करायला हरकत नाही. त्यांच्या जाहिरातीमुळे वातावरण निवळण्याची शक्यता दूरच, चिघळण्याचीच संभाव्यता जास्त होती, एरवी त्यांच्या वाटेला जातो कोण? ही जाहिरात वाचून कुलकर्णींचं कौतुक करणाऱ्या लोकांना आमच्या भाषेत ' रसिक ' म्हणतात ही बातमी कुलकर्णींना कोणी दिली? या वर्षातला हा एक प्रचंड विनोद आहे.

शेवटी एकच शंका आहे : माझा विवेक ढळला असून कुलकर्णींना माझी (किंवा त्यांच्यासारख्यांना माझ्यासारख्यांची) पर्वा नाही, हे ठीकच, पण मग श्री. कुलकर्णी यांनी हा सारा पत्रप्रपंच कशासाठी केला?

—शिरिष सहस्रबुद्धे

खास कौटुंबिक अश्रूंमध्ये भिजलेले एक कंटाळवाणे नाटक

# निघाले आज तिकडच्या घरी

समजा,
फक्त समजा;
की तुम्हाला
एक असं नाटक पहायला लागलं...
जे कौटुंबिक जिव्हाळ्यानं ओथंबणारं,
पुज्यपावन भारतीय संस्कृतीत लडबडलेलं,
शिवाय मग थोडंसं रहस्यमय,
थोडंसं खळबळजनक, किरकोळ
हास्यस्फोटक.
आणि ( विशेषतः भाबड्या बायाबाप-ड्यांना )
हमखास भरपूर रडविणारं, असं आहे,
तर तुम्ही काय कराल ;
मी मोठ्या धाडसानं
ते शेवटपर्यंत पाहिलं !

' निघाले आज तिकडच्या घरी ' या नावावरनंच नाटकाची जातकुळी पाहायला जाण्याआधीच उमगली होती आणि मी बऱ्यापैकी धसकलो होतो. नाटक कोल्हटकर–कालेलकरी संप्रदायापैकी असणार ही माझी अटकळ अर्थातच आणि दुर्दैवानं खरी ठरली. ' दुर्वांची जुडी ' आणि ' दिवा जळू दे ' मुळे फॉर्मात आलेला हा खास कौटुंबिक जिव्हाळ्याचा फॉर्म्युला ही मराठी रंगभूमीवरची एक दुर्दैवी घडामोड आहे असं माझं स्पष्ट मत आहे. अर्थात ते मी शक्य तितक्या सौम्य शब्दांत मांडलंय; कारण या जिव्हाळ्याच्या कारखान्याला मिळालेली प्रचंड लोकप्रियता सहजासहजी नजरेआड करण्यासाठी नाही. टीकाकार, नवतेचे–प्रायोगिकतेचे समर्थक आणि सुबुद्ध रसिक यांच्या विरोधाला अजिबात धूप न घालता या ' का. को.' पंथातल्या नाटकांची आणि प्रयोगांची संख्या

मोठी आहे. प्रायोगिक नाटकांना मिळणारा अल्प प्रतिसाद आणि अशा पारंपारिक नाटकांना होणारी भाऊगर्दी यांची तुलना केली तर, लोकाश्रयाचा निराशाजनक आंधळेपणा प्रत्ययास येतो आणि मराठी रंगभूमीच्या आधुनिकीकरणात ही जुनाट नाटयजमात म्हणजे एक मोठी धोंड आहे, असं वाटल्याशिवाय राहत नाही. सर्वसामान्यांच्या भावनेला हात वगैरे घालण्याचा एकमेव (अव–) गुण असणाऱ्या या पठडीतल्या नाटकांतच ना. ग. करमरकरलिखित आणि यशवंत दत्त दिग्दर्शित ' निघाले आज तिकडच्या घरी ' चा समावेश होतो.

नाटकाचं कथानक कुठल्याही कौटुंबिक जिव्हाळ्याच्या भावनाप्रधान, घरंदाज, घरेलू, सांस्कृतिक नाटकाला शोभेल असंच आहे, अशा नाटकांचाही आता एक तुळशीवृंदावन–छाप मसाला तयार झाला आहे आणि तो प्रेक्षकांच्या गळी उतरवायचीही एक ठोकबंद पद्धत निर्माण झालेली आहे. ' निघाले... घरी ' या चाकोरीला धक्का न लावण्याची हळुवार, पण धंदेवाईक काळजी घेत बेतलेल्या, आखीव रेखीव रस्त्याने वाटचाल करते, तर सुमती (नवतारका स्वरूपा) ही, अस्सल भारतीय संस्कृतीवरच पोसलेली सर्वगुणसंपन्न तरुणी ही नाटकाची नायिका, चांगुलपणाचा अर्क असलेले–सरळ शब्दात भोळसट आणि बावळट असलेले–असे तिचे पूज्य पिताची (चंद्रकांत गोखले) आणि जहांबाजपणाचा अर्क अशी–म्हणजे माझ्या मते जंगली आणि अविश्वसनीयरीत्या अमानुष वागणारी–तिची सावत्र आई यांच्या घुसफुसत्या त्रिकोणात दोन पापग्रह घुसतात. जोशीबुवा (रमेश मेढेकर) आणि साहेब (यशवंत दत्त). सुमतीवर मन गेलेला साहेब तिच्या प्राप्तीसाठी सामदामभेदादिक सर्व उपाय जोशीबुवासारख्या हस्तकाकरती राबवितो आणि बदमाष असूनही वरवर उपकारकर्त्या सज्जनाचं सोंग वठवतो. सुमतीचं डी. एस. पी. भय्यासाहेबांशी (विजयानंद चांदेकर) झालेलं लग्न मोडायचा घाट घालतो. तथापि तो शेवटी बोलूनचालून खलनायक तेव्हा त्याचे डावपेच फसून शेवट गोडचगोड होतो हे आलंच. याशिवाय रंगामामा नामक एक ' पात्र ' नाटकातील सज्जन फळीत सामील आहे. हे अर्थातच शरद तळवलकर असल्याने आणि ही भूमिका त्यांच्यासाठीच प्रयत्नपूर्वक पाडलेली असल्याने, आपल्या जुनाट शैलीत कोणताही बदल होणार नाही याची दक्षता घेतघेतच ते हुकमी हशे वसूल करतात. हा रंगामामा कापडदुकानावर असल्याचे दाखविले गेले असले तरी, तो दर पाच मिनिटांनी एकदा रंगमंचावर हजेरी लावून शिवाय धंद्याच्या गोष्टी करतो, यावरून त्याचा दिवस चोवीसपेक्षा बऱ्याच अधिक तासांचा असावा अंदाज करायला बराच वाव आहे. अर्थात तरीही या पात्रामुळेच नाटक थोडंफार सुसह्य होतं हे नाकारता येणार नाही. प्रश्न उरतो तो फक्त नावीन्याचा, स्वतंत्र निर्मितीमूल्यांचा, Originality चा !

नायिका सुमती हिची व्यक्तिरेखा हे एक वर्णनापलिकडचं भयावह प्रकरण आहे. ही तोंडानं वारंवार आपलं धैर्य, तेजस्वीपणा, अस्मिता वगैरे किंवा तत्सम प्रकारच्या घोषणा करीत असून, ती बोलत असते तेव्हा आणि नसते तेव्हाही अखंड रडतच असते. शोकावेग असह्य होऊन पुनः पुन्हा आतल्या खोलीत निघून जाणं हा तिचा विरंगुळा (आणि नाटककाराची सोय) असावा असा माझा तर्क आहे. आपल्या मृत आईच्या फोटोसमोर गळा काढून ' आपल्या वाटयाला जन्मल्यापासनंच दुःख–दुर्दैव आल्याचा ' कांगावा ती इतका करते की, हे दुर्दैव आपल्या नशिबी आल्याचं दुःख प्रेक्षकालाही होतं. स्वरूपा या नवतारकेनं ही भूमिका शक्य तितकी भडक मेलोड्रॅमॅटिक केली आहे. तिचे व्यक्तिमत्त्वही आकर्षक नाही, कामात जरूर ती सफाईही नाही. इंदू नावेलकर यांची सावत्र आईची आक्रस्ताळी, अवास्तव आणि कळाहीन–कलाहीन भूमिका पाहणं, विशेषतः त्यांचं ठोकळेबाज टोनिंग व बेअरिंग सहन करणं हा निव्वळ क्रूर जुलूम होता. नायक वाटणाऱ्या खलनायकाची उलटया काळजाची थंड भूमिका यशवंत दत्त यांनी वाईट वठवली नाही. चेहरा बहुधा निर्विकार ठेवून त्यांनी केलेली संवादफेक संयमित होती हेही नसे थोडके. खलनायक वाटणाऱ्या नायकाच्या (भय्यासाहेब) भूमिकेत प्रायोगिक रंगभूमीवरील एक उदयोन्मुख अभिनेता विजयानंद चांदेकर अवघडलेले व प्रभावहीन वाटले. रमेश मेढेकर व मुख्यतः प्रायोगिक रंगभूमीवर वावरणाऱ्या जुन्या–जाणत्या अभिनेत्याने समर्थपणे साकार केलेली जोशीची भूमिका हा या नाटकातला अभिनयाच्या दृष्टिकोनातून एकमेव प्लस–पॉइंट.

नायिकेची कर्मकटकट आणि रंगामामाची वटवट यांच्याभोवती फिरणारं हे नाटक, नावाजलेली नावं यादीमध्ये असूनसुद्धा कुठेही पकड घेत नाही. याचं मुख्य कारण लेखनात दम नाही हे आहे. सरधोपट पद्धतीचं कामचलाऊ दिग्दर्शन हे दुसरं कारण. शरद तळवलकरांचे काही ' इनोदी ' संवाद वगळता लेखनात प्रतिभेच्या खुणा अभावानेच तळपतात. भडक सुख–दुःख, ठराविक साच्याचे संवाद, परमेश्वराला जाब विचारण्यासारख्या पोरकट कल्पना, बटबटीत सांकेतिक पात्रचित्रण. कुठं human touch नाही, human probability चा विचार नाही, नुसते छापाचे गणपती. दिग्दर्शकाचा थांगपत्ताच लागत नाही. अनेकदा पात्रांच्या रंगमंचीय हालचाली, जाणं–येणं कृत्रिमतः रचल्यासारखं वाटतं, उदा. जोशीसाहेब यांची सुमतीकडील पहिली भेट. संवाद पाठ करून घ्यायचं श्रेयसुद्धा दिग्दर्शक यशवंत दत्त यांच्या नावे जमा करता येण्यासारखं नाही. बाकी नेपथ्य–प्रकाश–पार्श्वसंगीत वगैरे व्यवस्थित इतकंच.

नाटयपरीक्षणाचं रूपांतर गालिप्रदानात होऊ नये या भीतीनं थांबतो. अर्थात काही लिहिण्यालायक शिल्लक उरलंय असंही नाही. शिवाय कुणी सांगावं, या अश्रूंत भिजलेल्या नाटकाचेही हाऊसफुल् कुटुंब-गर्दीत प्रयोगामागून प्रयोग झळकणं अशक्य नाही. तेव्हा तत्पूर्वी...

एवढंच की...

परमेश्वर, असलाच, तर माझ्यासह सर्व संबंधितांच्या आत्म्यास शांती देवो.

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ५।६।७६ ते ११।६।७६

**मेष : अनपेक्षित बदल**

तुमची रास अग्नितत्त्वाची आहे. राशिस्वामी मंगळ शनीच्या सहवासात आहे. या वेळेच्या एकंदर ग्रहमानाचे स्वरूप असे आहे की, मन स्थिर राहणे अगदी अशक्य होईल. मात्र यामुळे काही नुकसानच होईल असे समजू नका. घर, स्थावर, नोकरी, धंदा यांत काही महत्त्वाच्या घटना, महत्त्वाचे बदल घडवावे असे विचार तुमच्या मनात येऊ लागतील. काही वेळा अनपेक्षित व अतिरेकी घडू शकेल. धंद्यात–भागीदारी संबंधांत मतभेद होऊ लागणार नाहीत असे समजू नका. व्यापार, दलाली यांत भागीदारी स्वीकारू नका. नोकरीचे स्वरूप थोडेफार अधिक स्वच्छ, स्पष्ट पण कडक होईल. असे असले तरी अपेक्षापूर्तीचे समाधान मिळेल. शुभ दिनांक ५–६–८.

**महिलांना :** जागेच्या संदर्भात अनावश्यक भीती सोडा. नोकरी करताना ओढाताण होईल. वरिष्ठांची सहानुभूती मात्र राहील.

**विद्यार्थ्यांना :** निवासस्थान अगर वसतीगृह यांसाठी बरीच धावपळ करावी लागेल. काम होईल.

**वृषभ : त्रास जाणवणार नाही**

सुखस्थानी चंद्र असताना आठवडा येत आहे. मन असमाधानी राहू शकेल. अकारण कोणती ना कोणती भीती मनात रेंगाळू लागेल. गतस्मृतीने मन भारावूनही येईल. पण बाराव्या गुरूचे हे उपद्व्याप प्रत्यक्षात मात्र तुमचे कोणतेच नुकसान करू शकणार नाहीत. जागेत बदल होऊ शकेल. ज्यांना जागेचा प्रश्न भेडसावत आहे त्यांच्या प्रश्नाला चालना मिळू शकेल. सत्तास्थानावरील महान व्यक्तीच्या भेटीचा योग अनपेक्षित जमून आल्यास आश्चर्य मानू नका. तुमचा कोणत्याही प्रकारचा व्यवसाय असो. त्यात गुंतवणूक करण्यासाठी पैशाचे साहाय्य होऊ शकेल. नोकरीत काही महत्त्वाचे प्रश्न मार्गी लागतील. तब्बेतीची काळजी घ्या. शुभ दिनांक ५–७–८.

**महिलांना :** घरगुती अडचणी आल्या तरी यावर तुम्ही धैर्याने मात करू शकाल. जुने येणे वसूल होईल.

**विद्यार्थ्यांना :** शाळेत विविध कार्यक्रमांत गुंतून जाल. श्रम व पैसा खर्च करून समाधान मात्र मिळेल.

**मिथुन : डावपेच टाळा**

तुम्ही तुमची बुद्धी कोणत्याही विधायक समस्या सोडवण्यासाठी वापरली, तर तुमचे निश्चित कौतुक होईल. पण तसा सुविचार सध्यातरी तुमच्या मनात येणे अवघड आहे. भाऊबंद व नातेवाईक यांच्याबाबतीत तुम्ही आजवर जे धोरण ठेवलेत ते बदलणे– माघार घेणे आज घडणार आहे. साडेसाती आहे व दुसरा शनी-मंगळ अविचाराने तुम्हाला यश मिळू देणार नाही. ज्यांच्यावर उपकार केलेत तेच आता विरुद्ध वागू लागतील. पश्चातापाचे वारे मनात डोकावू लागतील. नोकरीतील एखादा महत्त्वाचा प्रश्न किचकट होईल व त्यासाठी खूपच यातायात करावी लागेल. नोकरीत सध्या तरी कोणताच बदल करणे इष्ट ठरणार नाही. शुभ दिनांक ५–६–९

**महिलांना :** संयमी वागणूक यावेळी तुम्हाला अनेक प्रकारच्या त्रासातून सोडवू शकेल. नोकरीत अतिशय खबरदारी घ्यावी लागेल.

**विद्यार्थ्यांना :** स्मरण शक्तीवर विसंबून राहाणे धोक्याचे ठरेल. व्यावसायिक शिक्षणात जास्त लक्ष द्या.

**कर्क : सुरळीतपणाचा प्रत्यय**

शनि-मंगळाच्या युतीचे परिणाम आता जाणवू लागले असतील. तुम्हाला ते अनेक क्षेत्रांत अनुकूल असे जाणवतील. तुम्ही जर पत्रकार असाल तर, तुमच्या आजवरच्या श्रमाचे, परिश्रमाचे व्यवस्थित चीज होईल. काही अधिकारपदे तुमच्या वाटचाला येऊ शकतील. प्रतिभेला बहर येईल. नोकरीत अनपेक्षित स्थित्यंतर घडून आशा आकांक्षांच्या पूर्तीचा समय नजिक येईल. तुमचे पाय मागे ओढण्याचा ज्या लोकांनी प्रयत्न केला त्यांनाच तुमच्या साहाय्याची गरज भासेल. विशेष महत्त्वाचा प्रवास झटपट ठरून पार पडेल. मिळकतीत वाढ होईल व बदलीचा विचार साकार होईल. रासायनिक उद्योगातील कामगारांना बोनस स्वरूपाचा विशेष फायदा होईल. शुभ दिनांक ६–७–९.

**महिलांना :** आरोग्यकारक उन्नति हा तुमच्या बाबतीत विशेष अनुभव येईल. निराशेचा मागमूसदेखील राहणार नाही.

**विद्यार्थ्यांना :** चाणाक्षवृत्तीला उत्तेजन मिळेल. घरीदारी कोड कौतुक होईल.

**सिंह : प्रगती मंदावेल**

राशीस्वामीचा शत्रू व्ययस्थानी व त्याच्या बरोबर मंगळाच्या कारवाया ही तुमच्या बाबतीत आव्हानात्मक परिस्थिती ठरेल. बुद्धीचा अपमान, भावनेचा कल्लोळ, मनाचा कोंडमारा व कर्तबगारीबद्दल गैरसमज असे काहीसे प्रकार या आठवडचात घडू शकतील. सार्वजनिक कामात विशेषेकरून राजकीय जीवनात ज्यांनी ह्यात घालवली आहे त्यांच्या बाबतीत अपेक्षित पण आश्चर्यकारक असे काही तरी घडू शकेल. थोडक्यात माघार व अपमान सहन केल्याखेरीज गत्यंतर उरणार नाही. नोकरीत वरिष्ठांकडून उगाच कटकट सुरू होईल. त्यांचे समाधान करणे तुम्हाला शक्य होणार नाही. बेकारांच्या बाबतीत सहानुभूति मिळेल. पण त्यापेक्षा अधिक काही पदरात पडणार नाही. या वेळी कोणतेही नवे धाडस करू नका. शुभ दिनांक ६–८.

**महिलांना :** सार्वजनिक कार्यात भाग घ्या. पण मानापमानाच्या कल्पना मनात ठेवून भाग घेऊ नका. कारण अगदी एखादी सहकारीणदेखील स्वार्थासाठी तुमच्याविरुद्ध वागू शकेल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासाचे स्थान बदलताना विचार करा. स्वतःचे मित्र तपासून घ्या.

**कन्या : प्रगतीकारक !**

तुम्हाला खरे म्हणजे सध्या तसा कोणताच ग्रह प्रतिकूल नाही. तरीपण दुःख व समाधान यांपैकी काही तुमच्या वाटचाला येत नाही. तरीपण या परिस्थितीत थोडी थोडी सुधारणा होणार आहे. प्रामुख्याने आर्थिक स्थिती जी हाताबाहेर जात होती तिला कुठेतरी आळा बसू शकेल. जुन्या पत्रव्यवहाराचे मंथन पुन्हा होण्याची शक्यता आहे. तब्येत मात्र सुधारणार आहे. जुने मित्र, नातेवाईक यांच्याबरोबरच्या संबंधात अनुकूल अशी सुधारणा होणार आहे. मन अधिक उत्साही

राहील. कार्यक्षमतेने कोणत्याही कामाचा झटपट उरक होऊ शकेल. रवि-शुक्रासारखे ग्रह नोकरीत बरेच काही देणार आहेत. वरिष्ठांच्या मनात आपुलकी निर्माण होणार आहे. आजवरचे परिश्रम सत्कारणी लागतील. दुय्यम व्यवसाय सुधारेल.
शुभ दिनांक ६–८–९.

**महिलांना :** प्रगतीचे नवे मार्ग दाखविण्यात येऊ लागतील. तब्येतीची मात्र काळजी घ्या. पैसा कमी पडणार नाही.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षणविषयक आशा-आकांक्षा बऱ्याच प्रमाणात सफल होतील. स्थानांतर घडण्याची बरीच शक्यता आहे.

**तूळ : आर्थिक स्वास्थ्य**

शनि-मंगळांनी लाभस्थान भूषविले असता तुम्ही पैशाची मुळीच काळजी करू नका. एखादी योजना आखा व बँक अगर अन्य अशाच संस्थांकडे कर्ज मिळवण्यासाठी प्रयत्न करा. पदरात बरेच काही पडेल. व्यापार व्यवसायातील मंदी अगर अडचणी कमी होऊन तो सुस्थिर पायावर उभा करू शकाल. व्यापारी कामासाठी महत्त्वाचा पत्रव्यवहार या आठवड्यात करा. नोकरीच्या क्षेत्रात तुमचे प्रस्थ निर्माण झाले तर आश्चर्य मानू नका. मालक अगर वरिष्ठ अधिकारी यांच्यावर कार्यक्षमतेने प्रभाव पाडू शकाल. अनेकांचे सहकार्य टिकू शकेल. शेती, खते यांत लक्ष घालून विशेष काही घडवलेत तर त्याला चांगले फळ येईल. शुभ दिनांक ५, ७, ८.

**महिलांना :** व्यक्तिमत्त्व उंचावेल. सौंदर्य प्रसाधनाचा व्यापार नफ्यात आणता येईल. नोकरीत लक्ष द्या.

**विद्यार्थ्यांना :** आठवडा प्रगती घडवून आणणार आहे. गायनवादनाचा अभ्यास करा.

**वृश्चिक : नोकरीत अधिकार**

राशिस्वामी मंगळ व शनि भाग्यस्थानी ही एकच शुभ परिस्थिती तुमच्या महत्त्वाकांक्षांना बहर आणायला पुरेशी आहे. नोकरीच्या क्षेत्रात बरेच काही तुमच्या पदरात पडणार आहे. बरेच दिवस प्रमोशनचे काम जर होत नसेल तर त्याला अनपेक्षित चालना मिळणार आहे. बेकारांना संरक्षण मिळणार असून त्यांच्या पदरात बरेच काही पडणार आहे. स्वतःचा धंदा सुरू करायला अनुकुलता आहे. फ्लॅट, जमीन खरेदी विक्री, शेतीची अवजारे यासारखा व्यवसाय लाभदायक ठरेल. नवा धंदा ज्यांना चालू करावयाचा असेल त्याने सावण, तेले, मिठाई यांचा धंदा करावा. बदली बढतीचा प्रयत्न यशस्वी होईल. नाटकाचे, संगीताचे मक्ते या आठवड्यात चार पैसे मिळवून देतील. शुभ दिनांक ५–९.

**महिलांना :** पैसा जपून वापरा. खर्च नियंत्रित ठेवावा लागेल. नोकरीत कामाचे चीज होईल.

**विद्यार्थ्यांना :** हे दिवस अनुकूलच आहेत. परगावाहून आलेल्या विद्यार्थ्यांची चांगली सोय होईल. पैसे मात्र खूप खर्च होतील.

**धनू : उत्साह वाटेल**

आठव्या स्थानी झालेल्या शनि-मंगळाच्या युतीमुळे तुम्हाला काही विशेष त्रास होणार नाही असे मी यापूर्वीच सांगितले होते व त्याचा प्रत्यय तुम्हाला आलाच असेल ! आता तुमच्या प्रगतीच्या गाडीत तसा 'अडथळा येण्यासारखे काही नाही. रवी थोडा फार प्रतिकूल असला तरी, त्यामुळे कोणतेच नुकसान होणार नाही. राशीस्वामी गुरूचा मूळ चंद्राशी झालेला नवपंचम योग म्हणजे एक मोठे आशादायक चिन्ह होय. सुप्त किंवा गुप्त अशी जी मनात भीती ठेवून तुम्ही बसला आहात ती झटकून टाका आणि नव्या उत्साहाने कामाला लागा. एकेक संधी मिळणार आहे तिचा लाभ घ्या. वातावरण निर्मळ व प्रसन्न राहील. नोकरीधंद्याच्या प्रगतीला तो खूपच उपकारक आहे.आध्यात्मिक वृत्तीला स्फूर्ती मिळेल. शुभ दिनांक ६–७–९.

**महिलांना :** नोकरी धंद्याच्या इच्छा आशादायक प्रोत्साहक असा हा सप्ताह आहे. अडचणी जाणवणार नाहीत.

**विद्यार्थ्यांना :** ज्ञानार्जनाला मदत व प्रोत्साहन मिळेल. थांबलेले शिक्षण पुढे सुरू होईल.

**मकर : आत्मविश्वास वळावेल**

सुखस्थानी असलेला गुरू तुमची मनःस्थिती सतत खळबळीची ठेवणार आहे. प्रामुख्याने तुमचे मन संशयाच्या सावलीतच रेंगाळत राहील. असे असले तरी चंद्रासमोरचे शनी-मंगळ तुमचा आत्मविश्वास वाढता ठेवतील. किंबहुना आणखी काही काळ तरी या दोन ग्रहांचे सामर्थ्य तुमच्या फार उपयोगी पडणार आहे. तुम्हाला कुणीही कितीही विरोध करू द्या ! त्यांना आपलेसे करण्यात तुम्हाला यश मिळणार आहे. संशोधक, उद्योगपती, व्यापारी राजनैतिक मुत्सद्दी यांना अनुकूल क्षेत्र मिळणार असून त्यांच्या योजनांस गती मिळणार आहे. मंदी अगर इतर अडचणी यांपासून निर्माण झालेली परिस्थिती मागे पडेल. नोकरीत समाधान लाभले तरी कामाचा ताण कमी होणार नाही. शुभ दिनांक ५–६–१०

**महिलांना :** शारीरिक स्वास्थ्य कमी होईल. अनेक दिवस एखाद्या आजाराने तुम्हाला घेरले असेल तो आजार कमी होईल.

**विद्यार्थ्यांना :** मनःस्थिती सुधारण्यासाठी पहाटे उठून मनःचिंतन करा. उपासनेत यश मिळेल.

**कुंभ : महत्त्वाचा बदल**

अनेक अनुकूल ग्रहांचे सहकार्य घेऊनच हा आठवडा उगवत आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रात यश व लाभ तुमच्या पदरात पडणार आहेत. तुमचा पिंड प्रामुख्याने राजकीय व संशोधनाचा. या दोन्ही बाजू लोकांसमोर चमकणार आहेत. यावेळी जर एखादी निवडणूक असेल तर तुमचे यश निश्चित आहे. तुमचे संशोधन लोकांच्या कौतुकाचा विषय होईल. तुमचा कोणताही व्यापार असू द्या. त्यात प्रगतीकारक पावले पडतील. सहकार्य मिळेल. नोकरी करणाऱ्या लोकांना सुख व स्वास्थ्यही मिळणार आहे. बढती व पगारवाढ मिळणार आहे. प्रयत्न करा. नोकरांना आनंद मिळेल असे काही तरी घडू शकेल. परदेशी प्रवास अटळ ठरेल. शुभ दिनांक ६–७–११

**महिलांना :** आठवडा छान आहे. नोकरी नसेल तर त्यांना ती मिळेल. स्वतःचा उद्योग करता येईल.

**विद्यार्थ्यांना :** शास्त्रीय 'संशोधनात' जे गुंतलेले असतील त्यांना मदत मिळेल.

**मीन : संधी येत आहे**

राशीस्वामी दुसरा आहे. शनी-मंगळाची जोडी पंचमस्थानी बसून तुमच्यासाठी अनेक योजना आखीत आहे. म्हणूनच मीन राशीच्या व्यक्तींनी मागे मागे राहून न्यूनगंडाच्या आहारी का जाता ? सामान्यतः इतकी छान ग्रहरचना नजिकच्या काळात तुमच्या वाट्याला येणार नाही. म्हणून संधी येत आहे. त्याचा लाभ उठवा. नोकरीत तुम्हाला बदल करायची संधी येणार आहे. चालू नोकरीत तुमच्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणात पुऱ्या होतील. अनेक दिवस ज्या मागणीसाठी तुम्ही वरिष्ठांचे उंबरठे झिजवले ते काम आता सहज होऊन जाईल. प्रकाशन व लेखन व्यवसाय प्रगतीचा नवा टप्पा गाठील. प्रकृती आणि मनःस्थिती उत्साहजनक राहील. शुभ दिनांक ६–८–१०

**महिलांना :** लेखक म्हणून तुमच्यापैकी काही भाग्यवंतांची नावे प्रसिद्धीच्या झगमगाटात येतील.

**विद्यार्थ्यांना :** इच्छित हेतू पुरे होतील. ज्या अभ्यासाचा आनंद आहे तो स्वीकारा. यश मिळेल. □

# परंतु दादा कोंडके सोंगाड्या इतके झाले!



नंदू राजे

## लेखांक नऊ

सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशाचा महत्त्वाचा भाग म्हणजे सर्व साधारण खेडोपाडी धंदा करणाऱ्या इतर मराठी तमाशापटांमारखा. तो खेड्यात तर चाललाच, शिवाय नागपूर, पुणे, मुंबई येथेदेखील त्यानं रौप्यमहोत्सवी चमत्कार घडवून आणला. एकूणपन्नास साली रौप्यमहोत्सव करणाऱ्या भालजी पेंढारकरांच्या मीठभाकर चित्रपटानंतर मुंबईत तब्बल बावीस वर्षांनंतर हा पराक्रम करणारा हा पहिलाच मराठी बोलपट ! ह्या आधीचा मराठी बोलपटाचा धंदेवाईक आलेख जवळपास ठरलेला. शहरात चारपाच आठवडे ढकलायचा, खेडोपाडी मिळेल तेवढा धंदा पदरात पाडायचा न मागाहून सोळा मिलीमीटर फिल्म बनवून, येईल त्या किमतीला फुंकून टाकायची. नंतरचं मॅटिनीचं मार्केट जवळपास उपलब्ध नसायचंच, किंवा अलिकडचं टी. व्हीचं ! त्या बावीस वर्षांत मुंबईत मराठी चित्रपट चाललेच नव्हते अशातला भाग नाही. ' शिकलेली बायको ', ' जगाच्या पाठीवर ', ' आम्ही जातो आमुच्या गावा ', ' पाठलाग ', ' सांगत्ये ऐका ', ' मानिनी ' इत्यादी डझनबरीक चित्रपटांनी मुंबईत चांगला पैका मिळवला असला तरी, सलग पंचवीस आठवडे चालण्याचं भाग्य यांपैकी एकालाही मिळालं नव्हतं. पुण्यात तब्बल १२२ आठवडे चालून विक्रम करणारा ' सांगत्ये ऐका ' देखील पहिल्या छुटीला मुंबईत अवघा आठ हप्ते तग धरून राहिला होता. मुंबईतली महागडी थिएटरभाडी, रंगीत हिंदी सिनेमांशी त्यांतल्या तांत्रिक कौशल्याशी न् ग्लॅमरशी त्यांना सामना करावा लागत असे हे खरं, पण प्रेक्षकांना—विशेषत: झपाट्याने नाटकाकडे झुकणाऱ्या मध्यमवर्गीय प्रेक्षकांना—महिनोनमहिने खिळवून ठेवेल, पुन्हा यावसं वाटेल असा दम मराठी पटांत निश्चितच नव्हता, आणि हा बाजूला जाणारा प्रेक्षकवर्ग मराठीला पुन्हा मिळवून द्यायचं काम सोंगाड्यानं केलं. आणि सोंगाड्यानंतरच्या तिनही चित्रपटांनी असाच रुपेरी धमाका अख्खा महाराष्ट्रभर केला. चवथ्या पांडू हवालदारनं तर सगळेच पैशाचे रेकॉर्ड तोडले. पांडू हवालदारचे तामीळ, तेलगू, गुजराथी चित्रपटासाठीसुद्धा राइट्स् दादानं विकले...पांडूचं काम आपणच करणार या अटीवर. असं म्हणतात की, हा चित्रपट आपण हिंदीत करतो, तर ते राइट्स् आपल्याला विकून टाक अशी गळ महमूदनं घातली आणि दादानं हक्क विकण्याचे पंचाहत्तर हजार रुपये मागितले. महमूद म्हणाय् लागला की, हे फारच होतात, तर दादा म्हणाला, मग लाखाच्या खाली देणार नाही. हा क़िस्सा कदाचित दादाच्या अनेक प्रसिद्धी स्टंटाचा भागही असेल, पण बेरकी दादा आपल्याशिवाय पांडू हवालदार हिंदी करण्यासाठी कुणालाही देईल असं मला वाटत नाही !

' मला आठवतं दादा, तू सोंगाड्याची १६ मिलीमीटर फिल्म करून विकली होतीस नं ? '

# एकूणपन्नास साली रौप्यमहोत्सव करणाऱ्या भालजी पेंढारकरांच्या मीठभाकर चित्रपटानंतर मुंबईत तब्बल बावीस वर्षांनंतर हा पराक्रम करणारा 'सोंगाड्या' हा पहिलाच चित्रपट

'हो रे बाबा, गाढवासारखे मिळाले ते वीस हजार उचलले न मोडीत निघाल्यागत झाली फिल्म. यानंतर मात्र हा गाढवपना आपन पुन्हा केला नाय.'

ही गैरधोरणी गल्लत दादासारख्या माणसानं कशी केली याचं मला नेहमीच आश्चर्य वाटतं. कारण पुण्यात सहा आठवडे हाऊस फुल चालत असलेला आणि पुढं सिल्व्हर ज्युबिली करणारा एकटा जीव सदाशिव जेव्हा मुंबईत झळकला तेव्हा तिथं सोंगाड्याचा संयुक्त शंभरावा आठवडा चालू होता ! याच सुमारास खोपोलीच्या आसपास एक सुसज्ज स्टुडिओ बांधण्याची व 'तूच माझी चिमणी' नावाचा नवा वग करण्याची घोषणा दादानं केली ती कदाचित, पब्लिसिटी गिमिक म्हणूनदेखील असेल. पण हेही अव्यवहार दादानं केले नाहीत हे मात्र खरं.

कीर्ती आणि पैका मोठ्या विचित्र गोष्टी आहेत. अमाप यश आणि जिवघेणं अपयश, फालतू कारणास्तव जवळिक अपरिहार्यपणे, क्वचित अगतिकपणे तोडतात. 'पैसा मिळाल्यावर दादा बदलला' असे म्हणणारे दादाचे अनेक जुने सहकारी मला ठाऊक आहेत. तो नेमका काय बदलला हे सहसा कुणालाही अचूकपणे सांगता येत नाही. या तुटलेल्या संबंधांत दादाची किंवा त्या सहकाऱ्यांची काही आगळिक नसेलच, असं ठामपणे कुणालाही म्हणता येणार नाही. सर्वसाधारणपणे तुफान यशस्वी माणूस, स्वतःच्या सत्तेच्या जोरावर वा अहंकार पोसण्यासाठी इतरांकडून शंभर टक्के निष्ठेची गैरवाजवी अपेक्षा करतोच. तीत बाध आली किंवा त्याला तसं वाटलंच तर, संबंध तोडून टाकायची आर्थिक वा पोझिशनल फायदा त्याच्याकडेच असतोय. पण, केवळ माझ्यापुरतं पाहिलं तर, पैक्यानं वा यशानं दादा उतला–मातला असं मला कधीच वाटलेलं नाही. गेल्या अनेक वर्षांच्या ओळखीत वेळ-भेटण्याचं प्रमाण व्यस्त झालं असेल, पण संबंधांत बिघाड आलेला नाही. अर्थातच माझे–दादाचे संबंध हे नमुना उदाहरण म्हणून काही शाबीत करतात अशातलाही भाग नाही. पैशाअडक्याच्या व्यवहारात दादाचा हात निश्चितपणे ढिला नाही–असेल तर, थोडा जास्तीचाच घट्ट...

'आयला, आपण कुणाला पैशाची मदतबिदत करत नाही हे सप्शेल खोटं आहेय्. विच्छातल्या अनेकांना मी अशी मदत केलेली. ही मंडळी म्हणायची, नाईटमधून पैशे कापून घ्यावा आणि कापू का म्हणून मॅनेजरानं विचारलं की, यांना आणखी काही अडचणी यायच्या. त्या खोट्याच असतील असं, खऱ्याबी असतील असं

धरून मी अनेकांना पैशे माफ केलेत. आणि हे काय फक्त माझ्या मंडळींपुरतं नाय. दादू इंदुरीकराला त्याचा तंबू अख्खा जळला तर मीच मदत केली की नाय. त्यांतली दमडी तरी परत मिळालीय काय? उलट हाच बकवा कराय् लागला की, मी दादाचा गुरू आहे म्हणून. हे पण ठीक. पण मागाहून जाहिरातीतदेखील दादा कोंडकेचा गुरू म्हणून छापाय् लागला, हे मात्र भलतंच हाय्. आयला, एकदा हा दारू पिऊन नशेत आपल्या घरी आला. आपण घरात नव्हतो म्हणून वाचला. दुसऱ्या दिवशी याचं गाढवाचं लग्न होतं साहित्यसंघात. गेलो न् थेट बकोट धरला न्... स्वत:ला कोन समझतोस? आपल्या घरी दारू पिऊन येतोस?'

'तुझं नं रामू नगरकरचं कसं फाटलं रे?' रामू माझा चांगलाच दोस्त आहे हे दादाला पक्कं ठाऊक आहे.

'तू थांब रे, तुला आणखीन सांगतो. विच्छा दनादन चालतंय तर, आमच्यातल्या काही जणांना वाटाय् लागलं, आपण पुन: स्वत:चा फड उभारावा. ज्यांना वाटलं ते सोडून जाताहेत, तर मी काय त्यांना अडवू. आणि त्यांचे फड चालले नाहीत तर माझा दोष काय.'

फक्त या चुकलेल्या मंडळींना परत घेण्याचा सवाल दादाला पडला नाही किंवा त्यांच्यावाचून अडून राहण्याचा.
भरघोस सांघिक यशानंतर इतरांच्या महत्त्वाकांक्षा चाळवणं ही तर नित्याचीच गोष्ट आहे. अनेक बिऱ्हाडं अशी फुलली आहेत. महत्त्वाकांक्षा व टॅलण्ट यांच्या व्यस्त प्रमाणात नामशेष झाल्या आहेत.

'आत्ताआत्ताची गोष्ट सांगतो तुला. आपला प्रकाश ठाऊकाय न तुला. हे पोरगं पयल्यापासून माझ्याजवळ होता. याला महिन्याला तीनशे न् जेवणखाण, कपडेलत्ते सगळं देत होतो. गावाकडं जमीन घेऊन दिली होती. त्याला कुणी चियावलं न् हे खुळं म्हणाय् लागलं की, मैन्याला दोन हजार हवेत. तटूनच बसलं नि हट्टानं निघून गेलं. आता काय सांगायचं...हे बघ, कामाचे पैशे जास्त हवेत हे ठीक समझतो मी. रास्त वाटलं, आपल्या त्याच्या गणिताात परवडलं, तर दिऊन टाकावेत पण नाय परवडलं तर, काय करनार?'

हा डॉयलॉग मारताना अशोक सराफ माझ्याशेजारी बसलाय आणि ही कदाचित त्याला हिण्ट असावी असा मला उगाउगा संशय येतोय्.

'रामू नगरकरबद्दल सांगतो. याला याचं सलून एअरकण्डीशण्ड करायचं होतं. पैशे मी दिले त्याला. विचार त्याला. हा आपला जुना सहकारी दोस्त. एकदम राष्ट्रीय सेवा दल, सोशॅलिस्ट पार्टीपासनचा. कोल्हापूर भागाचा दौरा होता आमचा. हा म्हणाय् लागला, नाय् जमायचं, पोरगं लई शिक आहे. ठीक आहे म्हटलं. नेऊ वेळ मारून. बिमार पोराची काळजी कुणाच्याही बापाला वाटणारच. तर हा तिकडंच कोल्हापूरच्या दुसऱ्या वगात काम करतोय. पैशे जास्त हवे तर सांगायचं. परवडलं असतं, तर नक्की दिले असते. बिऱ्हाड दुसरं मांडायचं होतं तर, ते पन सांगून सवरून दोस्तीत झालं असतं. परवा कोल्हापूरला होतासच की, त्याच्या रामनगरी बुकाचं उद्घाटन करायला मला बोलावत होता...मी हो म्हनलो की नाय्?...तुझीच साक्ष काढतो साल्या.'

फक्त त्या उद्घाटन समारंभाला दादा गेला की नाही, याचा मात्र शहानिशा करून घ्यायचा राहिला.

'निळूचे न तुझे संबंध कसे बिघडले?'
'आयला काय बि खोटं नाही आमच्या संबंधात. 'तुमचं आमचं'च्या मुहूर्ताच्या वेळी लय गळ्यात गळा घालून फोटू काढलेत. छापून आलेत. टीव्हीवर माझी मुलाखत बि घेनार हाय. फोन केला होता मला, तवा मी म्हटलंच की, हापिसात ये. लय गप्पा मारायच्या राहिल्यात.'

इथं काही खऱ्या खोटयाला छेद गेलेला आहे. इतरांच्याबद्दल जाणीवपूर्वक वाईट न बोलणाऱ्या निळू फुलेला मी चांगला ओळखतो. दादा पैका-यशानंतर तो पूर्वीचा दादा राहिला नाही असं निळूनं मला स्वच्छ सांगितलं होतं. माझ्या अंदाजानं लोहिया पठडीत श्रद्धा असलेल्या निळू फुलेला, दादा आता एक 'कॉमन कॅपिटॅलिस्ट' झालाय् असाच अर्थ अभिप्रेत असावा असं मला ठामपणे वाटतं... त्यावेळी पांडू हवालदारची पूर्वतयारी चालू होती. त्यात 'निळू टाईप काही रोल आहेय्, असंही मला कळलं होतं पण निळूच्या शब्दात त्यानं (तेव्हा?) दादाकडे काम करण्याचा काहीच संभव नव्हता. पांडूचं कथानक ऐकून जराशी उडलोच होतो. (थोडाफार का होईना, पण फॉर्म्युला किंचित बदलून दादा पुन्हा आऊट ॲण्ड आऊट कॉमेडीकडे वळतोय असं मला गोष्ट ऐकून वाटलं होतं, त्यातला दुसरा रोल निळूनं केला तर मजाच येईल असंही.)
'दादा पैज लावून सांगतो, निळू तुझ्याकडे काम करणार नाही.' दादा आत्मविश्वासानं हसला होता. एव्हढंच नव्हे तर, आंधळा मारतो डोळ्याच्या सिल्व्हर ज्युबिली शराव मार्टीन त्यानं पिक्चर अनाउन्स करताना निळू फुलेचं नावही जाहीर केलं होतं. पेपरात चक्क छापूनही आलं होतं.

आपल्याला नाटकांच्या डेटस्‌मुळे दादाला सलग तारखा देणं जमणार नाही असं दादाला त्यानं सांगितलं, असं निळू मला म्हणाला. त्याच्या टीपिकल जुजबी बोलून वेळ मारून नेणाऱ्या स्वभावानुसार. तर 'आपण निळूला दुप्पट पैसे ऑफर केले—त्याला मराठीत नेहमी मिळतात त्यापेक्षा—पण निळू तयार झाला नाही' असं दादा म्हणतो.

खरं खोटं कुणास ठाऊक, पण अशोक सराफची भूमिका आवडूनही, मला नेहमी असं वाटतं की, ते काम निळूनं करायला हवं होतं... दोन खरोखर गुणी माणसं एकमेकांपासून फालतू कारणासाठी अशी

दुरावली की, मी नेहमीच सेंटिमेंटल होऊन जातो.

सर्वसाधारण, ठामपणे प्रचंड यश मिळालेल्या पिक्चरचा संच, निर्माता बदलायला तयार नसतोय. बहुतांशी जुगारी इसमांसारखा, निर्माताही भयानक देवभोळा, अंधश्रद्ध, कमालीचा सुपरस्टीशस असतोय. चित्र प्रदर्शित करण्यांपूर्वी फिल्मच्या पेट्या तिरुपतींच्या पायावर ठेवून येणारा मराठी निर्माताही मी पाहिलेला आहे. 'तुझा देवाविषयावर विश्वास आहे काय रे?' असा दादांला विचारलेल्या जवळपास लिडिंग प्रश्नावर दादानं 'आहे पण, नाही पण, तरी दरवर्षी आपण गोव्याच्या कामाक्षीच्या मंदिरात नुस्तीच एक फेरी मारून येतो' असा अपराधी सुरात कबुलीजबाब दिला होता. पण जरी सोंगाड्या रुटीन अर्थानं तमाशा बोलपट नव्हता तरी, त्याचा बोर्ड तमाशाचाच होता. एकटा जीवमध्ये मात्र द्वयर्थी यावर संवाद व दादाचा हजरजबाबीपणा सोडला तर, तमाशाचा संबंध नव्हता. अर्थातच निळू फुलेला यात भूमिकाच नव्हती. त्याऐवजी खेडं–शहर विसंगतीसाठी शरद तळवळकर आला, आणि अॅडिशनल ग्लॅमरसाठी पुष्पा भोसले. (एकूणच नव्या नव्या बायांबरोबर आपलं नाव गुंतविण्याचा दादाचा यशस्वी अट्टाहास हा देवआनंद लाईक ऑबसेशनसारखा प्रकार आहे, आणि तो जरासा संशयास्पदच आहे) जुजबी बदल होतेच पण दामोदर गायकवाड, संपत निकम, वगैरे 'विच्छा' वाली मंडळीही होतीच. एकटा जीवच्या यशानंतर–किंवा त्याच्या दरम्यानच–ह्या यशस्वी संचाला किड लागायला लागली...यशाची धुंदी, महत्त्वाकांक्षा व टॅलण्ट यांचं उलट प्रमाण व स्वतःला ओव्हर एस्टीमेट किंवा दादाला अंडरएस्टीमेट (यशाच्या गणितात) करत. वसंत सबनीस व दिग्दर्शक गोविंद कुलकर्णी या संचापासून दूर झाले. 'तुझ्या न वसंतरावांच्या व गोविंदरावांच्या एकटा जीवच्या शेवटच्या संदर्भात काय सांगत होतास...?'

तर दादा कोंडकेचं व्हर्शन असं.

त्याचं म्हणणं या चित्रपटाचं टायटलच एकटा जीव सदाशिव आहे, तर उषा चव्हाणशी लग्न होऊन तो दुकटा होईलच कसा. त्यात माणसांपेक्षा मेंढरंच बरी असाही चित्रपटाचा गाभा आहे. खेड्यातील बाई शंभर मेंढरं प्रेमानं पाळू शकते, त्यांची काळजी घेऊ शकते, पण शहरातल्या आईला तिची चार पोरंही सांभाळणं मुष्कील होतंय, तर या चित्रपटाचं शेवट दुःखात, म्हणजे सदाशिवला पुन्हा एकटच–त्याच्या मेंढरांच्या सहवासात–ठेवायला हवं. गोविंदरावांनी व वसंतरावांनी या दादाच्या म्हणण्याला कडाडून विरोध केला. गोविंदरावांचं तर म्हणणं असं की, पटाची ट्रॅजेडी केली तर, प्रेक्षकांमधली त्यांची आणि वसंतरावांची प्रतिमा ढासळेल, ते हा शेवट अॅक्सेप्ट करणार नाहीत...

> आयला तूच सांग यांना काही प्रतिमाफितीमा होती का तेव्हा? मी म्हणत होतो, सोंगाड्याचा शेवट कॉमिडी आहे हथं उलटं करू या...पब्लिकला पन धक्का पायजेलच अस्तो.'

पण या द्वयींनी आपला हट्ट सोडला नाही. कधी नव्हे ती दादानं पड घातली. शेवट त्यांच्या म्हणण्याप्रमाणे केला. तरीही पिक्चर चाललंच ट्रॅजिक एण्डनं चित्रपट निश्चितच उंचीवर चढला असता.

'याच्याही आधी स्टोरी डिस्कशनसाठी दादरच्या रामनिवास हॉटेलातली खोली मी घेतली होती. इथं त्यांची काय खलबतं चालायची कोण जाण, पण मी गेलो का विषय एकदमच बदलल्यासारखा वाटायचा.'

अशातही एकटा जीव एकदाचा पुरा झाला, पड्यावर चढला, यशस्वी झाला आणि दादाला अचानक कळलं की, लेखक, पटकथा लेखक व संवाद (आणि छुपे निर्माते?) वसंत सबनीस व दिग्दर्शक गोविंद कुलकर्णी यांचा 'ह्या नाऱ्या झिंदाबाद' (निळू फुले व राम नगरकर यांची प्रमुख भूमिका) असला संघटना कॉंग्रेस टाईप चित्रपटाचा मुहूर्त राजकमलमध्ये आशाबाई भोसले यांच्या गाण्यावर होणार आहे.

> आयला आपण एवदमच च्यॅट पडलो. म्हटलं आपल्याला आमंत्रण पण नाही मुहूर्ताचं. पन म्हनालो इसरले अस्तील. कामाच्या धायगर्दीत जवळच्या मान्साला हटकून विसरायला होतो. आपण सकाळी सकाळीच वसंतरावांना फोन मारला. मिथ्याच सांगितलं तिसऱ्या पिक्चरचं डिस्कशन करायचं हाय अर्जंट, तर येऊ का सकाळी धा वाजता. म्हनालो वसंतराव आमंत्रण विसरले असतील तर बोलतील आपसुख मुहुर्ताबद्दल. त्यांच्या तोंडात मिठाची गुळणी. मुहुर्ताबद्दल काय बोलायला मागत नाहीत. आज लय बिझी आहोत. मागाहून भेटूया इतकेच म्हणाले, तेव्हा आपल्या लक्षात आलं यांचं काही खरं नाही.'

मागाहून तरी वसंतरावांना दादानं या निमंत्रणाबद्दल हटकलं, तर ते म्हणे म्हणाले की, दादाला बोलवलं असतं तर, आशाबाई भोसल्यांना राग आला असता म्हणून आमंत्रण पाठवलं नाही.

विच्छाचं घोडदौडी यश आणि त्यानंतरचा सोंगाड्या याच्या दरम्यान माझ्या दृष्टीनं दादाच्या खाजगी आयुष्यात एक प्रचंड स्थित्यंतरं घडलं. दादाची देखणी बायको व मुलगी दादाला सोडून गेली, किंवा दादानं त्यांना सोडलं. या प्रकरणाबद्दल अनेक उलटसुलट प्रवाद ऐकू येतात, पण नवरा–बायकोसारखं आत्यंतिक खाजगी संबंधाच्या बेबनावाबद्दल नेमकं कारण कुणालाही कळणं शक्य नाही. दादा त्याबद्दल अजिबात बोलायलाही मागत नाही...आणि रक्ताच्या संबंधाबद्दल आत्यंतिक ओढ असलेल्या दादा कोंडके या इसमाला जो प्रश्न विचारायचं खरतर मला धैर्यही नाहीयू...आणि असं विचारणं मला रुचत नाही. माझ्या पत्रकार प्रकृतीतली ही खोट आहे असंही मला वाटतं.

'दादा...ज्ञानेश्वरांचा निर्वाळा देऊन माणसापेक्षा मेंढरं बरी असं एकटा जीवला तू थिम सॉन्ग दिलंस. 'तुमचं आमचं जमलं' च्या जाहिरातीतदेखील कुत्री, माकडं माणसांपेक्षा बरी असं तू बोलतोस... खरंच का माणसांवर तुझा इतका विश्वास नाहीय.' हा प्रश्नदेखील आजपर्यंत दादाला विचारायचा राहिला आहे!

☐

**त्याची मुलाखत आटोपल्यावर** : पृष्ठ ५ वरून

असं नवं नामाभिधान दिलं. त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांनी व्यक्तिगत नोकर बाळगण्याची त्यानं परवानगी दिलं. स्टॅलिननं असंही फर्मान काढलं की, मुलांमुलींना एकत्र शिकविण्यात येऊ नये ! मुलींनी शाळांमध्ये घरगुती कपडे घालावेत ! शिवाय त्यानं असाही कायदा केला की, मुलांच्या शिक्षणासाठी पालकांनी शाळांना फी द्यावी ! कुठल्याही इतर ख्रिश्चन समाजाप्रमाणेच रशियातल्या लोकांनी रविवारी सुट्टी घ्यावी. लग्नबंधनाचं पावित्र्य कायम राखण्यासाठी त्यानं कायदा केला. (खरं तर झारच्या कारकीर्दीत असल्याच जुनाट कायद्यामुळे स्वतः स्टॅलिनच गोत्यात आला होता !) आणि ह्या विषयात एंगल्स काय म्हणतो वगैरे याची स्टॅलिनला पर्वादेखील नव्हती !

आणि इथे ह्याच अभ्यासिकेत एका आरशासमोर स्टॅलिननं आपल्या लष्करी सन्मानाच्या शाही फिती प्रथम आपल्या गणवेशावर लावल्या ! केवढा आनंद झाला होता त्याला त्यावेळी ! त्यानं अधिक विचार केला तेव्हा त्याला उमगलं होतं की, सर्वोच्च सन्मानाचा बादशाही मुकुट डोक्यावर चढवणं ह्यातसुद्धा लज्जास्पद असं तरी काय होतं ? खरं तर सतत तीनशे वर्षं टिकून राहिलेल्या राजसत्तेच्या स्थैर्याचंच ते प्रतीक नव्हे काय ? आणि राजसत्तेपासून काही चांगल्या गोष्टी घेतल्या तर त्यात असं बिघडलं काय ?

भूतकाळातल्या अनेक घटनांवर स्टॅलिननं चिंतन केलं होतं. उदाहरणार्थ पोर्ट आर्थर पूर्वी जेव्हा तो सायबेरियात हद्दपारी भोगत होता तेव्हा स्वाभाविकच त्यानं पोर्ट आर्थरच्या रशिअन पराभवाचं स्वागत केलं. पण पंचेचाळीसमध्ये जेव्हा जपान पराभूत झाला तेव्हा त्यानं आपली पूर्वीची चूक सुधारून घेतली. तेव्हा मात्र तो म्हणाला, त्याच्यासारख्या जुन्या पिढीतील रशिअनांना, पोर्ट आर्थरचा पराभव हा जणू आपल्या स्वतःला बसलेला जबरदस्त तडाखाच वाटत होता !

बरोबर ! तीच ती जुन्या पिढीतली रशिअन माणसं ! स्टॅलिनला कधी कधी वाटतं की, त्यानं स्वतः देशाचं नेतृत्व जिंकलं आणि मग लोकांची मनंही जिंकून घेतली, हा काही योगायोगाचा भाग नाही ! मोठ्या तोंडाच्या आणि टोकदार दाढीवाल्या संधीसाधूंपैकी एकालाही संधी मिळाली नाही ! कोठलीही पाळंमुळं नसताना सत्तेवर चढलेल्या त्या लोकांकडे लोकांना देण्यासारखं विधायक नेतृत्व तरी कुठे होतं ?

जुन्या पिढीतले ते सारे नेते आता इथे, इथे त्या त्या पुस्तकांच्या शेल्फवर ठेवलेयत ! आता ते संपलेयत. मारले गेलेयत गोळ्या घालून किंवा सायबेरियात गाडले गेलेयत किंवा विषप्रयोगाला बळी पडलेयत किंवा भाजून मेलेयत, किंवा अपघातात संपलेयत, किंवा आत्महत्त्येकडे ढकलले गेलेयत, किंवा डावलले गेलेयत, किंवा मालमत्ता गमावून बसलेयत किंवा हद्दपार केले गेले आहेत. पदावनत झालेयत. त्या साऱ्यांचं कर्तृत्व (!) त्यांचं लिखाण, पुस्तकं इथे ह्या शेल्फांवर ओळीत मांडून ठेवलीयत ! रोज रात्री ते आपल्या पुस्तकांच्या पानांतून स्टॅलिनकडे रोखून पाहतात ! आपल्या लहानग्या दाढ्या खाजवून त्याला डिवचतात ! आपली बोटं कडाकड मोडतात त्याच्या नावानं ! त्याच्या तोंडावर थुंकतात जणू ! त्याला घोगऱ्या आवाजात सुनावतात ! त्याला बजावतात, आम्ही तुला तेव्हा सांगितलं होतं ! ते करायचा हा मार्ग नाही !' बस्स त्यांची लायकीच मुळी दीड दमडीची होती. स्टॅलिनंच त्या सगळ्यांना इथे, ह्या शेल्फवर, एकत्र आणलं होतं ! कारण त्याचा संतापाचा पारा चढवून देऊन ते जणू त्याला मदतच करत असतात ! कारण अशा रागीट मूडातच रोज रात्री विधायक नवे निर्णय घेणं स्टॅलिनला शक्य होत असे !

स्टॅलिन अद्याप खोलीतच येरझारा घालीत होता. इतका वेळ त्याच्या मनात घुमत राहीलेला तो अज्ञात वाद्यवृंद आता थंडावला होता आणि मागेही पडला होता. त्याचे पाय कमरेखाली दुखत होते. तो जणू कोसळण्याच्या बेतात होता. त्याच्या पायांना आता विश्रांतीची सक्त जरुरी होती.

सर्वोच्च सेनापतीचा गणवेश चढवलेल्या, त्या अर्ध्या जगाच्या मालकाचं, स्टॅलिनचं, मस्तक किंचित झुकलं होतं. तो शांतपणे त्या शेल्फाजवळून पुढे गेला तेव्हा बळकट पंजे त्याच्या शत्रूंच्या पाठीवरून फिरत गेले. तो शेवटच्या शेल्फापासून दूर झाला ! तेवढ्यात त्याला टेबलावरचा फोन दिसला. आणि मग गेली संध्याकाळभर त्याला चुकवत असलेली गोष्ट त्याला क्षणार्धात आठवली. त्याला अबाकुमोव्हलाच काहीतरी विचारायचं होतं !–गोमुल्काच्या अटकेबद्दलच काय ? नाही ! नाही ! त्याला आता निश्चित आठवलं ! तो जड पावलांनी आपल्या डेस्ककडे गेला. त्यानं एक पेन उचललं आणि डायरीत शब्द लिहिले 'Scrambler !' त्यांनी त्याला खूप सांगितलं होतं ! त्यांच्याकडे Scrambler (फोन टॅप करणारे उपकरण)वर काम करण्यासाठी सर्वोत्कृष्ट माणसं आहेत. त्यांना आवश्यक साधनांची कोणतीही कमतरता नाही ! ते ठरलेलं वेळापत्रक पाळतील ! मग तो Scrambler अद्याप का तयार होऊ शकला नाही ? तो डुक्कर, अबाकुमोव्ह ! बिनधास्त चांगला तासभर इथे बसला होता ! पण त्यानं त्याबद्दल एकशब्द उच्चारला नाही ! काय ही हिम्मत याची !

सर्वच साले असेच आहेत. सगळ्या खात्यातले ! प्रत्येकजण आपल्या 'नेत्याला' फसवायला बघतोय ! त्यानं त्यांच्यावर विश्वास टाकायचा तरी कसा ? म्हणून रोज काम करणं स्टॅलिनला अटळ आहे ! त्याला दुसरा पर्यायच नाही !

अचानक तो तिथल्याच एका लहानशा खुर्चीवर लटपटतच बसला ! आपल्या डोक्याचा डावा अर्धा भाग कसल्यातरी प्रचंड भारानं ओढला जात असल्याचा स्टॅलिनला भास झाला. आपल्या विचारावरचा त्याचा ताबा उडाला आणि धुरकटलेल्या नजरेनं तो खोलीभर पाहू लागला. त्या खोलीच्या भिंती जवळ आहेत की दूर हेही मग त्याला कळेनासं झालं !

कोणीही मित्र नसलेला तो एक म्हातारा होता. कोणालाच त्याच्याबद्दल प्रेम नव्हतं. त्याचा कशावरच विश्वास नव्हता आणि त्याला काहीही नको होतं. आता तर त्याला त्याच्या मुलीचीही गरज उरली नव्हती. (एकेकाळी त्याला प्रिय असणारी त्याची मुलगी ! पण तिलासुद्धा क्वचितकाळी, एखाद्या सुट्टीच्या दिवशी त्याला भेटण्याची परवानगी !) आपल्या दुबळ्या होत चाललेल्या स्मरणशक्तीची आणि दुबळ्या होत असलेल्या मनाची जाणाव झाल्यावर एका अगतिक भीतीनं तो ग्रासला जात असे. एकाकीपणानं अर्धांगवायुसारखाच त्याच्या शरीराचा ताबा घेतला होता.

मृत्यूची सावली त्याच्या आयुष्यावर कधीचीच पडली होती ! पण त्याचा मात्र त्या गोष्टीवर विश्वासच बसत नव्हता !! □